रजिस्टरनंबर

कै० हरि माधव पंडित

यांचे विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेले

# चार चरित्रात्मक लेख.

अर्थात्

१. कृष्णशास्त्री चिपळूणकर,
२. सौ० डा० आनंदीबाई जोशी, एम्. डी.,
३. जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.,
४. जावजी दादाजी चौधरी,

यांचीं चरित्रें.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY * POONA * 1894
डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसाइटी, पुणें.

मुंबईत कर्नाटक छापखान्यांत छापिलीं.

जुलै १९०८.

प्रकाशक—नाडकर्णी आणि मंडळी.

किंमत ६ आणे.

प्रकाशकांनीं सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# अनुक्रमणिका.


कृष्णशास्त्री चिपळूणकर.

( जन्म इ. स.१८२४, मृत्यु २० मे १८७८ ) १

सौ० डा० आनंदीबाई जोशी.

( जन्म. इ. स. १८६५, मृत्यु २७ फेबुवारी १८८७ ) १६

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.

( जन्म. ३१ डिसेंबर १८४५ मृत्यु १९ फेब्रुवारी १८९० ) ३०

जावजी दादाजी चौधरी,

( जन्म. इ. स. १८३५, मृत्यु ५ एप्रील १८९२ ) ४६



# प्रकाशकांचे दोन शब्द.

मराठी वाङ्मयांत उत्तम लेखक ह्मणून ज्यांची प्रसिद्धि आहे, त्यांत कै० हरि माधव पंडित यांची प्रमुखत्वानें गणना होते. यांचा स्वतंत्र असा एकही ग्रंथ प्रसिद्ध नाहीं. यांनीं मराठी भाषेची जी अमोलिक सेवा केली, ती मुख्यत्वेंकरून विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकाच्या द्वारें होय.

हरिपंत पंडित यांचें सविस्तर चरित्र त्यांचे वडील चिरंजीव बळवंतराव पंडित, बी. ए., यांनीं लिहिलेलें विविधज्ञानविस्ताराच्या १९०१ सालच्या डिसेंबर

महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे; तें वाचून पाहिलें असतां हरिपंतांची वास्तविक योग्यता समजून येणार आहे. हरिपंतांचें हें चरित्र वाचून, त्यांचें लेखनव्रत चालविण्यास त्यांचे चिरंजीव सर्व प्रकारें योग्य आहेत, हें पाहून अत्यंत समाधान होतें.

हरिपंतांचा जन्म सांगलीनजीक हरिपुर येथें १८४९ सालच्या २१ दिसेंबरास झाला, आणि नागपुर येथें १८९९ सालच्या १५ मार्चास ते मृत्यु पावले. घरची यांची गरीबी असे. त्यांचा मराठी अभ्यास आटोपल्यावर वडिलांनीं त्यांस मुंबईस आणलें आणि स्वत: पुराण सांगण्याचा धंदा पत्करून मुलाचें इंग्रजी शिक्षण चालू केलें. १८७२ सालीं ते बी. ए. च्या परीक्षेस बसले; परंतु दुर्दैवानें नापास झाले. प्रापंचिक अडचणींमुळें यापुढें अभ्यासाचा नाद सोडून त्यांस नोकरी पत्करावी लागली. डा. रामकृष्णपंत भांडारकर यांच्या शिफारशीनें त्यांस १८७२ सालीं नागपुरास ‘ सिटी स्कूल ’ च्या हेडमास्तरची जागा मिळाली. या पुढील त्यांचें एकंदर आयुष्य नागपूर प्रांतांतच गेलें, आणि नागपुर हें त्यांचें कायम वसतिस्थान झालें. महाराष्ट्रास जसे माधवराव रानडे, वऱ्हाड प्रांतास जसे अण्णासाहेब महाजनी, तसे नागपुर प्रांतास हरिपंत पंडित होते.

विविधज्ञानविस्ताराच्या तिसऱ्या सालापासून लेखक या नात्यानें हरिपंतांचा त्याच्याशीं संबंध जडला, आणि सातव्या वर्षापासून तों त्यांच्या मृत्यूपर्यंत विस्ताराचे तेच संपादक होते. त्यांनीं विस्तारांत जे अनेक लेख लिहिले त्यांत पुढील लेख स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध होण्यालायक आहेत. १ नागपुरकर भोंसले यांचा इतिहास. (याची एक स्वतंत्र आवृत्ति निघाली होती. परंतु ती आतां दुर्मिळ आहे.) २ भवभूतीच्या श्रीमहावीरचरिताचें गद्यपद्यात्मक भाषांतर. (यांत आरंभीं त्यांस कै० वामन केशव मावळंकर यांचें साह्य होतें.) ३ श्रीमन्नारायणराव पेशवे नाटक.

यांचें चवथें पुस्तक क्षेमेंद्र कवीच्या चंडकौशिक नाटकाचें गद्यपद्यात्मक भाषांतर होय. हें माजी ‘ दंभहारकां’तून प्रसिद्ध झालें आहे.

याशिवाय यांचे वि. ज्ञा. विस्तारांत प्रसिद्ध झालेले अनेक लेख आहेत. त्यांपैकीं त्यांचे चार “ चरित्रात्मक लेख ” या पुस्तकद्वारें मराठी वाचकांस अर्पण करीत आहों. हरिपंत टीकाकार ह्मणून विशेष प्रसिद्ध आहेत. तेव्हां त्यांच्या

स्मारकार्थ आम्हीं त्यांचें जें दुसरें पुस्तक प्रसिद्ध करणार आहोंत, त्यांत त्यांचे ठळक ठळक टीकात्मक लेख देणार आहोंत.

हरिपंतांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मारकार्थ नागपुरांत खटपट होऊन बरीच रक्कम गोळा झाली आहे. आणि तिच्या व्याजांतून स्मारक कमिटी ठरवील त्याप्रमाणें नवीन अगर भाषांतररूप पुस्तक लिहिणारास एक चांगलें बक्षीस देण्याचा ठराव झाला आहे. आह्मांस वाटतें, पंडितांच्या स्मारकार्थ जमलेल्या रकमेचा उत्तम विनियोग ह्मणजे त्यांनीं लिहिलेले लेख छापून त्यांचा प्रसार करणें हा होय. यापासून त्यांची स्मृति सदोदित लोकांच्या अंतःकरणांत राहील, त्यांच्या लेखांचा त्यांच्या पिढीच्या लोकांस जसा फायदा मिळाला तसाच पुढील पिढीसही मिळेल, आणि मराठी वाङ्मयावर त्यांचे जे चिरस्मरणीय उपकार आहेत त्यांना कायमचें स्वरूप प्राप्त होईल. पुनः, या कामीं जो खर्च होईल तो पुस्तकविक्रीच्या रूपानें भरून येऊन स्मारकाची रकम जशाची तशीच राहील,–कदाचित् वाढेलही,–आणि पुढें नवीन ग्रंथ तयार करून घेण्यास उपयोगी पडेल. पंडित-स्मारककमिटी या सूचनेचा योग्य विचार करील अशी आशा आहे.

या पुस्तकांत छापिलेलीं चरित्रें बहुतेक मूळाबरहुकूम आहेत. फक्त कै॰ जावजी दादाजी यांच्या चरित्रापैकीं एक गोष्ट वस्तुस्थितीस सोडून असल्याचें चौकशीअंतीं समजल्यावरून ती गाळली आहे.

या पुस्तकांत जीं चित्रें आहेत तीं आह्मांस निर्णयसागर छापखान्याचे मालक रा. रा. तुकाराम जावजी यांनीं मेहरबानीनें दिलीं. याबद्दल त्यांचे उपकार मानणें अवश्य आहे.

शेवटीं, ज्यांच्या कवितेबद्दल हरिपंतांस अत्यंत प्रेमबुद्धि असे त्या कविवर मोगऱ्यांच्या पद्यांचा प्रास्ताविक हार त्यांच्या स्मृतिपटावर वाहून हा अल्पसा प्रस्तावनालेख पुरा करितों.

**नाहीं जन्म दिलें तथापि जननी कोणी करीना जसा**
**प्रेमानें प्रतिपाळ नित्य करुनी बत्तीस वर्षें तसा,**
**मायेचें न पडूं दिलें स्मरणही ज्या मावशीनें मला—**
**जाई सोडुनि त्या जगास मजही ती जानकी प्रेमला; १**

**'नाहीं शोकरसीं मजा, रस तरी कां आळवाना दुजा?'—**
**जीचे हे परिसोनि बोल दिधली म्यांही विलापा रजा,**
**अन्तर्बाह्य सुशीतला सुविमला भागीरथीसारखी,**
**गेली सोडुनि तीहि मूर्त कविता हा लोक माझा सखी; २**

दे तो जन्मचि तात कर्म परि हें *तात्यामुळें ज्या मिळे,
पुण्यें पूर्वकृतेंच जो सुमतिचा दाता मला आढळे,
ऐश्वर्यीं न चळे, ढळे न सहसा कर्तव्यकर्मव्रतीं,
गेला सोडुनि नीळकंठहि* मला तो दिव्यलोकाप्रती; ३

साजे पंडित पंडितांत, मिरवे वक्त्यांत वक्ता तसा,
पुण्यश्लोक जया उठोनि ह्मणते अत्यादरें 'या बसा!'
दिक्प्रांत स्वयशें भरी, निजगुणें चित्तें जनांचीं हरी,
स्वर्गारोहण तो अजातरिपुही †तेलंगनामा करी; ४

योगाभ्यास करी न जो पद तरी योगीश्वराचें वरी,
होई वंद्य जनांहि वंद्य नव्हता जो ब्रह्मवेत्ता तरी,
सोडीना व्यसनींहि शांतनवशी शांतीस ज्याची मति,
‡मामा तोहि निघोनि जाय परमानंदप्रदेशाप्रति; ५

दैवानें असतां चुकोनि खरडीं घासावया लाविला
मानी बुद्धिबळेंच पंडितपदा जो आपल्या पावला,
ज्याचे सायणमल्लिनाथहि सुखें होऊं पहाते सखे,
विद्वद्रत्नहि काळ तस्कर हरी तें §शंकरासारखें; ६

वर्षें चार सुभाषितीं सुरुचिरीं 'मित्रोदयीं' त्या जसा
झाला लोकमनांस जो रमविता 'इंदुप्रकाशीं' तसा,
शांतीचा पुतळा सती सुमतिचा आनंददायी मळा
ψगोविंदात्मज तो गणेशहि भला सायुज्यता पावला; ७

विद्वत्तेंत नसोनि पंडित जगन्नाथाहुनी जो उणा
अंगीं वागवितां न लेशहि जया आला कधीं मीपणा,
तोही लक्ष्मण ¶ रामचंद्र करुनी संसारयात्रा पुरी
गेला सोंपुनि 'भामिनीविलसिता' ह्या आळशाच्या करीं; ८

लोकीं वाढवुनी पुरातन कथाकाव्येतिहासीं रती,
ज्योतिःशास्त्रविदांहि जो शिकविता झाला ग्रहांच्या गती,
शिष्यीं मागितला गुरु प्रतिभवीं ज्या $मोडकासारखा
तोही काळमुखीं $जनार्दन पडे विद्वज्जनांचा सखा; ९

---

* नीळकंठ महादेव मोगरे. † काशिनाथ त्रिंबक तेलंग. ‡ नारायण महादेव परमानंद. यांस त्यांचे इष्टमित्र **मामा** ह्मणत असत. § शंकर पांडुरंग पंडित. ψ गणेश गोविंद नाडकर्णी. ¶ लक्ष्मण रामचंद्र वैद्य. $ जनार्दन बाळाजी मोडक.

मोहा जो न वळे, ढळे न अथवा निंदास्तुतीच्या बळें,
आचारास विचार मित्र ह्मणती ज्याच्या प्रयत्नें मिळे,
लीलेनेंच हवी तशी नटवुनी ही देशभाषा नटी
लावी पंडितही तदीय भजनीं जो मोठमोठे हटी; १०

रूढींच्या दरडी असंख्य असतां मार्गांत चोहींकडे
धैर्ये चालविता सुधारकचमू जो वीर झाला पुढें,
त्या गोपाळ गणेश आगरकरा आर्यप्रदीपासही
काळें मालवुनी तमोमय अहा! केली पुन्हा ही मही; ११

जेणें पाहुनि गर्वभार हरिला वाक्संगरीं आपला
'मालाकार' हि हार घेउनि ह्मणे हा–'वाद नाहीं भला.'
नेतां गोंडवनांतुनी रघुवरा निर्वंध रामेश्वरीं
स्पर्धा वीर कुरुंदवाडकरही ज्याच्या यशाची करी, १२

होता कोण मुकुंदराज? ह्मणते ज्ञानेश्वरी काय ती?
आहे गोड सुधारसाहुनि किती मुक्तेश्वराची कृती?
विप्रीं नेउनियां बळें बुडवितां नाहीं बुडाली जळीं,
एक्याची अजरामरा कृति अशी होऊनि कां राहिली? १३

नाम्या होउनि नामदेव बसला लोकांत कोण्या गुणें?
घालावी ह्मणती जनीस कवि कां साष्टांग लोटांगणें?
तोंडीं संतत दासबोधवचनें कां आमच्या राहती?
झाला देशहितार्थ काय करिता तो जावळीचा यती? १४

ब्रह्मानंदभरीं नरां नरवरां दिंडी पताका करीं
घ्याया लावुनि नाचवीत असतां त्या वाळवंटावरी,
श्री वैकुंठपुरी करोनि दुसरी जो दाखवी पंढरी,
वाणी काय अशी अलौकिक असे त्याही तुक्याची तरी? १५

कैसी पाजुनि वामनें नवरसां ही पुष्ट केली गिरा?
कां तो श्रीधर पात्र होउनि बसे सर्वत्र लोकादरा?
वाग्देवीप्रति नाचवीत असतां बारामतीचा शिखी,
चेतोवृत्तिहि नाचतात ह्मणती कां आमच्या पारखी? १६

आहे वाङ्मय आपलें नवरसीं ओथंबलें हें किती?
लोकां बोधहि काय काय करिती त्या पूर्वजांच्या कृती?—
आह्मां सर्वहि काव्यसंग्रहमिषें हें जो सुधी दाखवी,
गेला * वामनराव ओक विलया तोही कवींचा कवी! १७

---

* वामन दाजी ओक.

गेलीं काय न माणसें निघुनियां हीं चांगलीं चांगलीं ?
निद्रा काय सरस्वतीस तुमच्या होती तयीं लागली ?
हा ! हा ! प्रश्न करूं नकाच मज हे ! देऊं नका ती स्मृती !
झाली काय तयीं मलाच नकळे माझ्या मनाची स्थिती ! १८

आलें शंभरदा मनांत, धरिली हातांतही लेखणी,
होती साह्य सरस्वतीहि, नव्हतें गेहीं रुसाया कुणी,
'गोडी शोकरसीं न' हा ध्वनि परी कर्णीं जसा आदळे,
आपोआपचि ह्या करांतुनि तशी ही लेखणीही गळे ! १९

बोलावोनि परंतु मोरमकरें त्या रामकृष्णें मला
'वाचा' सांगुनि 'देशसेवक' जयीं माझ्यापुढें ठेविला,
काळी रेघ चहूंकडे पसरतां त्या पत्रकीं पाहुनी
नेला कोण नरावतंस ह्मटलें काळें अहा बाहुनी ! २०

हा ! हा ! तो इतक्यांत खिन्नवदनें मन्मित्र सांगे मला—
'गेला हो हरिपंत पंडित ! सखा गेला दिवीं आपला !'
वाणी कर्णकपाट फोडुनि शिरे ती अंतरंगीं जयीं,
वाटे घोर त्रिखार काय हृदया तोंडूं पहाती तयीं ! २१

आली शोकरसास पूर्ण भरती, उद्विग्न झाली मती,
होत्या दाबुनि ठेविल्या उसळत्या झाल्या पुन्हा त्या स्मृती,
गेला निश्चय भंगुनी, विसरही मौनव्रताचा पडे,
घेई धांव नको नकोहि ह्मणतां वाणी विलापाकडे ! २२

बोलूं काय ? अहो, नसोनि बघतां कोणी सखा सोयरा,
वर्षें षोडश लाभ लोभ नसतां कांहीं कशाचा खरा
जेणें केवळ आपला ह्मणवुनी हा सिंचिला मोगरा,
गेला आटुनि काय तो सुरुचिर प्रेमामृताचा झरा ? २३

# चार चरित्रात्मक लेख.



## कृष्णशास्त्री चिपळूणकर.

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने ।।

या विश्वसृष्टींतील सर्व घडामोडी कांहीं नियत नियमानुरोधानें चालत आहेत. आज जे नियम दृष्टीस पडतात तेच हजारों वर्षांपासून चालत आले आहेत. बहुतेक पदार्थ कोणत्या ना कोणत्या तरी नियमास वश आहेत. तथापि असे कांहीं पदार्थ परमेश्वर केव्हां केव्हां उत्पन्न करितो कीं त्यांस कोणताही नियम लागू पडत नाहीं. त्यांचे नियम स्वतःसिद्धच आहेत असें मानल्यावांचून गत्यंतर नसतें. बहुतेक सर्व धर्मांत अनेक चमत्कार तत्तद्धर्मसंस्थापकांनीं आपल्या अद्भुत शक्तीची प्रचीति लोकांस यावी ह्मणून करून दाखविल्याचे उल्लेख

आहेत. हे जर सर्व खरे आहेत असें मानणें असेल तर हे ईश्वराचे अगाध शक्तीचे निदर्शक होत असें कबूल केल्यावांचून दुसरी तोड नाहीं. अशा प्रकारचे चमत्कार या सृष्टींतील बहुतेक सर्व कोट्यांत व त्यांचे पोटभेदांत दिसून येतात.

मनुष्यजाति हें त्यांतलेंच एक कोडें आहे. या मनुष्यजातीचेही उत्पत्ति, स्थिति व लय या संबंधानें कांहीं नियम आहेत, व बहुतेक मनुष्यांची गति या नियमानुरोधानेंच होत असते हें निर्विवाद आहे. मनुष्याचे उत्पत्तीस स्त्री-पुरुषसंयोग हें कारण सर्वमान्य आहे. परंतु ख्रिस्तीधर्मप्रवर्तक **येशू**च्या जन्मास हें सर्वसामान्य कारण नाहीं असें 'पवित्रशास्त्र' सांगतें. मनुष्यास लयकालीं जडदेहत्याग करणें आवश्यक आहे हें जरी अनुभवसिद्ध आहे, तरी **तुकाराम** देहासुद्धां परधामास गेला असें लौकिक वार्तेवरून व " कीं सतनु मुक्त झाला योगाची सिद्धि हे तुकारामीं " ह्या व अशासारख्या इतर लेखांवरून सर्व संतमंडळ मानतें. मनुष्याची साधारण उंची ह्मटली ह्मणजे ६ फुटीपर्यंत फार झाली. ती देशमानाप्रमाणें कमी जास्ती आहे. परंतु ज्या देशांतील लोकांची चळण साधारणतः ठेंगणी अशा ठिकाणीं ७—८ फुट उंच पुरुष ह्मटला ह्मणजे चमत्कारच ह्मटला पाहिजे. परवां पारिस येथें चालू असलेल्या प्रदर्शनाकरितां चीन देशांतून अशाच प्रकारचा एक उंच पुरुष गेल्याचें वर्तमानपत्रांतून दृष्टीस पडत आहे. असे ईश्वराचे अद्भुत खेळ केव्हां केव्हां नजरेस येतात. अशाच प्रकारचे चमत्कार मनुष्याचे बुद्धिवैभवासंबंधानेंही दृष्टिगोचर होतात. मनुष्याचे बुद्धीविषयीं जबर मतभेद दृष्टीस पडतो. कोणी असें ह्मणतात कीं, सर्व मनुष्यांस परमेश्वरानें उपजत एकसारखी बुद्धि दिलेली असते. ती कमी किंवा जास्ती कोणासही नसते. व्यवहारांत पाहतां निरनिराळे मनुष्यांच्या बुद्धि निरनिराळ्या प्रकारच्या दृष्टीस पडतात, व एकाच प्रकारचे बुद्धींतही शक्तिभेद आढळतो. तर याजवर त्यांचें समाधान असें आहे कीं, शिक्षण व साहचर्य यांवर बुद्धिशक्तिभेद अवलंबून आहे. मूलतः बुद्धींत भेदभाव नाहीं.

आतां कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, ज्याप्रमाणें आईबापांचे प्रकृतिधर्मानुरूप पुढें त्यांचे मुलांचे प्रकृतींवर परिणाम घडतात, त्याचप्रमाणें आईबापांचे बुद्धिप्रमाणानें मुलांचे बुद्धींवर भिन्न भिन्न परिणाम दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ-एका मुलाचे आईबाप अशिक्षित आहेत, व दुसऱ्याचे शिक्षित व पक्व बुद्धीचे आहेत. तर सहजवृत्त्याच त्या

दोन मुलांचे बुद्धीमध्यें अतिशय अंतर पडेल. त्या दोन मुलांना यद्यपि प्रथमपासून एकसारखें शिक्षण दिलें व विवक्षित कालपर्यंत असाच क्रम अव्याहत ठेवला, तथापि त्या कालांतीं पाहिलें तर त्या दोहों मुलांमध्यें बुद्धीसंबंधानें शक्तिभेद स्पष्ट दिसेल. तेव्हां या मतवाद्यांचे मतीं मूलतःच बुद्धि भिन्न भिन्न असून आईबापांची संस्कृत किंवा असंस्कृत बुद्धि जशी असेल त्याप्रमाणें त्यांच्या मुलांची बुद्धि कमजास्त विशद असते. परंतु हीं दोन्हीं मतें रद्द पडतात अशा प्रकारची बुद्धि केव्हां केव्हां कांहीं पुरुषांचे ठायीं दृष्टीस पडते. आतां बुद्धिविकासाला शिक्षणादि संस्कार आवश्यक आहेत हें सर्वांस मान्य आहेच. खनिज हिरा कितीही सतेज असला तथापि शाणोल्लेखसंस्कार झाल्यावांचून त्याचे तेजाचा विकास होत नाहीं, हें अनुभवसिद्ध आहे. हीच गोष्ट बुद्ध्यादिगुणविकासालाही लागू आहे. तेव्हां गुणविकासाला संस्कार हे साधारण कारण आहेत. परंतु असे कांहीं पुरुष आढळतात कीं त्यांना केवळ तेवढे संस्कार मात्र मिळतात, पण इतर गोष्टी अनुकूल नसतात; तरी त्यांची बरोबरी, हीं दोन्हीं ज्यांस अनुकूल असतात त्यांच्या हातून होत नाहीं. असा प्रकार बुद्धीसंबंधानें विशेष पहाण्यांत येतो. अशा ठिकाणीं पूर्वोक्त दोन्हीं मतें निरर्थक होतात. अशी अचाट बुद्धि कांहीं पुरुषांत केव्हां केव्हां आढळते तेव्हां–ईश्वराची त्यांजवर विशेष कृपा–असें ह्मटल्यावांचून दुसरी तोडच नसते.

आतां प्लेटो वगैरे जे जन्मान्तरवादी आहेत त्यांचे मतें ज्ञान हें पुनःस्मरण आहे. ह्मणजे पूर्वजन्मीं जो बुद्धीवर विद्यादिकांचा संस्कार झाला होता तोच पुनः थोडासा संस्कार झाला असतां आविर्भूत होतो व त्यामुळेंच बुद्धिविकास होतो. अशाच आशयाचें आमचे इकडील प्राचीन विद्वानांचेंही मत आहे. त्यांचे मताप्रमाणें पहातां ‘ प्राक्तन ’ काय तें बलवत्तर. पूर्वजन्मीं जें प्राण्यानें दिलें घेतलें असेल त्या मानानें या जन्मीं त्याला प्राप्त व्हावयाचें; प्रस्तुत जन्मांतील संस्कार किंवा क्रिया हीं केवळ नांवाला साधनीभूत आहेत; विद्या, धन आणि बायको हीं तीन पूर्वजन्मीं जशीं दिलीं असतील तशीं मनुष्याला या जन्मीं प्राप्त व्हावयाचीं; असा त्यांचा सिद्धांत आहे. ‘ पूर्वदत्ता च या विद्या पूर्वदत्तं च यद्धनम् । पूर्वदत्ता च या भार्या ...... ॥’ असो. ह्या किंवा अशासारख्या सिद्धान्ताचें अवलंबन केल्यास कित्येक पुरुषांस जी अचाट बुद्धि

असते तिचा प्रस्तुत काळाचे संबंधानें निर्वाह लागतो. परंतु वास्तविक समाधान होत नाहीं. याचें कारण प्रस्तुत जन्म हें पूर्वजन्माचें प्रतिबिंब होय, व पूर्वजन्म त्याचे पूर्वींच्याचें होय, असें करतां करतां अगदीं प्रथम जन्मापर्यंत गेलों तर ते वेळेस ही अचाट बुद्धि त्या पुरुषास अवश्य असली पाहिजे. नाहीं तर प्रतिबिंबाचें पौन:पुन्य संभवत नाहीं. तेव्हां प्रथमजन्मीं तरी त्या पुरुषाला कां विशेष बुद्धि असावी असा सहज प्रश्न निघतो. त्याचें उत्तर–' ईश्वरेच्छा !' तेव्हां प्रथम जन्मीं काय किंवा प्रस्तुत जन्मीं काय, जर एकच उत्तर द्यावें लागतें, तर इतकी पूर्वजन्म समजण्याची खटपट तरी कशाला करावी ? असो. एतावता यापासून इतकेंच निष्पन्न झालें कीं, सृष्टीमध्यें नियम सोडून कांहीं असे प्रकार घडतात कीं, त्यांजविषयीं कांहीं समाधान होण्याजोगें सांगवत नाहीं.

जसे निरनिराळ्या सृष्टिप्रकारांत सर्व नियम सोडून अद्भुत ह्मणून एकादी गोष्ट केव्हां केव्हां घडून येते, तशीच अचाट बुद्धीची देणगी ही होय. ही देणगी फारच थोड्यांचे वांट्यास येते. असे पुरुष तुरळक तुरळक कोठें कोठें आढळतात. ह्मणूनच अशांची लोकांना फार आवड असते. अशाच पुरुषांचे कोटींतील **कृष्णशास्त्री चिपळूणकर** हे होत, हें त्यांच्या चरित्रावलोकनानें स्पष्ट कळेल. आतां शास्त्रीबोवांचें चरित्र जसें माहीत असावें तसें फारच थोड्यांस माहीत असेल; व तें लोकांना समजण्याचा कधीं सुयोग येईल तो खरा. या संबंधानें आमचे कित्येक वर्तमानपत्रकारांनीं शास्त्रीबोवांचे स्नेहीमंडळास पुष्कळ सूचना केल्या आहेत, तेव्हां या बाबतींत कांहीं विशेष लिहीत नाहीं. शास्त्रीबोवांसारख्या थोर पुरुषाचें चरित्र नि:पक्षपातानें कोणी लिहिलें तर लोकांना सद्वर्तनावलंबार्थ व दुर्वर्तनत्यागार्थ एक चांगला धडा घालून दिल्यासारखें होईल. तेव्हां शास्त्रीबोवांचे इष्टमित्रांपैकीं ज्यांस त्यांचेविषयीं विशेष माहिती असेल, त्यांनीं ती एकत्र करून व दुसरी माहिती मिळवून त्यांचें साद्यंत चरित्र रचून प्रसिद्ध करावें अशी त्यांस आमची सूचना आहे. आमचे इकडे थोड्या काळापूर्वीं कित्येक विद्वान् व लोककल्याणार्थ मनापासून झटणारे असे पुरुष निवर्तले. त्यांचें इतिवृत्त व लेख लोकांपुढें ठेवण्याचें काम कित्येक विद्वान् पुरुषांनीं अंगांवर घेतलें आहे असा वर्तमानपत्रांतून पुकारा ऐकूं आला, व त्यालाही बरेच दिवस झाले; परंतु त्याप्रमाणें आजवर कोठें फळ दृष्टीस पडत नाहीं, ही मात्र शोचनीय गोष्ट होय. त्याप्रमाणें शास्त्री-

बोवांचे चरित्राची हेळसांड होणार नाहीं असें आह्मी मनापासून इच्छितों. शास्त्रीबोवांचे चरित्रापासून शिकण्याजोग्या गोष्टी पुष्कळ आहेत असें आह्मांस जी आज थोडीशी त्यांची माहिती आहे तिजवरून वाटतें.

कृष्णशास्त्री हे पुणें मुक्कामीं आमचे शेवटचे बाजीराव ब्रह्मावर्ती प्रतिष्ठित झाल्यावर थोड्याच काळानें ह्मणजे सुमारें १८२४ सांत जन्मले. यांचे वडील गरीब स्थितींत होते. हे दरमहा चार रुपयांवर कारकुनीचे नोकरीवर होते. ज्याप्रमाणें विद्या शिकण्याचीं साधनें आज इंग्रज सरकारानें जिकडे तिकडे लहानापासून थोरांपर्यंत हवीं त्याला सुलभ करून ठेविलीं आहेत, तशीं ज्या वेळीं शास्त्रीबोवांचे शिकण्याचे दिवस होते त्या वेळीं नव्हतीं; कारण इंग्रज सरकारचा अंमल त्या वेळेस सर्वत्र बसला नसून नुकता बंदोबस्त सुरू होता. विद्या कला इत्यादिकांना उत्तेजन देणें हें इतर सर्व बंदोबस्त झाल्यावर सुचतें. त्याप्रमाणें पुणें प्रांत नवीनच इंग्रज सरकाराचे हातीं गेला असल्यामुळें, तेथें शिक्षणाच्या सोयी अझून व्हावयाच्या होत्या. शास्त्रीबोवांना प्रथमत: गांवठी शाळेंत घातलें. तेथें थोडासा अभ्यास झाल्यावर शास्त्रीबोवांच्या वेदाध्ययनास आरंभ झाला. परंतु या उरस्फोडी अध्ययनांत शास्त्रीबोवांनीं फार दिवस घालविले नाहींत. पुणें येथें विश्रामबागेंत संस्कृत पाठशाला असे. तेथें षट्शास्त्रांचा पाठ चालत असे. विद्यार्थ्यांना पाठशाळेंत येण्यास उत्तेजन यावें ह्मणून त्यांस सरकारांतून थोडें बहुत वेतन मिळत असे. या ठिकाणीं शास्त्रीबोवांनीं तीन शास्त्रांचें अध्ययन केलें. असें सांगतात कीं, शास्त्रीबोवांचे सहाध्यायी पुष्कळ विद्यार्थी होते, त्या सर्वांवर चिपळूणकरांची छाप असे. ही गोष्ट त्यांचे जे थोडे सहाध्यायी जिवंत आहेत, तेही कबूल करितात. बरें त्या मानानें कृष्णशास्त्री यांचा पाठांसंबंधानें दृढ व्यासंगही नसे. बहुतेक सर्व विद्यार्थ्यांचें उठणें बसणें निजणें विश्रामबागेंतच असे, तेव्हां शास्त्रीबोवा कितपत नेटानें अभ्यास करीत हें त्यांच्या सोबत्यांस माहीत असे. शास्त्रीबोवांचा बहुतेक वेळ खेळण्यांत व थट्टा मस्करी करण्यांत जात असे, परंतु पाठ ह्मणून दाखवितांना ज्यांनीं पाठावर पूर्ण झोड लावली असे, अशा सर्वांपेक्षां शास्त्रीबोवांचा पाठ सरस ठरे. जो पाठ शास्त्रीबोवांनीं घ्यावा त्यांत त्यांचा असा कांहीं अभिनिवेश होत असे कीं, कोणी परक्यानें तो प्रसंग पाहिला असतां त्याला असें वाटावें कीं, यांचा एकवार सर्व अभ्यास होऊन ही

पुनरावृत्ति चालली असावी. यांची बुद्धि इतकी तीव्र व पक्क असे कीं, पाठाचे वेळीं त्यांनीं सहाध्यायांच्या पुष्कळ शंका निवारण कराव्या, परंतु यांच्या शंका मात्र त्यांस निवारितां येऊं नयेत. केव्हां केव्हां अध्यापकांसही त्या शंका जाचत, असें सांगतात. आतां अध्यापक तरी कांहीं कच्च्या गुरूचे चेले होते असें नाहीं. त्यांची बुद्धिही फार विशाल व व्यापक होती असें शास्त्रिमंडळास मान्य आहे.

**मोरशास्त्री साठे** यांचे बुद्धीची ख्याति आजवर गाजत आहे. यांजविषयीं अनेक आख्यायिका आज जुन्या शास्त्रीलोकांचे तोंडून ऐकूं येतात. मोरशास्त्री हे प्रथमत: कोंकणांतून विद्याभ्यासाकरितां पुण्यास आले. व तेथें आल्यानंतर त्यावेळचे विद्वद्रत्नशिखामणि **नीलकंठशास्त्री थत्ते** यांजकडे भेटीस गेले, व अनुग्रह केल्यास आपल्याजवळ अध्ययन करण्याची इच्छा आहे अशा आशयाची यांजवळ त्यांनीं विनंती केली. मोरशास्त्र्यांचे तोंडावरूनच नीलकंठशास्त्री यांस असें वाटलें कीं, ह्यांस अध्यापन केलें असतां शिष्य नांव राखण्याजोगा आहे. यावरून शास्त्रीबोवांनीं साठे यांस पढविण्याचें कबूल केलें. नंतर साठे यांची धारणा कितपत आहे याची परीक्षा करण्याकरितां थत्ते शास्त्री यांणीं या नवीन शिष्यास घरीं जेवणास बोलाविलें. भोजनास बसण्याचे जागीं एक शिंकें टांगलेलें होतें. त्याचे खालीं जें पान आलें तें साठे यांजकरितां ठेविलें, व बाकींच्यावर इतर मंडळी बसली. साठे पानावर बसते वेळीं नीलकंठशास्त्री यांनीं वर शिंकें असल्याचें सुचविलें. पुढें जेवणास आरंभ झाला. दोन घटका सुमारें जेवण चाललें होतें. भोजनसमयीं अनेक प्रकारचे विषय निघून गोष्टी चालल्या होत्या. साठे यांस डोईवर शिंकें आहे याची विस्मृति पडावी ह्मणून थत्ते यांनीं त्यांस पुष्कळसें बोलायास लाविलें; व साठे हेही कांहीं दुर्मुख नव्हते; तेव्हां त्यांनींही पुष्कळच बोलण्याचा सपाटा चालविला. पुढें भोजन आटपलें. सर्वांनीं आपोशन घेतल्यावर जो तो आंचवायास उठूं लागला. साठे हे उंच पुरुष होते, व डोक्यावर शिंकें होतें हें लक्षांत होतें, ह्मणून उठतांना ते वांकूनच उठले. हें पाहून थत्ते यांनीं साठे यांची जी परीक्षा करण्याची होती ती केली. आतां या गोष्टींत कांहीं विशेष आहे असें कित्येकांस वाटणार नाहीं, हें खरें. परंतु आह्मांस तर ही गोष्ट फार महत्त्वाची वाटते. या गोष्टीवरून साठे यांचे धारणाशक्तीची स्थालीपुलाकन्यायानें चांगली अटकळ करितां येते. घराचीं दारें

सखल आहेत असें पुरतेपणें माहित असतां व त्यांखालून शेकडो वेळां जाण्यायेण्याचा प्रसंग असतां कित्येक वेळां डोकीं तडातड आपटल्याचा व टेंगळें आल्याचा प्रत्यय पुष्कळांस असेल. तर वेळेवर दारें सखल असल्याचें अवधान राहत नाहीं असा साधारण अनुभव आहे. तेव्हां थत्ते यांनीं साठे यांचें मन अनेक विषयांत मुद्दाम गुंतविलें असतां शिंकें डोकीवर असल्याचें त्यांचे लक्षांत राहिलें, यावरून त्यांची धारणा वर्णनीय होती असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. साठे यांच्या बुद्धि व धारणा यांविषयीं दुसरी अशी एक गोष्ट ऐकिवांत आहे कीं, साठे हे नैयायिक होते. त्यांचा व्याकरणाविषयीं व्यासंग नसल्या कारणानें त्यांस त्या विषयांत वैयाकरण हात घालूं देत नसत. एका वादप्रसंगांत तर वैयाकरणांनीं साठे यांची थोडीसी मानखंडना केली. त्यावरून मोरशास्त्री यांनीं तीन महिन्यांत व्याकरणशास्त्राचें अध्ययन करून ते वाद खेळण्यास तयार झाले. त्यानंतर व्याकरणांतही पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्यास त्यांस मनाई नसे. आतां ज्या शास्त्राचे अध्ययनार्थ कांहीं वर्षें तरी गुरुगृहीं खपावें लागतें तें दोन चार महिन्यांत तयार करण्याचें ज्यांचें सामर्थ्य, त्यांचे बुद्धीची विशालता व ग्राहकता किती ह्मणून वर्णावी! असे जे मोरशास्त्री साठे त्यांचे शिष्य हे कृष्णशास्त्री होते. शिष्याची बुद्धि गुरूचे बुद्धीहूनही विशाल आहे असें मोरशास्त्री यांचे प्रत्ययास आलें. तो प्रकार असाः—एकदा मोरशास्त्री यांचे आग्रहावरून कृष्णशास्त्री यांनीं गुरूंचे बरोबर वाद करण्याकरितां प्रतिपक्ष स्वीकारला व त्या वेळेस चमत्कार असा झाला कीं शिष्यापुढें गुरुजींचा कोटिक्रम चालेना. त्यावेळेस शिष्याची बुद्धि पाहून साठे यांस परमानंद झाला, व लागलीच त्यांनीं आपल्या अंगावरची शालजोडी काढून शिष्याचे आंगावर घातली. ठीकच आहे. सद्गुरूंची अशीच रीति आहे. “ इच्छेत्सर्वत्र विजयं शिष्यादिच्छेत्पराजयम्. ” त्या दिवसापासून मोरशास्त्री आपले सच्छिष्यास ‘ बृहस्पति ’ या नांवानें हाक मारूं लागले, व पाठशाळेंतील सर्व विद्यार्थ्यांनींही त्याच नांवानें कृष्णशास्त्री यांस ह्मणावें अशी वट ताकीद त्यांनीं फिरविली. मोरशास्त्र्यासारख्या गाढ्या विद्वानानें ‘ बृहस्पति ’ असा किताब द्यावा, तेव्हां तो ज्यास मिळाला त्याची योग्यता किती असावी हें सांगणें नको. या गुरुशिष्यांचें जोडपेंच लोकोत्तर यांत शंका नाहीं.

पुढें विश्रामबागेंत इंग्रेजी भाषा वगैरे पढविण्याचा उपक्रम चालू झाला. तेव्हां कृष्णशास्त्री यांनीं तो अभ्यास सुरू केला. इकडे पूर्वीं शास्त्राध्ययन झालें होतें,

त्यामुळें त्यांचे बुद्धीला पूर्ण पक्कता आली होती, व त्यांतून जात्याच ती विशाल व ग्राहक असल्यामुळें इंग्रेजी अभ्यास शास्त्रीबोवांस विशेष जाचला नाहीं. त्यांनीं तो अभ्यास करतेवेळीं अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, अशा अनेक शास्त्रांवरील ग्रंथांचें अध्ययन व पर्यालोचन केलें. या शास्त्रांचें परिशीलन करतेवेळीं ज्या शंका त्यांस येत असत, त्यांपैकीं पुष्कळांचें समाधान त्यांचे गुरूंचे हातून होत नसे असें सांगतात. पुढें सर अलेग्झांडर ग्रांट वगैरे मंडळींना देखील त्या शंकांचें समाधान करतां येईना असें ऐकतों. अशा जाड्या जाड्या विद्वानांना जेव्हां शास्त्रीबोवांच्या शंका दूर करवतना, तेव्हां त्या शंकांची योग्यता किती होती याचें अनुमान करणें कठिण नाहीं. ज्या बुद्धीचे अंगीं अशा शंका काढण्याची शक्ति होती, कीं ज्यांचें समर्पक समाधान करणें नांवाजलेल्या विद्वानांस जड जाई व प्रसंगवशात् होतही नसे, त्या बुद्धीची थोरवी लोकोत्तर होती यांत तिलप्रायही संदेह नाहीं. असलीं धेंडें हीं विश्वसृष्टींतील अद्भुत कोटींतच गणिलीं पाहिजेत.

विद्याभ्यास संपल्यावर त्यांस विद्याखात्यांत सरकारी नोकरी मिळाली. अखेरपर्यंत ते त्याच खात्यांत होते. त्यांस जे निरनिराळे हुद्दे मिळाले त्या सर्वांत त्यांनीं यश मिळविलें. त्यांचा मनोदय असा होता कीं पुण्याचे बाहेर म्हणून नोकरीकरितां जावयाचें नाहीं. तोही त्यांचा मनोदय अव्याहत शेवटास गेला. त्यांचेवर वरिष्ठ अधिकाऱ्यांची सदा सुप्रसन्नता असे. पुणें कालेजांत प्रोफेसर असतां व ट्रेनिंग कालेजांत प्रिन्सिपाल असतां शास्त्रीबोवांकडे पढविण्याचें काम असे. त्यांची शिकविण्याची शैली फारच नामी होती अशी त्यांचे त्या वेळचे शिष्य अद्यापि स्तुति गातात.

शास्त्रीबोवा चांगल्या प्रतीचे वक्ते असत. त्यांचे कंठांत माधुर्य अगदीं नसे, त्याला त्यांचा इलाज नव्हता. या त्यांचे कर्कश स्वराबद्दल त्यांचे सहाध्यायी त्यांची थट्टा करीत असत. पाठशाळेंतील त्या वेळच्या विद्यार्थ्यांनीं आपले गुरु-उपगुरु, सहाध्यायी यांजवर फावल्या वेळीं कांहीं पद्यें केलीं होतीं. त्यांतील कांहीं अद्याप केव्हां केव्हां ऐकण्यांत येतात. कृष्णशास्त्रीही एका पद्याचे विषय झाले आहेत. त्यांत त्या पद्यकारानें शास्त्रीबोवांचे स्वरूपवर्णन करून शेवटीं 'काकवत् कर्करायते' असें त्यांचें स्वरवर्णन केलें आहे. असा जरी स्वर होता तथापि वाद-विवादांत त्यांचा असा हातखंडा असे कीं जो पक्ष ते उचलीत, त्याचें हेतूदाहर-

णांनीं असें सयुक्तिक मंडन करीत कीं, प्रतिपक्षाला त्यांचें ह्मणणें मुकाट्यानें मान्य करण्यापेक्षां दुसरी तोंड उरत नसे. पुण्यांत कसलीही सभा होवो, तींत शास्त्रीबोवांकडे अध्यक्षत्व नाहीं, असें बहुधा होत नसे. याचें कारण शास्त्रीबोवांचें वक्तृत्व, त्यांची विद्वत्ता व विषयप्रतिपादनाची शैली हीं होत. त्यांजवळ विषयप्रतिपादनाला आवश्यक अशी इतकी निवडक माहिती असे कीं, दोन चार घटका जरी ते बोलत असले तरी पुंजी संपली असें होत नसे. शास्त्रीबोवांचें बोलणें जितकें विद्वन्मंडळाला प्रिय होत असे, तसें इतरांना प्रिय होत नसे.

शास्त्रीबोवांचे व्याख्यानादिकांपासून पुण्यग्रामस्थ लोकांस विशेष फायदा हा झाला कीं, पुष्कळ हूड, अविचारी, स्वैर अशीं मुलें बाटण्याचे रंगांत होतीं, त्यांचे मनावरचा तो परधर्मावलंबनाचा ग्रह नष्ट होऊन तीं ताळ्यावर आलीं, असा पुष्कळांचा ग्रह आहे. बंडाचे पूर्वी बाटण्याचें खूळ फार माजलें होतें तें मोडून टाकवेल तितकें टाकावें, अशा विषयींचा प्रयत्न पुणें येथें चालला होता व त्यांत शास्त्रीबोवांचेंही अंग होतें. त्या प्रयत्नाचेंच फळ ‘ विचारलहरी ’ ही होय. शास्त्रीबोवांनीं ख्रिस्ती धर्माचे खंडणार्थ वाद केल्याचें पुष्कळांचे स्मरणांत असेल. हलके सलके जे क्षुल्लक लाभवश झालेले ख्रिस्ताचे भक्त यांची शास्त्रीबोवांचे पुढें गाळण उडे यांत कांहीं नवल नाहीं. परंतु ज्यांनीं विचाराच्या कसास लावून व बारीक छानी करून ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता त्यांस शास्त्रीबोवांनीं निरुत्तर करून तोंड खालीं घालावयाला लावून त्यांची बोळवण केली असें अनेक प्रसंगीं झाल्याचें ऐकिवांत आहे. त्यांतील एका प्रसंगाविषयीं असें सांगतात कीं, ख्रिस्ती धर्म स्वीकारिलेले एक काशीकर पंडित पुणें येथें गेले होते. त्यांनीं तेथें स्वीकृतधर्मनियमाप्रमाणें उपदेशविधि सुरू केला. कृष्णशास्त्री व हे काशीकर यांचा एके प्रसंगीं वाद जुंपला. दोघेही योद्धे जबर. काशीकर ह्मणजे लहान सहान असामी नव्हते. दोघेही इंग्रजी व संस्कृत नैयायिक. ह्या वेळीं शास्त्रीबोवांचें बुद्धिवर्चस्व दृष्टीस पडलें. दोघांचाही कोटिक्रम चालतां चालतां, काशीकर पंडित हतवीर्य झाले, व अपयशाचें गाठोडें घेऊन परत गेले. या प्रसंगीं शास्त्रीबोवांना जें यश मिळालें तें त्यांच्या सत्यपक्षपातामुळें व बुद्धिवैभवामुळें मिळालें यांत संशय नाहीं; कारण काशीकर ख्रिस्ती पंडित कांहीं सामान्य व्यक्ति नव्हती. ते मोठे विद्वान्, मार्मिक, व शोधक होते. त्यांजविषयीं आह्मांस जी

थोडीशी माहिती आहे ती दिली असतां फारशी अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. कारण त्या योगें शास्त्रीबोवांचेप्रतिपक्ष्याची खरी योग्यता कळेल व शास्त्रीबोवांना वादांत जें यश मिळालें तें किती योग्यतेचें होतें याची चांगली कल्पना करितां येईल.

शास्त्रीबोवांचे प्रतिपक्षी हे काशीचे राहणार. यांचें नांव पूर्वाश्रमसांप्रदायाप्रमाणें वे० शा० सं० नीलकंठशास्त्री गोरे. यांनीं प्रथमत: थोडेंसें वेदाध्ययन करून नंतर व्याकरण व न्याय अशा दोन शास्त्रांचा अभ्यास केला. अभ्यास चालला असतां खिस्तीधर्मखंडनाकडे यांचें मन वळलें. याला कारण रस्त्यांत उभे राहून उपदेश करणारे ख्रिस्तभक्त झाले. त्यांच्या चालीप्रमाणें ते हिंदुधर्माविरुद्ध अद्वातद्वा हवें तसें बोलत. तें नीलकंठशास्त्री व त्यांचे सहाध्यायी यांस न रुचल्यामुळें त्यांनीं हिंदुधर्ममंडन व ख्रिस्तीधर्मखंडन यांविषयीं तोंडी व लेखी वादविवाद सुरू केला. त्या संबंधानें त्यांनीं संस्कृतांत व हिंदींत पुस्तकें लिहिलीं होतीं, व तीं छापून प्रसिद्धही झालीं होतीं. पुष्कळ वेळां खिस्तभक्तांचें शास्त्री मजकूर याणीं खंडन केलें. ख्रिस्ती शास्त्राचें चांगलें पर्यालोचन केल्याविना ख्रिस्तभक्तांचे दांत त्यांच्याच घशांत घालतां येत नाहींत, असें गोरे शास्त्री यांस वाटून त्यांनीं तें शास्त्र वाचण्याचें सुरू केलें. याच सुमारास इंग्रेजी भाषा शिकावी अशाविषयीं त्यांची प्रवृत्ति झाली. बायबल वाचणें त्या उद्देशास चांगलें साहाय्यक झालें. खंडन करण्याचे उद्देशानें जरी ते बायबल वाचूं लागले तथापि कांहीं काळानें, ‘ पवित्र आत्म्या ’ नें त्यांजवर झडप घातली. हिंदु धर्मावरची त्यांची श्रद्धा उडाली. खिस्तावांचून त्यांस अन्य तरणोपाय दिसेना. कदाचित् असच्छास्त्रावलोकनानें बुद्धिभ्रंश झाला असेल असें मनाला वाटून त्यांनीं चंडीपाठ वगैरे अनुष्ठानें सुरू केलीं. परंतु त्यांमुळें मन ताळ्यावर न येतां अधिकच भकलें. तेव्हां खिस्ती धर्माचे सत्यतेची पूर्ण साक्ष मनाला पटून पूर्ण विचारान्तीं आपले वयाचे पंचविसावे वर्षी त्यांनीं खिस्तीधर्मदीक्षावलंब केला. तेव्हांपासून त्यांचें पूर्वाश्रमांतील नांव रद्द होऊन प्रस्तुत धर्मानुकूल असें ‘ रेव्हरेंड निहिमाया गोरे ’ हें नांव त्यांनीं धारण केलें आहे. या काशीकर पंडिताच्या त्रोटक माहितीवरून कृष्णशास्त्रीबोवांस ज्या प्रतिपक्ष्याशीं झुंजावयाचें होतें तें फार जाडें प्रकरण होतें असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. खिस्ताच्या कळपांत हें धेंड कसें सांपडलें याचें

नवल वाटतें. हे नीलकंठशास्त्री पुन: थोड्या दिवसांपूर्वी पुण्यास आले होते. परंतु पुन: कोणाशींही त्यांचा वादप्रसंग घडल्याचें ऐकिवांत नाहीं. प्रस्तुत हे मध्यप्रांतांत पालक आहेत. असो. या गोष्टीवरून कृष्णशास्त्री यांची सयुक्तिक कोटिक्रम करून प्रतिपक्ष्याचा मोड करण्याची शैली वर्णनीय होती असें निर्विवाद सिद्ध होतें.

मराठी भाषेला शास्त्रीबोवांनीं नांवारूपास आणण्याकरितां फार प्रयत्न केले. 'ज्ञानप्रकाश' व 'शाळापत्रक' यांचे द्वारें मराठी भाषेंत अनेक विषयांचें उद्घटन करून लोकांना आपले अमोलिक विद्वत्तेचा त्यांनीं लाभ करून दिला. त्यांशिवाय त्यांनीं संस्कृत व इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें करून शुद्ध मराठी भाषा कशी लिहावी, याचें चांगलें वळण लावून दिलें. शास्त्रीबोवांची सरळ, सुगम, मार्मिक व शुद्ध लिहिण्याची सरणी खरोखर अनुकरणार्ह आहे. विषयानुरूप भाषा बोलतां येऊन पुन: ती समजण्यास कठिण वाटूं नये असें लिहिणें किती कठिण आहे हें सांगणें नलगे. परंतु शास्त्रीबोवांनीं ह्मणून जे जे विषय हातीं घेतले, त्यांना साजेल व वाचकांस तर नडणार नाहीं अशीच भाषेची सरणी ठेविली आहे. यामुळें शास्त्रीबोवांचे ग्रंथ सर्वत्र प्रिय झाले आहेत. शास्त्रीबोवांचे सात आठ ग्रंथ आज प्रसिद्ध आहेत, परंतु हे सर्व भाषांतररूप आहेत. त्यांनीं स्वतंत्र ह्मणून एकही ग्रंथ लिहिला नाहीं. आतां शास्त्रीबोवांसारख्या विशाल बुद्धीच्या गाढ्या विद्वानानें स्वत:चे बुद्धीचें व विचारांचें फळ ह्मणून स्वतंत्र ग्रंथ लिहिणें अवश्य होतें. परंतु त्यांनीं तसल्या प्रकारचा यत्न केल्याचें ऐकिवांत नाहीं. स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यास शास्त्रीबोवांस जितकी अनुकूलता होती तितकी दुसऱ्यास मिळणें फार कठिण आहे. कारण शास्त्रीबोवांसारखी बुद्धीच फार थोड्यांस आहे. तशांतून शास्त्रीबोवांप्रमाणें उत्कृष्ट गुरूंजवळ गहन विषयांचें अध्ययन करण्यास मिळणें कठिण. या सर्वांत ज्या भाषेंत ग्रंथ लिहावयाचे त्या भाषेचें पूर्ण मार्मिक ज्ञान व जेथें त्या भाषेचें उत्कृष्ट स्वरूप सदोदित ढळढळीत दृष्टीस पडतें अशा ठिकाणीं राहणें, इत्यादि सामुग्री सिद्ध असतां शास्त्रीबोवांनीं स्वतंत्र ग्रंथ लिहिले नाहींत याचें इंगित कळत नाहीं. कदाचित् त्यांनीं तसे ग्रंथ लिहिले असून आपले मरणोत्तर प्रसिद्ध व्हावे अशा संकेतानें ते गुप्त ठेविले असतील, तर आमचें कांही ह्मणणें नाहीं. परंतु तसा जर प्रकार नसेल तर शास्त्रीबोवांनीं पुष्क-

त्यांचा आशाभंग केला असें ह्मणणें भाग पडतें. आतां भाषांतररूपानें कां होईनात जर सात आठ ग्रंथ लोकांस शास्त्रीबोवांनीं सादर केले तर लोकांनीं तेवढ्यांतच संतोष मानावा असें कित्येक ह्मणतील. परंतु दात्याचे ऐपतीच्या प्रमाणानें याचकांची उडी व आशा, हें तत्त्व व्यवहारसंमत आहे. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांचे लोकोत्तर बुद्धि-वैभवावरून त्यांजकडून व्याकरण, न्यायशास्त्र, मानसशास्त्र, व अर्थशास्त्र ह्या किंवा अशासारख्या दुसऱ्यास सहसा व सहज न झेंपणाऱ्या विषयांवर स्वतंत्र ग्रंथ होतील अशी आशा लोकांची होती, ती सकारण आहे असें कोणीही कबूल करील. आतां शास्त्रीबोवांचे लेखांमुळें मराठी भाषेस बरीच ऊर्जित कळा आली हें प्रत्येकास प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. परंतु एवढ्यावरून शास्त्रीबोवा ऋण-मुक्त झाले असें मात्र ह्मणवत नाहीं. परंतु आतां या ह्मणण्याचा काय उपयोग? तेव्हां ज्या कोणास ह्यावरून सद्बोध ग्रहण करण्याचा असेल त्यांनीं विलंब न लावतां उद्योगास लागावें. कारण काळाचा बडगा कोणावर केव्हां पडेल याचा नियम नाहीं. प्रत्येकानें आपापल्या शक्त्यनुसार ऋणत्रयांतून मुक्त होण्यास झटावें एवढें येथें सुचविणें पुरे आहे.

शास्त्रीबोवा हे कवि होते हें त्यांचे ‘ पद्यरत्नावली ’ वरून सर्वांस विश्रुत असे-लच. यांची कवित्वशक्तीचे संबंधानेंही लोकोत्तरबुद्धि होती, असें **अरुणोदय**-कारांनीं “ वृक्ष आणि पक्षी यांचा संवाद ” या लहानशा शतपद्यात्मक काव्या-विषयीं जी गोष्ट लिहिली आहे, तिजवरून पूर्ण खात्री होते. ज्ञानप्रकाशाचे माल-कांनीं खिळ्यावर तें पत्र काढण्याचा विचार करून खिळे वगैरे सामान आणविलें. परंतु अक्षरांखालीं व वर लागणारीं कांहीं चिन्हें—उ, ऊ, ऋ, ॠ, ए, ऐ इ०—आलीं नव्हतीं. याच सुमारास एक चांगला मुहूर्त आला. त्यावर कारखाना सुरू करावा असें सर्वांचे विचारानें ठरलें. परंतु सदरीं सांगितलेलीं चिन्हें हातीं नसल्या कारणानें कांहीं मजकूर छापण्याचा इलाज नव्हता. तेव्हां या निर्दिष्ट चिन्हांची ज्यांत आवश्यकता लागणार नाहीं असा कांहीं मजकूर शास्त्रीबोवांनीं लिहून द्यावा असा सर्वांचा आग्रह पडल्यावरून त्यांनीं पूर्वनिर्दिष्ट विषयावर एका तासांत १०० पद्यें करून दिलीं, व ज्ञानप्रकाशाचे मालकांचा हेतु तडीस नेला. आतां या अलौकिक बुद्धीची तारीफ तरी किती करावी! निरोष्ठ, लघ्व-क्षरी रामायणें **पंतांनीं** रचलीं याबद्दल त्यांची वर्णना त्यांचे भक्त गाताहेत. परंतु

पंतांना हवा तितका वेळ होता, परंतु शास्त्रीबोवांना तितकी फुरसतही नव्हती. पंतांची बुद्धि विशाळ हें तर सर्वमान्यच आहे, परंतु त्याहूनही कृष्णशास्त्र्यांची कितीपट विशाल ह्मणावी याचें अनुमान करणें कठिण आहे. आमचे लोक खरोखर अरसिक यांत शंका नाहीं. आजवरही यांचे बुद्धिवैभवाची गोष्ट लोकविश्रुत नसावी व ज्ञानप्रकाशानें देखील या अपूर्व प्रसंगाचा उल्लेख करूं नये हें आमच्या लोकांच्या अरसिकत्वाचें निदर्शक होय. हा प्रकार जर इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत झाला असता, तर शास्त्रीबोवांचे कीर्तीस पारावार न उरता, आणि अशा प्रसंगीं तिकडील गुणग्राही लोकांस शास्त्रीबोवासारख्या पुरुषास कोठें ठेवूं, कोठें नाहीं, असें झालें असतें. इंग्लंडांतील राजाश्रित कवि **टेनिसन्** यांनीं कोठें दहापांच पद्यें एकाद्या मासिक पुस्तकांत छापण्यास दिलीं तर त्यांस हजारों रुपये मिळतात, असें आपण पुष्कळ वेळां वाचलें आहे. परंतु कृष्णशास्त्री यांनीं असा चमत्कार केला तरी त्याची आह्मांला दादही नसावी हें खरोखर भूषणावह नव्हे! असो. विशेष लिहिणें इष्ट नाहीं; कारण त्यांत आमचेंच मौर्ख्यवर्णन करणें आहे. आतां इतकीच सूचना आहे कीं, ज्ञानप्रकाशकार किंवा त्यांच्यासारख्या दुसऱ्या कोणी विद्वानानें शास्त्रीबोवांचे आजवर प्रसिद्ध झालेले सर्व लेख एकत्र करून छापवावे, ह्मणजे त्यायोगें त्यांचे लोकांवर उपकार होतील.

आतां शास्त्रीबोवा जरी शीघ्रकवि होते, तरी त्यांना आपले योग्यतेचा भरंवसा नसे. त्यांनीं आपली ‘ पद्यरत्नावली ’ प्रसिद्ध करण्यापूर्वीं आपले इष्टमित्रांकडे तिची प्रत पाठवून तिजविषयीं त्यांचे अभिप्राय मागितले होते असें ऐकतों. जेव्हां लोकांपुढें ठेवण्यालायक ही कविता आहे असें शास्त्रीबोवांचे इष्टमित्रांचें मत मिळालें तेव्हां त्यांनीं ती पद्यावली प्रसिद्ध केली. थोरांचें सर्व कांहीं थोर यांत संदेह नाहीं. कालिदासासारख्यांना देखील स्वतःचे बुद्धीचा विश्वास नसे. ‘ बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ’ ठीकच. उथळ पाण्याला खळखळ फार असते. खोल पाणी संथ वाहतें यांत नवल मानण्यास जागा नाहीं. तेव्हां स्वतःचे बुद्धीविषयीं शंका यावी हें शास्त्रीबोवांच्या थोरपणाचें लक्षण होय.

शास्त्रीबोवांचें लोकसमूहाचे हिताकडे चांगलें लक्ष असे. लहानापासून थोरांपर्यंत ह्यांस सर्व मंडळी चाहत असत. यांचें मत बहुतेक सर्व सामाजिक कामांत घेत असत. यांस दुरभिमान बिलकुल नसे.

कृष्णशास्त्री निःसीम मातृभक्त होते. ते एवढ्या योग्यतेस चढले होते, तरी आपल्या आईशीं शेवटपर्यंत एकाद्या अगदीं लहान मुलाप्रमाणें वागत. त्यांनीं आपल्या मातुश्रीची अवज्ञा ही कधीं केलीच नाहीं. आपल्या आईची आज्ञा मानणें हें आपलें कर्तव्यकर्म अत्यंत महत्त्वाचें आहे असें ते समजत, आणि त्याप्रमाणें वागत. त्यांस काळजाच्या रोगाची व्याधि तीन चार वर्षांपासून होती. तिजपासून त्यांस इजा होऊं लागे तेव्हां स्वतःच्या मरणाचें भय, त्यांस आईच्या संबंधानें, फार वाटे. ती त्यांची आई एक दोन वर्षांपूर्वीं निवर्तली, त्या वेळीं चिपळूणकर आपल्या एका आप्तापाशीं बोलले कीं, ' आतां आमची तयारी आहे.' ही गोष्ट आह्मांस आमच्या एका पुणेकर मित्रानें सांगितली.

लहानाचें मोठें होणें, विद्याभ्यास करणें, लहान पायरीपासून हळू हळू मोठ्या योग्यतेस चढणें, सर्व प्रकारच्या सभांमध्यें अध्यक्ष होणें, आपल्या बोलण्याकडे सर्व महाराष्ट्रभाषी लोकांचें चित्त ओढून घेणें, आणि उत्तम वक्ता ह्मणून वाहवा मिळविणें, इतक्या गोष्टी शास्त्रीबुवांनीं पुण्यग्रामीं करून शेवटीं देह तेथेंच ठेविला. असे पुरुष वारंवार निपजावयाचे नाहींत.

विलक्षण बुद्धि ही शास्त्रीबुवांस परमेश्वराची अप्रतिम देणगी होती. ते मोठे जबरे वाचणारे होते. आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, ते दररोज निदान मोठ्या पुस्तकाचीं शें दोनशें पत्रें वाचीत असत. त्यांची स्मरणशक्ति अनुपम होती. कोणत्याही विषयावर ते बोलूं लागले ह्मणजे त्यांस दृष्टांत असे भराभर सुचत कीं, तो विषय ऐकणाऱ्यांच्या मनांत भरण्यास मुळींच उशीर लागत नसे.

कृष्णशास्त्री निस्पृह होते. दुसऱ्याचे मर्जीखातर, आपले खरे अभिप्राय एकीकडे ठेवून, प्रसंग पाहून बोलणें, हें त्यांस मुळींच ठाऊक नव्हतें. परंतु, हें जग पडलें लुडबुड्यांचें. ह्मणून ते सरकारी नौकरीमध्यें आपल्या योग्यतेप्रमाणें महत्पद पावले नाहींत.

सत्यप्रीति आणि परोपकारबुद्धि हे गुण शास्त्रीबुवांचे ठायीं उत्तम प्रकारें वसत होते. वादांत कोणीं त्यांचा असो कीं परका असो, त्यांनीं नेहमीं आपला खराखरा अभिप्राय द्यावा, आणि होईल तितकें दुसऱ्याला साह्य करावें, हें त्यांचें ब्रीद होतें.

असे शास्त्रीबोवांमध्यें अनेक वर्णनीय गुण होते. तेणेंकरून शास्त्रीबुवा हे सगळ्या महाराष्ट्र देशास अत्यंत भूषणप्रद झाले होते. हे गुण प्रदर्शित करणारीं अनेक कृत्यें त्यांचे हातून घडलीं आहेत. त्यांचें साद्यंत वर्णन करणें हें आह्मी त्यांच्या चरित्रकारांकडे सोंपवितों.

मोक्षमुल्लर ह्या विद्वान् पुरुषानें बन्सेन् ह्या नामांकित जर्मन गृहस्थाचें चरित्र थोडक्यांत लिहिलें आहे. त्याच्या शेवटीं त्यानें असें ह्मटलें आहे कीं, "मरण पावलेल्या थोर मित्रांच्या गुणांचें वर्णन करावें, त्यांच्या नांवांस बहुमान द्यावा, आणि त्यांकरितां शोक करावा, हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे, असें कोणी समजूं नये; तर त्या मृत मित्रांच्या इच्छा काय होत्या, आणि कोणत्या चांगल्या गोष्टी करण्याविषयीं त्यांचा आग्रह होता, तें पूर्णपणें समजून घेऊन त्या इच्छांप्रमाणें चालणें आणि त्या गोष्टी करण्याविषयीं झटणें हें आपलें पवित्र आणि उत्तम कर्तव्यकर्म होय." हें कृष्णशास्त्र्यांच्या मित्रांनीं आणि एकंदर महाराष्ट्रजनांनीं मनांत ठेवून त्याप्रमाणें वर्तावें.

अशा प्रकारचा पुरुष पुन: मिळणें फार दुर्लभ. शास्त्रीबोवांची जागा कोण व केव्हां भरील ती भरो. परंतु तसा पुरुष आज दिसत नाहीं. अशा व्यक्ति वारंवार होत नाहींत. तेव्हां शास्त्रीबोवांचे मरणानें जी आज महाराष्ट्राची हानि झाली आहे तिची भर कशानेंही आज होईलसें दिसत नाहीं. तर उपाय मिळून इतकाच कीं

"ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें ।
चित्तीं असों द्यावें समाधान ॥"

**तुकाराम.**

# कै. सौभाग्यवती डाक्टर आनंदीबाई जोशी.



कष्टें काया झिजवावी । उत्कट कीर्ति उरवावी ।
चटक लावून सोडावी । कांहीं एक ॥—**रामदास.**

**श्रीसमर्थांनीं** जेव्हां हा उपदेश लिहिला तेव्हां त्यांचा उद्देश हा उपदेश महाराष्ट्रीय जनांनीं आदरावा असा असावा. कारण **दासबोध** ग्रंथ लिहिण्याचा मूळ हेतु प्रत्यक्षत: शिवाजी व तत्कालीन त्यांचे इतर शिष्य यांस राजकीय व पारमार्थिक उन्नति शिकवावी व परोक्षत: इतर सर्व महाराष्ट्रीयांसही सद्बोध करावा असा होता, ही गोष्ट सर्वसंमत आहे. आपल्या उपदेशाप्रमाणें वागणारे कांहीं लोक निघतील व यथाशक्ति आपल्या देशाचे पांग फेडतील, व स्वत: कृतार्थ होऊन दुसऱ्यासही कृतार्थ करतील, असें समर्थांस वाटलें असावें. व त्याप्रमाणें आज दोनशें वर्षांत समर्थांचे शिष्य ह्मणवून घेण्यास योग्य असे कांहीं पुरुष निपजले, व पुढेंही निपजतील. नुसता भगवा पटका बांधला व हातांत कुबडी

घेतली, **मनाचे श्लोकां**पैकीं दहा पांच श्लोक पाठ केले, व 'जय जय रघुवीर समर्थ' ह्मणून ललकारलें, ह्मणजे मनुष्य **रामदासी** किंवा **स**मर्थांचा शिष्य झाला असें नाहीं. महाराष्ट्रांत, विशेषत: साताऱ्याच्या आजूबाजूस, तसले शिष्य पायलीचे पंधरा मिळतात. परंतु **दासबोधां**तच शिष्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत, तशा प्रकारचा जो असेल तोच 'समर्थांचा शिष्य' या पदवीस योग्य होय. जो आपल्या वागणुकीनें, आचरणानें व कृतीनें जो उपदेश घेतला असेल त्याची सार्थकता करून दाखवील, तोच सच्छिष्य. या जगांत चांगला पदार्थ फार थोडा आणि ह्मणूनच त्याची किंमत फार. त्याच मानानें सच्छिष्यही फार कमी, आणि ह्मणूनच त्यांचें विमल यश अजरामर राहतें. नाहीं तर, ज्यांच्या येण्याचा हर्ष नाहीं आणि जाण्याचा खेद नाहीं, असल्या शिष्यांची लाखोली वाहायाची असली तरी देखील तितके शिष्य मिळण्यास अडचण पडणार नाहीं. असो. आपल्या उपदेशाप्रमाणें वागणारे कांहीं सच्छिष्य उत्पन्न होतील असें **स**मर्थांस खास वाटलें असावें. परंतु महाराष्ट्रांतील स्त्रियांपैकीं एकतरी आपल्या उपदेशाप्रमाणें सर्वस्वीं वागून आपल्या हताश देशाचे पांग फेडण्याकरितां तीन हजार कोसांवर परमुलखांत जाऊन विद्यासंपादन करून येईल, उत्कट कीर्ति उरवील, व कांहीं एक चटक लावून सोडील, व ती आपली 'सच्छिष्या' ह्मणवून घेण्यास योग्य होईल, असें हा वरील उपदेश लिहितेवेळीं **स**मर्थांचे मनांत तरी आलें असेल काय ? खचित आलें नसेल. असे विचार येण्यास **स**मर्थांच्या काळची स्त्रियांची स्थिति अनुकूल नव्हती, व अजूनही नाहीं. तथापि जर आज **स**मर्थ जीवंत असते तर ज्याप्रमाणें 'शिवबा' चीं कृत्यें, गुण व भक्ति हीं मनांत येऊन व त्याचें उपदेशानुरूप वर्तन पाहून ते पुलकितगात्र व आनंदाश्रु-परिप्लुतनेत्र होत असत, त्याप्रमाणें या देशांत आणि परदेशांत जागत असलेल्या या 'सच्छिष्ये' च्या अपूर्व व अलौकिक गुणसमूहाकडे पाहून त्यांची खचित स्थिति झाली असती. **स**मर्थांचे जे खरे शिष्य आहेत—नुसते नामधारी व वेषधारी नव्हत—ते आपल्या ह्या गुरुभगिनीचें अपूर्व व स्तुत्य चरित्र पाहून गर्वरहित होत्साते मन:पूर्वक तिचे धन्यवाद गाताहेत.

आतां कोणी ह्मणतील—व त्यांचें ह्मणणें खरें आहे—कीं आपल्या हिंदु समाजांत गुरूपदेश घेण्याचा संप्रदाय बहुतेक जातींत पुष्कळ फैलावला आहे, व

स्त्रिया बहुधा अज्ञान व ह्मणूनच फार श्रद्धालु असल्याकारणानें त्यांच्यांत तर गुरु करण्याचें वेड अत्यंत पसरलेलें दृष्टीस पडतें. या हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं प्रांतांत हें गुरु करण्याचें वेड इतकें माजलें आहे कीं, तिकडे बहुतेक पुरुष आणि बहुधा सर्वच स्त्रिया हीं गुरुपदेश घेतलेलीं आढळतील. आषाढ शुद्ध पूर्णिमा हा गुरुपूजेचा दिवस मानलेला आहे. त्या दिवशीं गुरुपूजेकरितां तिकडे प्रत्येक घरांतील सर्व स्त्रिया—मग त्या सधवा असोत किंवा विधवा असोत—गुरुगृहीं जात असतात, व ज्या गांवांत शिष्यसमुदाय सधन व पुष्कळ आहे अशा गांवीं प्रतिवर्षीं गुरुमहाराजांची स्वारी पूजाग्रहणार्थ येत असते. असा प्रकार जर सर्व हिंदुस्थानभर आहे तर समर्थांस समाधिस्थ झाल्यास आज दोनशें वर्षें होऊन गेलीं असून इतक्या काळांत आनंदीबाईसारखी समर्थांची सच्छिष्या कोणी झाली नाहीं असें जें आमचें ह्मणणें आहे त्याचा आह्मी निर्वाह कसा करितों? तर याचें उत्तर इतकेंच कीं, रामदाससंप्रदाय ह्मणून जो महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे त्या संप्रदायाच्या शिष्यिणी पुष्कळ आहेत. कांहीं विधवा शिष्यिणी भगवी छाटी पांघरून आपण रामदासी बाण्याच्या आहोंत असें वेषावरूनही दाखवीत असतात. स्वामींच्या हयातींत त्यांच्याजवळ सज्जनगडीं आकाबाई व वेणूताई ह्मणून दोघी शिष्यिणी खास स्वामींच्या मठांत राहत होत्या ही गोष्ट आमच्या स्मरणांत आहे. रामदासनवमीचे ( ह्मणजे माघ वद्य नवमीचे ) दिवशीं सज्जनगडास प्रसादाकरितां हजारो शिष्य व शिष्यिणी गोळा होत असतात. याहीपेक्षां आणखी एक विशेष प्रकारची समर्थांची शिष्यीण आह्मी पाहिली आहे. एक पंढरपुराकडील देशस्थ ब्राह्मणाची १५।१६ वर्षांची मुलगी पुरुषवेष धारण करून खांद्यावर कावड घेऊन तीर्थयात्रा करीत असते. ती रामदासी आहे, ह्मणजे सज्जनगड येथील समर्थांच्या समाधीशीं तिचा विवाह झाला आहे, असें तिनें सांगितलें. समर्थ वडील मंडळीचें मन मोडून ‘सावधान’ ह्मणण्याच्या वेळेस पळून गेले व यावज्जीव तर ब्रह्मचर्यानें राहिले. पण त्यांच्या शिष्यांनीं व शिष्यिणींनीं त्यांस विवाहित्वाचा टिक्का लावण्याकरितां—व जणू त्यांचा प्रतिज्ञाभंग करण्याकरितां कीं काय—त्यांच्या समाधीशीं मुलीचें लग्न लावण्याची अपूर्व शक्कल काढली आहे! तर अशा प्रकारच्या शिष्यांस व शिष्यिणींस आमच्यानें सच्छिष्यकोटींत गणवत नाहीं. त्यांस एका अर्थी गुरुद्रोही ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. आपल्या गुरूच्या उपदेशाचें खरें हृद्य काय

आहे हें नीट समजून घेऊन त्याप्रमाणें जो वागतो व उपदेशाची सार्थकता करतो तोच सच्छिष्यकोटींत गणला पाहिजे. **समर्थांच्या** उपदेशाची दिशा व हृद्य हीं रामदासी संप्रदायवाल्या शिष्यमंडळीपैकीं फार थोड्यांना कळलीं असावीं, असें त्या शिष्यमंडळीच्या आचरणावरून दिसतें. शिवाजी, थोरले बाजीराव वगैरे ज्यांच्याठाईं त्यांचा उपदेश पूर्णपणें बिंबला ते तर सर्वतोमुखीं त्यांचे सच्छिष्य ह्मणून ह्मटले जात आहेत. ज्याप्रमाणें महाराष्ट्रांत कांहीं पुरुष **समर्थांचे** सच्छिष्य झाले व आज आहेत, त्यांप्रमाणें सच्छिष्या ह्मणण्यास योग्य अशी आनंदीबाईवांचून दुसरी बाई आह्मांस आढळली नाहीं व पूर्वी झाली असल्यास आह्मांस माहित नाहीं. ह्मणूनच आमच्या मतीं महाराष्ट्रांत तीच **समर्थांची** एकटी सच्छिष्या होय. कारण **समर्थांच्या** वर उतरून घेतलेल्या उपदेशाचें खरें हृद्य तिलाच कळलें, व तिनें आपल्या आचरणानें उपदेशसार्थक्य केलें, व ती आपण कृतार्थ झाली.

आतां असा प्रश्न सहज निघेल कीं, आनंदीबाई जोशी ही बाई तर ज्यांस हल्लीं 'सुधारलेले' असें निंदाद्योतक विशेषण लावतात त्या वर्गांतील स्त्री होती; तर मग ती गुरु करण्याच्या नादांत कशी पडली ? व विशेषतः **समर्थांसारख्या** जुन्यापुराण्या गुरूच्या उपदेशाकडे तिच्या मनाची कशी प्रवृत्ति झाली असावी ? तर त्यावर आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, जे सुधारक लोकांवर निंदेचा इतका भडिमार करतात ते विषय पुरता समजून न घेतां तोंडास येईल तें व मनास मानेल तें बोलतात. 'जनाननेकः करमर्पयिष्यति' असें समजून स्वस्थ बसण्याखेरीज अशा लोकांपुढें दुसरा इलाज नाहीं. जर ते निंदक लोक निःपक्षपातबुद्धीनें सुधारक लोक व त्यांचीं आचरणें पाहतील तर त्यांच्या संबंधानें त्यांस वरीलसारखे कुतर्क काढण्यास अवसरच सांपडणार नाहीं. प्रस्तुत प्रश्नासंबंधापुरता जरी विचार केला तरी असें आढळेल कीं, बहुतेक सुधारक मंडळीस गुरुमहिमा, गुरुभक्ति, गुरुदीक्षा व गुरुपूजा हीं सर्व प्रकरणें माहित आहेत, व त्या बहुतेक लोकांनीं गुरु केलेला आहे. मात्र जुना विधि नसून नवीन प्रकारचा विधि त्यांच्यांत आढळतो. 'नवविधान' ह्मणून जी ब्राह्मधर्माची नूतन शाखा ब्रह्मानंद केशवस्वामींनीं स्थापित केली आहे तींत तर गुरुपूजादि प्रकार जुन्या धर्तीवर होऊं लागला होता. तेव्हां आनंदीबाई जरी सुधारलेल्या कोटींतील होती तरी तिनें **समर्थांचा**

उपदेश घ्यावा व त्यांची सच्छिष्या व्हावें यांत नवल मानण्याजोगें कांहीं नाहीं. प्रभु येशू ख्रिस्त, रामदास, पंडित दयानंद सरस्वती वगैरे लोकांना जे कोणी पारमार्थिक गुरु समजत असतील ते समजोत. परंतु वास्तविक प्रकार कांहीं अगदीं निराळा होता असें मोठ्या मोठ्या विचारी व समंजस लोकांचें ह्मणणें आहे. तेव्हां पारमार्थिक दृष्टीनें आनंदीबाई **स**मर्थांची सच्छिष्या होती असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल कटाक्ष नाहीं. मात्र ज्या प्रकारचा व ज्या धोरणाचा उपदेश **स**मर्थांनीं केला त्याचें खरें हृद्य तिला कळलें व त्याप्रमाणें तिनें कृतिही करून दाखविली, ह्मणून तिला **स**मर्थांची 'सच्छिष्या' असें आह्मी ह्मणतों.

आतां आनंदीबाईनें दीक्षा कोणाकडून घेतली व कधीं घेतली व कोणता मंत्र घेतला, तो मंत्र पाळला कसा, व त्याबद्दल तिला काय काय साधनें करावीं लागलीं, वगैरे बद्दलचा त्रोटकसा इतिहास आह्मी देतों. कारण विस्तृत देण्यापुरती आह्मांजवळ सामुग्री नाहीं, व काळ व स्थळही नाहीं. आनंदीबाईचें माहेरचें नांव यमुना. तिचें जन्म पुणें येथें तिच्या आजोळीं शके १७८७ त रामनवमीस झालें. हा रामनवमीचा योगही लक्षांत ठेवण्याजोगा आहे; कारण डोहाळ्यावरून मुलाची परीक्षा होते, तशाच प्रकारानें जन्मदिवसावरून मूल कोणत्या संप्रदायाचें व प्रकारचें होईल याचा अंदाज करतां येतो, असें जुन्या लोकांचें ह्मणणें आहे. त्या शिवाय **स**मर्थांचेंही जन्म रामनवमीसच झालें. तिचें लग्न तिचे वयाच्या १० वे वर्षीं रा. रा. गोपाळराव जोशी संगमनेरकर यांच्याशीं झालें. तिच्या सासरमाहेरच्या घरचें आडनांव जोशी. परंतु दोन्हीं घराणीं भिन्नगोत्री असल्याकारणानें दोहोंत विवाहसंबंध होण्यास कांहीं अडचण नाहीं. आनंदीबाईचें लग्नापूर्वीचें चरित्र कांहीं विशेष स्मरणीय नाहीं. जशीं घरचीं इतर चार मुलें होतीं तशी ही एक पांचवी. आणि वास्तविक पाहिलें असतां तें वयही कांहीं विशेष स्मरणीय कृति हातून व्हाव्या असें नाहीं. जान स्टुअर्ट मिल्ल, ज्ञानेश्वर, किंवा कोल्हापूर येथील एका प्रेमांधानें लिहिलेल्या 'अद्भुतबालकरमणीयचरित' नांवाच्या गद्यपद्यमय लहानशा पुस्तकाचा नायक राम, यांसारख्या गर्भबुद्धिमती व्यक्तींची व गर्भश्रीमंतांच्या मुलांची बाललीला देखील अत्यंत स्मरणीय व चिंत्य असते तो प्रकार निराळा. परंतु आनंदीबाई दोनही कोटींतली नसल्याकारणानें तिच्या हातून त्या वयांत कांहीं विशेष झालें नाहीं, किंवा तिच्या जवळच्या लोकांस तें

लक्षांत बाळगावें असें वाटलें नाहीं. या दोहोंपैकीं कांहीं तरी एक प्रकार झाला असावा. तशांतून आणखी कांहीं वर्षे आनंदीबाई वांचती व विशेष नांवालौकिकास चढती तर तिच्या नातलगांनीं व इष्टमित्रांनीं तिच्या वैभवसूचक कांहीं गोष्टी–कांहीं वास्तविक, कांहीं संभवनीय व कांहीं काल्पनिक–तिच्या चरित्रांत गोवण्याकारितां सादर केल्या असत्या, व एकादा मुलींच्या शाळेचा मास्तर असें सांगण्यास पुढें सरसावला असता कीं ‘ मला तेव्हांच वाटत होतें कीं आज जरी हिचें लक्ष शिकण्यावर नाहीं तरी ही पुढें फारच नांवालौकिकास चढेल. ’ आह्मी ह्मणतों असा प्रकार अजून ह्मणजे होणार नाहीं असें नाहीं. निदान तूर्त मात्र तिच्या बाललीलेची आह्मांस माहिती मिळाली नाहीं. असो.

तिचें लग्न झाल्यानंतर तिच्या मतीच्या अनुषंगानें तिच्या चरित्राचा ओघ फिरला. त्याला नवीन दिशा व नवीन वळण लागलें. हिंदुसमाजांत कुमारिकावस्थेंत गुरुपदेश होत नसतो, व विशेषत: बायको न्हातीधुती झाली ह्मणजे वयासंबंधानें बहुधा तिला मंत्रोपदेश घेण्याची पात्रता येते. या नियमानुसार आनंदीबाईस ती न्हातीधुती झाल्यावर गुरुदीक्षा मिळाली. तोंपर्यंत मंत्रोपदेशास तिनें अधिकारी व्हावें अशाबद्दलची तयारी चालली होती. पुरुष किंवा स्त्री अधिकारसंपन्न झाल्यावांचून मंत्रोपदेश करूं नये, असें वेदान्तादि सर्व शास्त्रांचें मुख्य प्रमेय आहे. तिचे दीक्षा देणारे गुरु तिचे भ्रतार गोपाळराव, त्यांनीं तिला प्रथम मराठी चांगलें शिक्षण दिलें, व नंतर इंग्रजी भाषेचाही चांगला अभ्यास तिच्याकरवीं करविला. इतर प्रकारें ह्मणजे संभाषणानें, चांगल्या चांगल्या लोकांच्या चरित्रकीर्तनानें, पठनानें व पाठनानें, व स्वत:च्या आचरणानें तिचें मन संस्कृत करण्याचा परिपाठ चालविला. अशा योगें जेव्हां ती अधिकारसंपन्न झाली अशी त्यांची खात्री झाली, तेव्हांपासून तिला मंत्रोपदेश करण्याचें त्यांनीं सुरू केलें. अमक्या दिवशीं अमक्या मुहूर्तावर त्यांनीं आनंदीबाईस उपदेश दिला असें गोपाळरावजींस सुद्धां ठाम सांगतां येणार नाहीं. कारण इतर गुरुमहाराजांच्या ‘नमो भगवते वासुदेवाय’ वगैरे परिमिताक्षरी मंत्रांसारखा यांचा मंत्र नसल्याकारणानें त्यालाही परिमित काल पुरेसा नव्हता. त्यांचा मंत्रोपदेश कित्येक वर्षें चालला होता. जसजसा एक एक भाग अवगतच काय परन्तु बिंबत जाई तसतसा उत्तरभागाचा उपदेश ते करीत जात. अशा योगानें काल फार लागला खरा, परन्तु त्याच

मानानें मंत्रसिद्धिही पण पुष्कळ झाली. आतां समर्थांनीं केलेल्या उपदेशापैकीं कोणकोणत्या भागांचा आनंदीबाईस गोपाळरावांनीं मंत्रोपदेश केला याचें जरी आह्मांजवळ टांचण नाहीं तरी आमच्या चरित्रनायिकेच्या आचरणावरून ज्या भागांचें ठसठासित प्रतिबिंब तिच्या मनावर उमटलेलें दिसतें ते भाग कोणते हें सहज सांगतां येतें.

‘ जनीं बोलण्यासारखें आचरावें ’

**कारण**—‘ क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे. ’

‘ समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा ।
‘ आला तरी कळों न द्यावा । जगामाजी ॥ ’

‘ धक्के चपेटे सोसावे । नीच शब्द सोशीत जावे ।
‘ पस्तावोन परावे । आपुले होती ॥ ’

‘ पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ।
‘ समयीं धीर सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ’

‘ जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देशकालप्रसंग जाणे ॥
‘ तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ ’

‘ कष्टें काया झिजवावी । उत्कट कीर्ति उरवावी ।
‘ चटक लावूनी सोडावी । कांहीं एक ॥ ’

वगैरे. हे उपदेशभाग आनंदीबाईच्या मनावर इतके कांहीं ठसले होते कीं, तिच्या आचारांत विचारांत ते भाग आपोआप पुढें येत. श्रीरामपुराहून जेव्हां आनंदीबाईचा अमेरिकेस जाण्याचा निश्चय ठरला तेव्हां तेथें तिनें इंग्रजींत एक व्याख्यान दिलें. त्यांत—१, अमेरिकेसच जाण्याचा विचार कां ह्मणून केला; २. हिंदुस्थानांत वैद्यक विद्या शिकण्याची स्त्रियांस सोय नाहीं; ३. इतकेंच नव्हे तर येथें स्त्रियांस कोणतीच विद्या शिकण्याची सोय नाहीं व लोकांकडून विद्याभिलाषी स्त्रियांचा छळवादही होतो; ४, अमेरिकेस एकटीच आपण कां जातें व आपला परदेशांत पाठिराखा कोण; व ५, अखेरीस अमेरिकेहून परत आल्यावर आपणास लोक जातिबाहिष्कृत करतील कीं काय; वगैरे प्रश्नांचें तिनें मोठ्या सुरस व खुबीदार भाषेनें उत्तर दिलें आहे. त्यांत हे पूर्वोक्त उपदेशभाग

तिच्या मनावर किती ठसले होते याची पदोपदीं साक्ष मिळत आहे. ज्यांनीं कोणीं तें भाषण वाचून पाहिलें नसेल त्यांनीं तें अवश्य वाचून पहावें, अशी त्यांस आमची आग्रहपुरःसर शिफारस आहे. धन्य आनंदीबाई ! धन्य तुझी ! इतक्या अल्प वयांत आपल्या आचरणानें इतकी उज्ज्वल कीर्ति संपादावीस तेव्हां तुझ्या गुणांची स्तुति करण्यास पुरेसें आमच्या जवळ भांडवल नाहीं, याबद्दल आह्मांस खरोखर अत्यंत दुःख होतें. ज्याच्या संगतीनें, उपदेशानें व ज्यानें स्वतः आचरणानें घालून दिलेल्या कित्त्यानें तुला इतकी योग्यता मिळाली त्या गोपाळरावाची तारीफ कितीही केली तरी पुरी होणार नाहीं ! 'जन्मा आलियाचें फळ। कांहीं करावें सफळ,' ह्मणून जो समर्थांचा उपदेश आहे त्याप्रमाणें गोपाळरावांनीं आपलें व आनंदीबाईचें जन्मसाफल्य केलें यांत कांहीं एक संशय नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं सर्व महाराष्ट्रांतीलच काय पण सर्व हिंदुस्थान देशांतील लोकांवर स्वाचरणाचा उत्कृष्ट कित्ता घालून देऊन अतोनात उपकार केले आहेत. त्यांबद्दल त्यांचे उतराई हे लोक कसे होतील हें अद्यापि पाहणें आहे. आमच्यापैकीं कांहीं लोकांनीं जणूं आपण कार्तिकस्वामींचे अवतार आहों असें मनांत मानून, स्त्रियांस योग्य हक्क, योग्य मान, योग्य विद्या वगैरे देण्याबद्दल जे थोडेबहुत प्रयत्न सुरू झाले आहेत, त्यांजवर यथाशक्ति थंडगार पाणी टाकण्याचा प्रयत्न केला व करीत आहेत. त्यांचीं आनंदीबाईनें आपल्या धारिष्टानें, विद्येनें, सौजन्यानें व शुद्धाचारानें, न बोलतां सवरतां, कशीं नामी नाकें ठेंचलीं ही गोष्ट पण आपण विसरतां कामा नये.

ह्या आनंदीबाईच्या अल्पच पण मोठ्या महत्त्वाच्या चरित्रापासून आपणा सर्वांस शिकावयाजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत. मात्र थोडेंसें डोळे उघडून पाहिलें पाहिजे. प्रथम व मुख्य गोष्ट आनंदीबाईनें आपल्या कृतीनें आह्मां सर्वांस सिद्ध करून दाखविली ती ही कीं, स्त्रिया अबला, बुद्धीनें हीन, पुरुषांप्रमाणें कष्ट सोसण्यास व साहस करण्यास कधीं टिकावयाच्या नाहींत, वगैरे जे त्यांजवरील आरोप आहेत ते सर्वथैव खोटे आहेत, व केवळ दुराग्रहमूलक आहेत. तिनें दुसरी एक गोष्ट अशी सिद्ध करून दाखविली कीं, जर बायकांना आपला उपदेश आपल्या आचरणानें व कृतीनें आपल्या शिष्यांच्या मनावर उत्तम प्रकारें ठसवितील असे खरे कळकळीचे व खरे हिताचे गुरु भेटतील, तर त्या प्रति-

आनंदीबाई होतील. खरेंच आहे, बायका बऱ्याच अंशानें नेयबुद्धि असतात, तेव्हां त्यांस नेता कोणी चांगला कळकळीचा व हिताचा पाहिजे. ज्याला त्याला आपली बायको विद्वान्, शहाणी, सुगुणी असावी अशी इच्छा; परंतु त्याबद्दल निवळ इच्छेच्या पलीकडे एक काडीभर देखील त्यांच्या हातून उद्योग होत नाहीं. ' नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगाः । ' हा प्रकार ह्मणजे कांहीं नवीन सांगितला पाहिजे असें नाहीं. तेव्हां आनंदीबाईनें आपल्या उदाहरणानें इतकें सुचविलें कीं, 'आपण केवळ गारगोट्या समजून ज्यांची उपेक्षा करितां, त्या गारगोट्या नसून फार स्वच्छ व वजनदार हिरे * आहेत, मात्र शाणोल्लेखसंस्कार करणारा पारखी जव्हेरी पाहिजे; व तो गुण आपल्या अंगीं नाहीं. ' हे आमच्या गुरुभगिनीनें अमेरिकेहून चांगले कमावलेले मखमाली...आणले. त्यांपैकीं आमच्या वांट्याचे तर आह्मी ठेवून घेतले आहेत; पण बाकी राहिलेले ज्याचे त्यानें आपले घेऊन जावे, व अजून तरी पुढें असा प्रसंग न यावा अशाबद्दल खबरदारी कांहीं घेतां येण्याजोगी असल्यास घ्यावी, अशी त्यांस प्रेमभावानें सूचना करतों. तिसरी एक महत्त्वाची गोष्ट या चरित्रापासून शिकण्याजोगी आहे कीं, 'सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।. ' गोपाळरावांची पैशासंबंधानें अशी स्थिति नव्हती कीं, त्यांनीं आपल्या पत्नीस दूर विद्याभ्यासार्थ पाठवावें. परंतु केवळ त्यांच्या खटपटीमुळें, दृढ व अव्याहत उद्योगामुळें, व सत्यसंकल्पामुळें, हा त्यांचा मनोरथ परक्या देशांतल्या ओळखना देख अशा एका कुलस्त्रीस निमित्त करून नारायणानें पूर्ण केला. ह्या कार्पेंटर बाईचें औदार्य व जवळ असलेल्या पैशाचा सद्व्यय करण्याची बुद्धि यांचा सर्व ऐपतवाल्या लोकांनीं कित्ता घेण्याजोगा आहे. असो. या आमच्या समर्थांच्या साच्छिष्येच्या अल्प परंतु सदुपदेशपरिप्लुत चरित्रापासून आणखीही पुष्कळ बोध घेण्यासारख्या गोष्टी आहेत, परंतु त्याचा उल्लेख करण्याचें काम रा. केतकर वकीलांच्या जाहिरातीप्रमाणें जे कोणी या देशभगिनीचें विस्तृत चरित्र लिहितील किंवा लिहित असतील त्यांजकडे सोंपवितों.

---

* Full many a gem of purest ray serene,
The dark unfathomed caves of ocean bear;
Full many a flower is born to blush unseen,
And waste its sweetness on the desert air!
*Gray.*

' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
' लोकोत्तराणि चेतांसि कोहि विज्ञातुमर्हति । '

' अशी जी कवि भवभूतीची उक्ति, किंवा–

' मऊ मेणाहूनी आह्मी विष्णुदास ।
' कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥
' अमृत तें काय गोड आह्मांपुढें ।
' विष तें बापुढें कडू किती ॥
' मायबापाहूनी आह्मी कृपावंत ।
' करूं घातपात शत्रुहूनी ॥'

अशी जी साधु तुकारामाची उक्ति, ही किती सत्य आहे याचें प्रत्यंतर थोर व्यक्तींच्या चरित्रापासून अनेक वेळां मिळतें. आमच्या आनंदीबाईच्या चरित्रांतूनही या उक्तीची सत्यता दिसून येण्याजोगी आहे. जी बाई आपल्या वयाच्या सोळा सतराव्या वर्षी अमेरिकेसारख्या दोन तीन महिन्यांचे वाटेवरच्या परमुलखांत, स्वकीय असें कांहीं नाहीं, अशा ठिकाणीं एकाकी आपल्या राजीखुषीनें जाण्यास सजली, इतकेंच नव्हे पण खरोखर तिकडे गेली व तीनवर्षें तिकडे जिनें काढलीं, त्या बाईचें धैर्य, मनाची कठिणता व संकल्पाची दृढता या गोष्टी तर वर वर पाहणारास सुद्धां ' वज्रादपि कठोराणि ' या सदरापैकीं आहेत असें कबूल करावें लागेल. अशा बाईनें आपल्या कांहीं देशभगिनींवर जो एक प्रकारचा जुलूम होत आहे त्याचा विचार मनांत कांहीं कारणानें आला असतां घळघळां रडावें; व आपल्या हातून त्यांस कांहीं साहाय्य होईल तर करावें अशा बुद्धीनें अमेरिकेहून पत्रें पाठवावीं; व ' मी परत आल्यावर असा असा उद्योग या कामीं करीन; तूर्त माझी पूर्ण सहानुभूती आहे ' असें मोठ्या आश्वासनपूर्वक लिहावें ! ही गोष्ट " मायबापांहूनी आह्मी कृपावंत " या सदरापैकीं नव्हे काय ? खरोखर आनंदीबाई लोकोत्तर मनाची होती यांत कांहीं संदेह नाहीं.

परंतु आमचा देश खरोखर मोठा अभागी ! त्याला चांगला पदार्थ जणूं भावतच नाहीं असें दिसतें. नाहीं तर इतक्यांतच आनंदीबाईवर काळाची गदा येण्यास काय झालें होतें ? वयाचें नुसतें एकविसावें वर्षही पूर्ण झालें नाहीं तोंच तिजवर मृत्यूचा घाला पडावा, व आमच्या जवळचें एक अमूल्य

रत्न हरपावें हें आमचें सर्वांचें महद्दुर्भाग्य नव्हे तर काय ? ‘ पूर्वेकडील तारा ’ ह्मणून जें पुस्तक गतवर्षी प्रसिद्ध झालें आहे त्यांत ‘ आर्यभूमीचा विलाप’ ह्मणून जीं पद्यें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत ती ह्मणते—Woe is me ! too bright to last ! ‘ गेले पारे ते, हाय हाय रे ! उज्ज्वल बहु तें नित्य नसे* ’ ती गोष्ट अक्षरशः खरी आहे. आधींच आमच्या देशांत स्त्रीशिक्षणादि प्रकार कमी; त्यांतून कोठें चुकूनमाकून एकादी स्त्री देशास भूषण होईल व देशाचे शक्त्यनुसार पांग फेडील अशी निपजलीच, तर पुढें असा दुःखद प्रकार प्राप्त व्हावा ! तेव्हां आमचा देश फुटक्या कपाळाचा ह्मणावें, आणखी काय? आमच्या एका मित्रानें तीन चार वर्षांपूर्वी आपल्या एका विद्वान् बहिणीस एक कविताबद्ध पत्र लिहिलें होतें. त्यांत स्त्रीशिक्षणादि संबंधानें आर्यदेशास **साहारा** ह्मणून जें आफ्रिकेंत वाळूचें मैदान आहे त्याची उपमा दिली आहे, व त्या मैदानांत जे कोठें कोठें oasis नांवाचे पाण्याचे झरे मिळतात त्यांची उपमा आनंदीबाई-सारख्या स्त्रियांस दिली आहे. ते आपल्या बहिणीस लिहितातः—

“ साहाऱ्यामधुनी यदा पथिक कीं जाई, तदा त्या दिसे
वाळूचा बहु दीर्घ रुक्ष उदधी, छाया न पाणी असे ।
नेत्रां रंजन कीं मनास सुख दे ऐसें न त्या सांपडे.
सारें रुक्ष तिथें बघोनि मुखही त्याचें घडे बापडें ! १

जातां श्रांत घडे, तृषा बहुतशी पीडा तया दे तदा,
होई खिन्न, गमे तया सकळ ही सृष्टी जणूं आपदा ।
ऐशामाजिं जरी तयास मिळतो तो कीं सुधेचा झरा
होई त्या किति हर्ष, जीव दुसरा येई जसा कीं खरा ! २

झाली होती स्थिति मम तशी पाहुनी आर्यदेश;
स्त्रीविद्येचें अमृत न तिथें, ना असे सौख्यलेश ।
**आनंदी** ती बघुनिहि **रमा पंडिता, दत्त तारा,**
वाटे त्याचे दिवस सरले उन्नती ये भरारा. ” ३

हर ! हर ! आमच्या मित्राचा ओआसिस ( तो कीं सुधेचा झरा ) दिसला न दिसला तोंच आटून जावा व त्याचें तोंड जशाचें तसेंच बापडें रहावें ! असो.

* नागपूरसमाचार, १–११–८६.

नशीब त्या बिचाऱ्याचें ! नगाऱ्याच्या घाईपुढें टिमकीची काय प्रतिष्ठा ? जिथें सर्व देशाचें नुकसान झालें तिथें आमच्या मित्राच्या नुकसानीची कथा काय ? परमेशाधीन गोष्टीला कोणाचा इलाज नाहीं. तथापि ज्या गोष्टीला इलाज आहे त्या तरी सर्वांनीं कराव्या. आनंदीबाई तर गेलीच, पण तिनें स्वाचरणानें घालून दिलेला कित्ता ज्यांस शक्य असेल अशा आमच्या देशभगिनींनीं वळवावा, अशी प्रार्थना करून, आमच्या सौभाग्यशालिनी डाक्टर आनंदीबाई इच्या कीर्तिरूप देहावर मोगऱ्याच्या फुलांचा हार घालण्याची परवानगी मागून हा आमचा गद्य भाग आटपतों.

## श्लोक.

भर्ता शक्य नसो तुझा[1] सुरनदी आणावया भूवरी;
कैवारार्थ करो तुझ्या[2] न धरणी निक्षत्रिया श्रीहरी;
गाया त्वद्गुणें[3] यापुढें न दुसरा उत्पन्न हो वाल्मिकी;
कोणी राम तुझी[4] करो न गणना त्या कन्यकापंचकीं; १
कर्तव्यीं चुकला नसो यम तुझ्या[5] मोहोनि वाक्पाटवा;
अंकीं खेळविलीं नसोत कुतुकें ब्रह्मादि बाळें तुवां[6];
आलें हांसवितां मृता तुज[7] नसो; किंवा नसो संगरीं
कोणीं पाहियलें तुला[8] तळपतां विद्युल्लतेच्यापरी. २
जेव्हां प्रश्न परी करील मजला कोणी कधीं कीं,—यशा
गावें संतत ज्यांचिया कविवरीं व्यासादिकींही अशा
आल्या कोण पतिव्रता सुचरिता जन्मास ह्या भारतीं ?
आनंदी ! पहिली तुझीच मजला होईल तेव्हां स्मृति. ३
‘ पातिव्रत्याचि रक्षिलें निजगृहीं बैसोनियां आपलें
‘ स्त्रीचें ऐहिक सर्वथैव ह्मणजे कर्तव्य आटोपलें— ’
ऐसें लोक सुखें ह्मणोत, ह्मणतां येई न मातें तसें;
होवो होत असेल यास्तव तरी लोकांत माझें हसें. ४

१. अहिल्येच्या प्रमाणें. २. द्रौपदीच्या प्रमाणें. ३. सीतेच्या सारखे. ४. तारा-मंदोदरीप्रमाणें. ५. सावित्रीच्या प्रमाणें. ६. अनुसूयेसारखीं. ७. सुलोचनेप्रमाणें. ८ झांशीचे राणीसारखी.

अन्नाच्छादन देउनी निशिदिनीं जे आपणा रक्षिती,
त्यांना मानव काय वन्य पशुही अत्यादरें सेविती.
तैसा पालक आपुला समजुनी स्त्रीनें पती सेविला,
केलें काय विशेष त्यांत ह्मणुनी तीनें कळेना मला. ५

पौलस्त्यासम[1] दुर्मदांध नृपची सोडोनि लज्जा जयीं
पातिव्रत्यधनावरी दरवडे घालीत होते तयीं
त्याचें रक्षणची करोनि वरिती कीर्तीस नारी जरी,
नाहीं त्यांस विशेष काय करितां त्याहूनि येतें तरी ? ६

नारी वा नर हो करोनि पहिली ज्ञानार्जनें स्वोन्नति
अन्यांचीहि सुधारती स्वकृतिनें जे दुःखदात्री स्थिति,
केलें जन्मुनियां खरोखर जगीं त्यांनींच कांहीं तरी;
साजावीच तरी ' मनुष्य ' पदवी त्यांनाच साजे खरी. ७

झालीं गौतम[2]शंकरादि पुरुषांमाझारि रत्नें अशीं,
साध्वी तूंच इथें परंतु पहिली जन्मास येशी तशी;
ही अत्युक्ति दिसो दिसेलचि तरी देशाभिमानी जनां;
नेणें मी अभिमानची परि दुजा सत्याभिमानाविना. ८

आज्ञा वंदुनियां शिरीं स्वपतिची जाऊनि देशांतरीं,
विद्याभ्यास तिथें करूनि, वरुनी सन्मान, येशी घरीं;
आहे गोष्ट खरी, मलाहि करणी वाटे तुझी ती बरी—
ह्यासाठींच परि न केवळ तुला माझी स्तवी वैखरी. ९

ज्या मार्गांत परंतु फार असती विघ्नें असें भावुनी
भेणें दूरची राहिलों पुरुषही आह्मी तयापासुनी,
नारीही तुजसारखी न मळतां निर्विघ्न त्या आक्रमी
हें त्वां दाखविलें; स्तवीत ह्मणुनी आहें तुला आज मी. १०

केलें साहस हें तुवां धरुनियां उद्देश ने जे मनीं
ते ते सिद्ध न होत तोंच जग हें गेलीस तूं सोडुनी !

१. रावण. २ गौतम बुद्ध, शंकराचार्य.

झाली हानि खरी; पुढें न भरुनी येईल ती काढितां !
तेणें लेश परी यशोनिधि तुझा झालाच नाहीं रिता. ११
नारी त्वत्सम थोर आर्यभुवनीं जन्मोनियां यावरी
साराया झटतील दुःखद दशा स्वीय स्वसांची दुरी;
बाई घालुनियां परंतु पहिला आहे धडा त्वां दिला,
आनंदें इतिहासकार ह्मणुनी गातील आधीं तुला. १२
स्त्रीनें जन्मवरी घरांत बसुनी फुंकीत जावें चुली,
बेचाळीस कुळें पवित्र ह्मणजे केलीं तिनें आपलीं;
ज्यांना आवडलें असेल मत हें त्यांनीं तुला निंदुनी
घ्यावें अज्ञजनीं मिळेल तितकें धन्यत्व संपादुनी. १३
योषिद्रत्न पडे परंतु पदरीं ज्याच्या तुझ्यासारखें
त्याचाही मज धन्यवाद नकळे गावा किती या मुखें;
केली भूषित आर्यभूच मग ही सारी जिनें, त्या तुझें
वर्णाया यश शारदाच बहुधा आली स्वयें पाहिजे ! १४
पद्यें हीं चवदाच काय चवदा वर्षे जरी लागती
साध्वी त्वद्गुण वर्णितां न मति ही माझी तरी भागती
हा ! हा ! पुण्य परंतु आज पदरीं माझ्या नसे एवढें !
येई चालवितां न यास्तव मला ह्या लेखणीला पुढें ! १५

# कै० जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.



तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं ।
कडोविकडी विवरावीं । अन्तःकरणें ॥
किती लोक ते कळेना । किती समुदाय आकळेना ।
सकळ लोक श्रवण मनना मध्यें घाली ॥
फड समजावीस करणें । गद्य पद्य सांगणें ।
परान्तरांसी राखणें । सर्व काळ ॥
जितुकें कांहीं आपणास ठावें । तितुकें हळू हळू शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । बहुत जन ॥
परोपरी शिकवणें । आडणुका सांगत जाणें ।
निवळ करून सोडणें । निस्पृहासी ॥

रामदास—दासबोध.

पूर्वीं एका प्रसंगीं **श्रीसमर्थांच्या** एका सच्छिष्येचें त्रोटकसें चरित्र लिहिण्याचें काम जरी एक्या परी अभिनंदनीय तरी बहुता परी दुःखकर असें आह्मांकडे आलें होतें. तें कसें तरी केलें. परंतु आज **समर्थांच्या** एका सच्छिष्याचें चरित्र लिहिण्याचें सर्वतोपरी दुःखकर असें काम करावें लागत आहे, त्या योगानें आमचें मन व लेखणी हीं दोन्हींही कर्तव्यपराङ्मुख होऊं पाहत आहेत. अशी त्यांची स्थिति व्हावी हें अगदीं साहजिक आहे. 'परदुःखेन दुःखिता विरलाः' ही सत्कव्युक्ति खरी असल्यामुळें त्या सच्छिष्येविषयीं लिहितांना मनाची स्थिति आजच्या इतकी उद्विग्न झाली नव्हती. याचें कारण, सौ. आनंदीबाईच्या अकालिक मृत्यूनें आपल्या सर्व देशाचें नुकसान झालें, व देशाबरोबर परोक्षतया व अंशतः आमचेंही नुकसान झालें, किंवा जो कांहीं फायदा पुढें होईल अशी बळकट आशा होती तिचा तंतु तुटून गेला. तेव्हां नुकसानीच्या भाराचा कांहीं अंश आह्मांस सोसावा लागला ह्मणून त्या मानानें आमच्या मनाला उद्विग्नताही कमी भासली. परंतु आजच्या आमच्या चरित्रनायकाच्या संबंधानें नुकसानीचा सर्व भार **विविधज्ञानविस्तार** व त्याचे कांहीं व्यवसायबंधु व भगिनी यांजवर आहे. व देशास व विशेषतः महाराष्ट्रभाषेस जी प्रचंड हानि झाली आहे ती देखील आह्मां ( विविधज्ञानविस्तार व इतर बंधुभगिनी ) मार्फत. तेव्हां आज आमचें मन अत्यंत उद्विग्न व्हावें यांत अगदीं नवल नाहीं. त्यांतून मोडक यांचा विविधज्ञानविस्तारावर आज सोळासत्रा वर्षांचा अत्यंत प्रेमा होता. तो इतका कीं, त्यांच्या स्वकीय अर्भकावर ( काव्येतिहाससंग्रहावर ) देखील त्यांचा लोभ फार कमी होता. इतका अकृत्रिम व अहेतुक लोभ विविधज्ञानविस्तारावर मोडकांचा कां व कसा जडला, याची मीमांसा होणें फार कठिण आहे.

आमच्या मतें तर केवळ मोडकांचा उदार स्वभाव याला कारण आहे. ' कळवळ्याची जाती । लाभावीण करी प्रीती ।' हें या लोभाचें मूळ बीज असावें असा आमचा ग्रह आहे. विविधज्ञानविस्तार देखील मोठा भाग्यशाली आहे हेंही या लोभाचें कारण असावें. कोणतेंही कारण असो, विविधज्ञानविस्तारावर मोडकांची कृपादृष्टि निरपेक्ष, अकृत्रिम व अत्यंत होती ही गोष्ट निर्विवाद आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर पहाण्यास विविधज्ञानविस्ताराच्या सहाव्या पुस्तकापासून आजच्या अंकापर्यंत बहुतेक अंक साधनीभूत होतील. विविधज्ञानविस्ताराला त्याचे

जनकांनीं व त्याचे साहाय्यकांनीं पहिल्यापहिल्यानदां फारच लाडावून सोडलें होतें; व त्याला पचतील किंवा नाहीं, त्याला आज संवय लावली खरी पण ती शेवटपर्यंत त्याची निभावून जाईल कीं नाहीं, इत्यादि गोष्टींचा प्रेमभरामुळें विचार न होऊन, त्याला त्याच्या जनकांनीं मिष्ट खऱ्या पण सहज न मिळणाऱ्या पदार्थांच्या सेवनाची चटक लावून सोडली. मुलाला काय, एकदा मिष्ट पदार्थ खायाला मिळायाला लागले ह्मणजे त्याला रोजच्या कण्या भाकरीचा कंटाळा येऊं लागतो. पण सगळेच दिवस सारखे कोठून असणार, याचा त्याला मुळींच विचार नसतो; आणि जर का कालगतीनें वाईट दिवस आले, तर अशा मुलाची अशी दैना होते कीं शेवटीं हाय खाऊन तें डोळे मिटतें. असाच प्रकार विविधज्ञानविस्ताराचा झाला. त्याच्या जनकांनीं इतर मिष्ट पदार्थांबरोबर त्याला लीलावतीचा खुराक लाविला. पुढें विविधज्ञानविस्ताराच्या दैवदुर्विपाकामुळें त्याला जीं गंडांतरें आलीं त्या धांदलींत हा लीलावतीचा त्याचा खुराक बंद झाला. मग जशी एकाद्या दरिद्री अफीमजीची अफूचा खुराक न मिळल्यामुळें अत्यंत शोचनीय स्थिति होते, ह्मणजे त्याचे हातपाय मोडून जातात, तोंड वाळून जातें, सुस्ती येते, ज्वर येतो, इतर कोणत्याही पदार्थांची त्यास गोडी लागत नाहीं, फार काय तो मृतप्राय होऊन जातो—तद्वत् या विविधज्ञानविस्ताराची हा खुराक नसल्यामुळें स्थिति झाली होती. परंतु मोडकांच्या विश्वकुटुंबीय वृत्तीमुळें त्यास त्याच्या चटकेचा पदार्थ पुनः मिळूं लागला व त्याचे हे मिष्टेष्टान्नदाता पिता झाले व आमरणान्त ते तसे राहिले. तेव्हां त्यांच्या परलोकगमनानें त्याची केवढी भयंकर नुकसानी झाली आहे व तीही प्रत्यक्ष, याचा विचार मनांत येऊन खरोखर हा लेख लिहिण्यास आमचें मन प्रवृत्त होत नाहीं व लेखणी धजत नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. परंतु मनुष्यास या व्यवहारांत राहणें आहे तावत् त्यानें व्यवहाररीतीस अनुसरून समयास सादर झालें पाहिजे. तदनुरूप या पुस्तकावर व महाराष्ट्र लोकांवर मोडकांचे जे अमूल्य उपकार झाले आहेत त्यांचें अंशतः तरी स्मरण करावें, त्या उपकारांबद्दल आह्मी उतराई तर होऊं शकतच नाहीं खरे तरी कृतज्ञताबुद्धि दाखवावी, व ‘ सखीजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति’ ह्या सदुक्तीचा प्रत्यय पाहून दुःखभार कमी होईल तर पहावा या हेतूनें प्रस्तुत चरित्र लिहिण्यास सरसावतों.

आमचे परमप्रियमित्र कैलासवासी मोडक हे समर्थांच्या उत्कृष्ट सच्छिष्यांपैकीं एक अग्रणी होते असें त्यांचे वर्तनावरून सहज पाहिजे त्याच्या लक्षांत येईल. आरंभीं दासबोधांतील उद्धृत ओंव्यांवर जर कोणी कीर्तन करूं पाहील तर त्याला अनुसंधान लावण्यास आमच्या परमपूज्य मित्राच्या चरित्रासारखें पदोपदीं त्या उपदेशाचें शब्दशः सार्थक्य करणारें दुसरें आख्यान मिळणार नाहीं. आमच्या मित्राचें आचरण इतकें पवित्र, त्यांचें मन इतकें निर्मळ, त्यांचा व्यवहार इतका चोख, त्यांचा व्यासंग इतका जबर, त्यांची वाणी इतकी रसाळ, त्यांचे विचार इतके पोक्त व खोल, त्यांची बुद्धि इतकी विशाल व व्यापक, त्यांचे लेख इतके गंभीर पण उत्तानार्थ, त्यांचें प्रेम इतकें अकृत्रिम व निरपेक्ष, कीं जरी या प्रत्येक गोष्टींत कांहीं लोकोत्तर नाहीं असें कित्येक ह्मणतील तरी इतक्या गोष्टी एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं एका काळीं सांपडतात हें पाहून कोणाचें मन थक्क होणार नाहीं ? आमच्या इकडील नवीन व जुन्या मंडळींत वेळाचें खरें मूल्य एक रा. सा. मंडलीकांस कळत होतें; इतकेंच नव्हे, पण ते आपल्या व्यवहारानें तें मूल्य पूर्णपणें उमजत होते असें त्यांनीं दाखविलें, अशाबद्दल त्यांची ख्याति आहे, व ती यथार्थ आहे. परंतु मोडकांच्या संनिधवर्ती मित्रांकडून असें खात्रीलायक कळतें कीं, मोडकांनीं आपल्या व्यवहारानें वेळेच्या मूल्यासंबंधानें मंडलीकांवरही तान केली होती. मंडलीकांचा व्याप मोठा, स्वभाव तिखट, व मोठमोठ्या कार्यांशीं व व्यक्तींशीं संबंध पडल्यामुळें त्यांचें कालनेमित्व जितकें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तितकें मोडकांचें आलें नाहीं, यांत नवल नाहीं. मोडक हे स्वभावाचे मनमिळाऊ व मोठे गोड, व समर्थांचे उपदेशानुरूप ' परान्तरासीं राखणें । सर्वकाळ ' हा त्यांचा होतां होईल तो क्रम. तेव्हां त्यांचें कालनेमित्व लोकांचे नजरेंत भरेल असें नव्हतें. कालनेमित्व गाजवायाला तुसडा स्वभाव, स्वार्थैकदृष्टि, लोकांविषयीं बेपर्वाई वगैरे अनुकूल साधनें आहेत. ह्या सर्व गोष्टी स्वभावतःच मोडक यांस प्रतिकूल असतांही त्यांनीं आपलें कालनेमित्व गाजविलें, याबद्दल ते अत्यंत स्तुतीस पात्र आहेत. आमचे मित्र मोठे विद्याव्यसनी, दृढोद्योगी, अंगीकृताचा शेवटपर्यंत निर्वाह लावणारे, असे होते हें त्यांच्या पुढील त्रोटक चरित्रावरून लक्षांत येईल. त्रोटक चरित्र कां, असा सहज कोणी प्रश्न करील. कारण ते जर आमचे अकृत्रिम स्नेही होते, उदार साहाय्यक होते, व मनोभा-

वेंकरून हितचिंतक होते, तर त्यांचें सबंध चरित्र आह्मांस माहित असलें पाहिजे, व तें या पुस्तकांत आलें पाहिजे. प्रश्न फार सयुक्तिक व रास्त आहे. परंतु वास्तविक प्रकार असा आहे कीं, मोडकांचा व आमचा जो संबंध जडला व जो त्यांचा आमच्याशीं व्यवहार झाला तितक्या पुरती माहिती आह्मांस आहे व ती क्रमशः येईलच; परंतु त्यांच्या विषयींची इतर माहिती आह्मांस असावी तितकी नाहीं. मोडकांचा ह्मणजे इतका अकस्मात् चिरंतन वियोग होईल, व हा लेख लिहिण्याचा दुःखकर प्रसंग असा अनपेक्षित येईल, असें कोणाच्या ध्यानीं मनीं तरी आलें असेल काय? मग ही अशुभसूचक माहिती मिळविण्याच्या नादीं कोण बरें लागला असता? त्यांतून या आकस्मिक घाल्याचें दुःख इतकें ताजें आहे कीं, या बाबतींत माहिती मिळविण्याचे खटपटींत पडवत नाहीं. या व अशा अनेक कारणांमुळें आजचा लेख त्रोटक चरित्रापेक्षां जास्ती होऊं शकत नाहीं. अशा सद्गुणी व विश्वकुटुंबी पुरुषाचें साद्यंत व विस्तृत चरित्र लिहिण्याचें काम कोणी त्यांच्या अत्यंत घरोब्याच्या व निकटवर्ती मित्रानें पत्करिलें पाहिजे. आतां तसें कोणी पत्करतो किंवा नाहीं हें समजणें कालगतीवर राहिलें. असो.

रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक यांचा जन्म शके १७६७ पौष शुद्ध ३ बुधवार ह्मणजे तारीख ३१ डिसेंबर १८४५ रोजीं झाला. त्यांचें राहण्याचें मूळ गांव दक्षिण कोकणांत दापोली तालुक्यांत पंचनदी हें होय. यांचे वडील बाळाजी कृष्ण मोडक, यांची मूळची स्थिति गरिबीचीच होती. परंतु पुढें त्यांनीं चांगलें दैव काढिलें. त्यांनीं बरींच वर्षें इंग्रजी अमलांत ह्मणजे खालसा प्रांतांत माल खात्यांत (रेव्हिन्यू डिपार्टमेंटांत) बऱ्याच ठिकाणीं मामलतीचें काम केलें. पुढें पेन्शन घेतल्यावर कोल्हापूर दरबाराकडून कोल्हापूर प्रांतीं त्यांजकडे कांहीं काम होतें. ते कोल्हापूर मुक्कामीं कामावर असतां तेथें त्यांस थोड्या कालापूर्वीं ह्मणजे १६ मे १८८७ रोजीं देवाज्ञा झाली. बापाचा मुलाकडे फार ओढा होता असें दिसत नाहीं, कारण बापामुलांना प्रेमबद्ध करणारी सांखळी जी मुलांची आई ती जनार्दनपंताचे दुर्दैवामुळें फार दिवस राहिली नाहीं. हे अगदीं लहान असतांच यांची जननी निवर्तली. त्यामुळें यांचें संगोपन यांच्या चुलत्यानें व चुलतीनें केलें व यांस लहानाचें थोर केलें. बाळाजीपंतांस द्वितीय कुटुंबापासून एक मुलगा व एक मुलगी आहेत. जनार्दनपंतांस सख्खें भावंड कोणी नाहीं.

बाळाजीपंत हे सोलापूर जिल्ह्यांत बारशी येथें मामलेदार होते, त्यावेळीं जनार्दनपंत हे आपल्या बापाजवळ राहण्यास गेले. तेथील सरकारी मराठी शाळेंत जनोबांच्या मराठी शिक्षणास आरंभ झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यांचे सहाध्यायांपैकीं बारशीस अद्यापि कोणी कोणी आहेत, त्यांच्या सांगण्यांत आहे कीं जनोबांची बुद्धि लहानपणीं अति तीव्र होती असें जरी नाहीं, तरी चांगली सतेज होती. परंतु विशेषत: ध्यानांत ठेवण्यासारखे यांचे गुण ह्मटले ह्मणजे साधेपणा सरळपणा व निरभिमान हे होत. यांचा विशेष उल्लेख करण्याचें कारण, व्यवहारांत नित्यश: असें दृष्टीस पडतें कीं, अधिकार व त्याच्या खालोखाल धनिकता हीं तत्तद्विशिष्ट व्यक्तींसच काय तीं उन्मत्त करतात असें नाहीं, परंतु संसर्गानें ज्यांच्याकडे त्यांचें वारें जातें त्यांस तर तीं फारच उन्मत्त करतात. हा अनुभव सार्वत्रिक व रोजचा असल्यामुळें त्याची उदाहरणांनीं सिद्धता करणें नलगे. त्याच तत्त्वानुरूप शाळेंत देखील मुलांची त्यांच्या बापांच्या अधिकारमानाप्रमाणें अरेरावी चालते. परंतु आमच्या जनोबाचें शाळेंत वर्तन इतकें सरळ व साधें असे कीं ते सदरील तत्त्वास जबरदस्त अपवादक ह्मणून कबूल केलें पाहिजे. हे त्यांचे गुण मोठेपणींही तसेच राहिले इतकेंच नव्हे, पण ते वृद्धीस पावले व परिपक्व झाले. जनार्दनपंतांचे वडील बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत मामलतीचे कामावर असतांना तेही पण तिकडे जाऊन राहिले होते असें दिसतें, व त्याच योगानें त्यांना कानडी भाषा येऊं लागली. ती ते बुद्धिमान् व ज्ञानबुभुत्सु असल्यामुळें नुसती शिल्लक राहिली नसून जरी त्यांना पुढें ह्मणजे प्रौढ वयांत तिचा तादृश उपयोग पडला नाहीं, तथापि ती त्यांचेजवळ चांगलीच ताजी राहिली होती. इंग्रजी शिकण्याकरितां ते पुण्यास येऊन राहिल्यापासून त्यांस कर्नाटक प्रांतांत रहाण्याचा प्रसंगच आला नाहीं. त्यांचा सर्व काळ मराठी जिल्ह्यांतच नोकरी करण्यांत गेला. तथापि त्यांनीं कानडीला हातचें सोडून दिलें नाहीं. यावरून त्यांच्या बुद्धीच्या ग्रहणशक्तीची व धारणाशक्तीची चांगली अटकळ बांधतां येते. नाहीं तर असे कांहीं लोक आढळांत येतात कीं, ते चार दिवस परमुलखांत जाऊन व राहून आले ह्मणजे लागलीच आपली जन्मभाषा देखील विसरतात किंवा विसरल्यासारखें दाखवितात. जेथें जन्मभाषेचा हा प्रकार तेथें नवीन शिकलेल्या भाषांचें काय होत असेल याविषयीं प्रश्न करण्यास अवकाशच रहात नाहीं. असो.

जनार्दनपंतांचा इंग्रजी अभ्यास अव्वल अखेर पुण्यासच हायस्कूल व कॉलेज यांत झाला. त्यांची सन १८६६ सालीं प्रवेशपरीक्षा उतरली व सन १८७० सालीं ते बी. ए. चे परीक्षेंत उत्तीर्ण झाले. ही परीक्षा झाली, किंवा कांहींकांचे मतें एल्. एल्. बी. परीक्षा उतरली, ह्मणजे विद्यार्थिदशा सर्वस्वीं संपली असें समजण्याचा प्रघात आहे, व तो खरा असल्याचें या उपपदधारी मंडळींच्या पुढील आयुःक्रमावरून सिद्ध होतें. त्याशिवाय विश्वविद्यालयाचे वार्षिक पदवीदानाचे समारंभ होत असतात, त्यावेळीं बहुतेक असा उपदेश पदवी घेणारांस करण्यांत येत असतो कीं, पदवी संपादन केली एवढ्यावरूनच त्यांनीं आपणांस कृतार्थ समजूं नये; पण त्यांनीं इतकेंच समजावें कीं सरस्वतीमंदिरांत प्रवेश होण्याजोगी त्यांच्या अंगीं योग्यता आली आहे. जर सदरचा समज खरा नसता तर वारंवार या उपदेश-पुनरुक्तीचें प्रयोजनच नव्हतें. पण स्थूळ मानानें पाहतां हा समज अनुभवसिद्ध आहे. परंतु या अनुभवाला अपवाद नाहींत असें मात्र नाहीं. जनार्दनपंत हे ह्या अपवादकोटींतील एक ठळक उदाहरण आहेत. त्यांची विद्यार्थिदशा यावज्जीव चालूच होती. यांना आमरणांत विद्यार्जनसंबंधानें आपण कृतार्थ झालों असें कधीं वाटलेंच नाहीं. सदा त्यांचा विद्याव्यासंग चालूच होता. कधीं त्यांनीं त्याला खळ ह्मणून पडूं दिलाच नाहीं. विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रम संपल्यावर, ज्योतिषशास्त्रादि ज्या गहन विषयांचें ज्ञान बालबोध करण्याकरितां ते सदा यत्न करीत होते, ते विषय शिकण्याचें त्यांनीं सुरू करून, त्यांत पारंगतता संपादिली. तेव्हां त्यांची विद्यार्थिदशा कधीं संपली नाहीं व ते परमेश्वरकृपेनें जितके दिवस आणखी वांचते, तितका काळपर्यंत ती संपली नसती. या विद्यार्थिदशेचें वृत्त संपविण्यापूर्वी आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. विद्यार्थिजनांस अत्यंत आवश्यक खरा, पण फार दुर्मिळ गुण जी टापटीप व सुरेख व्यवस्था करण्याची शिस्त ही यांच्या अंगीं इतकी खिळलेली दृष्टीस पडते कीं, यांच्या जवळ शाळेंत असतांना शिकण्याचीं पुस्तकें संग्रहीं जपून ठेविलीं आहेत; इतकेंच नव्हे, पण त्यावेळचीं टिप्पण–पुस्तकें ( Note–books ) सुद्धां तितक्याच काळजीनें त्यांनीं जपून ठेविलीं आहेत. आतां यांच्या प्रौढ विद्यार्थिदशेंतील टांचणवह्या शिल्लक असतीलच हें सांगणें कशास? ह्या टांचणवह्या व टिप्पणवह्या जर यांच्याच तोडीच्या कोणा प्रौढ विद्यार्थ्याच्या हातीं लागतील, तर ' बहुत जनां शहाणे करून सोडण्याच्या ' कामीं उपयोगीं पडेल असा या हस्तलिखित वह्यांतून पुष्क-

ळच मजकूर मिळेल, यांत आह्मांला अगदीं शंका नाहीं. आतां नुकताच स्वत आह्मांला या जनार्दनपंतांच्या अभिनंदनीय गुणाचा खासा प्रत्यय आला, व तो पाहून आह्मी जसे त्या वेळीं थक्क झालों तसे आमचे वाचकही तो ऐकून थक्क होतील अशी आमची खात्री आहे. परवां विविधज्ञानविस्ताराला २१ वें वर्ष संपून २२ वें वर्ष लागलें, त्यावेळीं या पुस्तकाचा इतक्या वर्षांचा त्रोटकसा इतिहास द्यावा असें मनांत येऊन त्या संबंधाची सामुग्री एकत्र करूं लागलों तों असें आढळलें कीं, आह्मांजवळ ( ह्मणजे तो लेख लिहिणाराजवळ ) पहिल्या कांहीं वर्षांचे विविधज्ञानविस्ताराचे अंकच नाहींत, व संनिधवर्ती अशा कांहीं अगदीं जुन्या आश्रयदात्यांजवळही नाहींत असें शोधाअंतीं कळलें. परंतु जनार्दन-पंतांचा हा गुण ज्याला माहित होता अशा एका मित्राच्या सूचनेवरून त्यांच्या-जवळ शोध करितां नुसते आह्मांस पाहिजे ते अंक मिळाले इतकेंच नव्हे, पण कांहीं कांहीं इतरत्र दुर्लभ अशी माहितीही मिळाली. हा परिणाम केवळ त्यांचा जो स्वभाव कीं कोणतीही वस्तु किंवा ज्ञान ह्मणून जीं लब्ध होतील तीं आपलीं-शीं करून, तीं योग्य स्थळीं काळजीपूर्वक जपून ठेवावयाचीं, त्याचा होय. जना-र्दनपंतांचा हा गुण किंवा इतर दुसरे स्पृहणीय गुण यांत लोकोत्तरत्व कांहीं नाहीं हें खरें. तथापि ते बहुतेक लोकांना जरी सोपे वाटतात, तरी लब्ध होत नाहींत. पदार्थांच्या दौर्लभ्यावरून व कष्टसाध्यत्वावरून त्या पदार्थांची किंमत वाढत असते. लोकोत्तर नसूनही बहुतेक लोकांस दुर्लभ असे सद्गुण मोडकांचे अंगीं पुष्कळच होते, ह्मणूनच त्यांची विशेष तारीफ करणें रास्त आहे. असो.

मोडकांच्या विद्यार्थिदशेचें वर्णन करीत असतां बऱ्याच लेखकांनीं जनार्दनपंतांनीं आपला अभ्यासाचा खर्च आपल्या वडील माणसांवर पडूं दिला नाहीं, व ता स्कालरशिप्स् वगैरेंवर चालविला असें कटाक्षपूर्वक लिहिलें आहे. हें त्यांचें लिहिणें यथार्थ आहे, पण या गोष्टीवर कटाक्ष ठेवण्याचें कारण नव्हतें. कारण जनार्दनपंत हे ज्यावेळीं शाळेंत किंवा पाठशाळेंत अध्ययन करीत होते, त्या वेळीं व त्याकाळचे पूर्वींही शेंकडा पंचाण्णव विद्यार्थी गरीब स्थितींतील होते ह्मणजे त्यांच्या घरच्या मंडळीची त्यांच्या अध्ययनार्थ लागणारा खर्च पुरवि-ण्यासारखी स्थिति नव्हती. ‘ दांत आहेत तेथें चणे नाहींत, व चणे आहेत तेथें दांत नाहींत ’ ही रड आजकालची नाहीं. ही सनातनची स्थिति आहे. तेव्हां सधन लोकांचीं मुलें विद्याव्यासंगांत गुंतलेलीं तेव्हां नव्हतीं, व आतांही

नाहींत. मात्र त्या काळाचे मानानें अध्ययनाचा खर्च वाढत आहे, व शिकणारांची संख्या वाढत चाललेली असून स्कालरशिप्स वगैरेंची अध्ययनोत्तेजक साधनें जितक्याचीं तितकींच राहिलीं आहेत, किंबहुना कमी होत चाललीं आहेत. त्यामुळें आज ज्या विद्यार्थ्यांस घरची मदत नाहीं, पण ज्यांनीं अध्ययनक्रम चालू ठेविला आहे त्यांची तारीफ करणें रास्त होईल. पण जनार्दनपंतांनीं आपल्या कमाईवर आपलें अध्ययन केलें यांत विशेष तारिफीचा प्रकार कांहीं नाहीं, कारण त्यांच्या बहुतेक सहाध्यायांचीही तीच स्थिति होती असें थोडेंसें मागें पाहिलें ह्मणजे लक्षांत येईल. त्यांतून जनार्दनपंतांच्या वडिलांची स्थितिही विशेष चांगली असेल असें वाटत नाहीं. कारण जर स्थिति चांगली असती तर ते पेन्शन घेतल्यावर कोल्हापुर संस्थानांत महाफिझ दफ्तरच्या कामावर राहिले नसते. त्याशिवाय जनार्दनपंत पहिल्या कुटुंबाचे असल्यामुळें वडिलांचा त्यांजकडे ओढा कदाचित् कमी असेल. कसेंही असो, मामलतदाराचे आपण चिरंजीव आहों, आपणांस शिकून काय करायाचें आहे, अशा पोकळ घमंडींत इतर थोरा मोठ्यांच्या मुलांप्रमाणें न पडतां गरीबांच्या मुलांप्रमाणें जनार्दनपंतांनीं आस्थापूर्वक अभ्यास केला व त्यामुळें ते आह्मां महाराष्ट्रीयांस फारच उपयोगी पडले. या गोष्टीबद्दल ते खाचित स्तुतीस पात्र आहेत.

जनार्दनपंतांचा अध्ययनक्रम संपण्यापूर्वींच सुमारें सव्वा वर्ष त्यांना विद्याखात्याच्या मराठी भाषांतरकाराचे कचेरींत ‘ ट्रान्स्लेटर एक्झिबिशनर ’ नेमलें होतें. तेव्हांपासून ह्मणजे सन १८६९ चे सप्टेंबर महिन्यापासून तों परवां देहावसान होईपर्यंत त्यांनीं विद्याखात्यांत निरनिराळ्या ठिकाणीं कामें केलीं. सन १८७१ सालीं प्रथमतः त्यांस नाशिक येथें फर्स्ट असिस्टंट मास्तर नेमिलें. पण तेथील हवा त्यांच्या प्रकृतीस मानवेना ह्मणून त्यांनीं आपली बदली रत्नागिरीस करून घेतली. ते रत्नागिरी व पुणें या दोन जिल्ह्यांत कांहीं काळपर्यंत कायम डेप्युटी इन्स्पेक्टर होते. विश्रामबागचा व बुधवारचा वाडा यांस आग लागली त्या सालीं पुण्यास हे डे. ए. इन्स्पेक्टर होते. पुढें ठाणें येथील हायस्कुलावर त्यांची नेमणूक झाली. त्या जागेवर ते शेवटपर्यंत होते. ठाण्याच्या शाळेला नांवारूपास मोडक यांणींच आणिलें. मध्यंतरीं कांहीं काळपर्यंत धुळें एथील हायस्कुलावर यांची नेमणूक झाली होती. एकंदरींत यांची सर्व नोकरी शिक्षकाचे

कामांत खर्ची पडली. हे उत्कृष्ट शिक्षक होते. यांना मदड मुलालाही सतेज करण्याचा तोडगा साधला होता असें ह्मणतात. सगळ्यांनाच शिक्षकपणाची हातोटी साधते असें नाहीं. शिक्षकाला जितके ह्मणून गुण पाहिजेत तितके मोडकांच्या अंगीं होते, असें बळकट अनुमान त्यांची ' उत्कृष्ट शिक्षक ' ह्मणून सर्वतोमुखीं जी स्तुति ऐकायास येते तिजवरून काढतां येतें. तसेंच त्यांच्या अनेक लेखांच्या बालबोध सरणीवरूनही याच गोष्टीचें पक्कें अनुमान करतां येतें.

मोडकांचें एकंदर आयुष्य अध्ययन व अध्यापन यांमध्यें गेलें. यांचें अध्यापनाचें काम दोन प्रकारचें होतें. एक सापेक्ष व दुसरें निरपेक्ष. दोन्ही प्रकारचें अध्यापन यांनीं मोठ्या मनोभावानें व आस्थापूर्वक केलें. सापेक्ष अध्यापन ज्यांना करण्याचें वृत्तिसंबंधानें भाग पडलें आहे त्यांपैकीं बहुतेक तें काम आपल्या इमानाला जागून करीत असतात. जे आपल्या कामाची टंगळमंगळ करतात, त्यांना यश येत नाहीं, व ते कामचोर गणले जातात. ह्मणून वास्तविक त्यांस हरामखोर असें ह्मटलें असतां चालेल. परंतु जे लोक आपलें काम–ह्मणजे ज्याबद्दल मुषाहिरा मिळत आहे,–असें काम नीट आस्थापूर्वक करितात ते आपलें कर्तव्य करितात असें ह्मटलें पाहिजे, व त्याबद्दल त्यांची विशेष तारीफ नको. परंतु ज्यांनीं आपलीं सापेक्ष व निरपेक्ष अशीं दोन्ही प्रकारचीं कामें मोठ्या चोख रीतीनें, सचोटीनें, आस्थेनें व कळकळीनें केलीं त्यांची कितीही तारीफ केली तरी थोडीच. अशा कोटींतील आमचे मित्र जनार्दनपंत असून त्यांतल्या त्यांत वरच्या पायरीचे होते. त्यांचे सापेक्ष अध्यापनाचा लाभ त्यांच्या परिमितसंख्य अन्तेवासियांस झाला; व तो देखील उत्तम प्रतीचा व पुष्कळ असा झाला आहे, असें त्यांचे शिष्य मोठ्या प्रेमानें व कृतज्ञताबुद्धिपूर्वक कबूल करतात. तथापि त्यांच्या निरपेक्ष अध्यापनाचा लाभ किती लोकांना झाला आहे त्यांची संख्या सांगणें फारच कठिण जाईल. व यद्यपि जनार्दनपंत गेले, तथापि त्यांनीं लोकांचे अध्यापनार्थ जे सुगम धडे घालून दिले आहेत ते ' अक्षरसंबद्ध ' असल्यामुळें कित्येक युगांचीं युगें टिकतील व त्यांचा लाभ असंख्यात शिष्यवर्गास होईल. एकापासूनचा लाभ केवळ मितकालीन व मितसंख्य होता, परंतु या दुसऱ्यापासूनचा लाभ अमितकालीन व अमितसंख्य असा आहे, हें महदंतर लक्षांत बाळगण्याजोगें आहे. शिवाय ह्या निरपेक्ष अध्यापनाचें काम कोणाच्या जुलमामुळें, भीतीमुळें किंवा

टोंचणीमुळें झालेलें नसतें. यामुळें त्यास प्रेम, औदार्य व परोपकारबुद्धि हीं प्रेरक असतात व ह्मणूनच तें रमणीय व प्रिय असें होतें. अध्यापक चांगला व योग्य असला पाहिजे हें तत्त्व गृहीत आहे हें मात्र विसरतां कामा नये. मोडकांनीं बहुत जनांस ज्या गोष्टी माहित असण्याचा संभव कमी, पण ज्या त्यांस ठाऊक होत्या त्या लोकांकरितां सुलभ करून ठेविल्या आहेत व समर्थांचा उपदेश–'जितुकें कांहीं आपणांस ठावें, तितुकें हळू हळू शिकवावें, शहाणें करूनी सोडावें, बहुत जना,'– आपल्या कृतीनें शब्दशः सार्थ करून दाखविला. आतां निरपेक्ष अध्यापन करणारे काय ते जनार्दनपंत एकटेच निपजले, असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं. परंतु जे कोणी या जातीचे असतील त्यांतील हे वरिष्ठ प्रतीचे होते असें आह्मी ह्मणतों व याला पुष्कळांचा रुकार मिळेल असें आह्मांस वाटतें.

आतां जनार्दनपंतांनीं या निरपेक्ष प्रकारचें अध्यापन कोठें कोठें व कोणत्या साधनांनीं केलें याचें थोडक्यांत कथन करून हा वाढत चाललेला लेख संपवितों. प्रथमतः यांनीं स्वतंत्र ग्रंथ रचून अध्यापन करण्याचें साधन केलें. त्यांनीं तीन चार ग्रंथ रचले आहेत व ते प्रसिद्धही झाले आहेत व त्यांतील कांहींविषयीं अभिप्राय या पुस्तकांत पूर्वी आलेच आहेत. त्यांनीं दोन एक ग्रंथ रचून ठेविले आहेत; पण ते प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. दुसरा प्रकार वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें यांचे द्वारें यांनीं निरनिराळ्या विषयांवर लेख प्रसिद्ध करून 'बहुत जनां शहाणे करून सोडण्याचा' यत्न केला. या प्रकाराची साद्यंत माहिती आह्मांजवळ नाहीं; व असती तरी स्थळ व काळ यांचा अभाव असल्यामुळें, विविधज्ञानविस्तारद्वारें जे त्यांचे लेख प्रसिद्ध झाले त्यांविषयीं मात्र दोन शब्द लिहितों. बालबोध, अरुणोदय, इत्यादिकांच्या द्वारें त्यांचे जे लेख प्रसिद्ध झाले होते त्याविषयीं उल्लेख केलाच आहे. काव्येतिहाससंग्रह व काव्यसंग्रह हीं दोन तर त्यांच्या अध्यापनश्रमाचीं चांगलीं स्मारकें* आहेत. तेव्हां त्याविषयीं परक्यानें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. निबंध-

* एकाविषयीं पुष्कळदा आमचा अभिप्राय येऊन चुकला आहे व दुसऱ्याविषयीं लवकरच येईल. तूर्त रा० रा० जावजी दादाजी यांचें गुणग्राहित्व व युक्तकरिता यांचें ओघानें आलें ह्मणून अभिनंदन करतों. " कै० जनार्दन बाळाजी मोडक यांचें स्मारक " हे शब्द काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठावर घातल्यानें गुणी व गुणज्ञ या दोघांसही मोठे भूषणीय आहेत.

माला व निबंधचंद्रिका यांतील त्यांचे लेख त्यांच्या सहीनिशीं प्रसिद्ध झाले असल्याकारणानें ते अमुक ह्मणून पुनः येथें सांगण्याची जरूरी नाहीं. आमचा असा अंदाज आहे कीं, माजी 'शाळापत्रकांत' महाराष्ट्र कवितेच्या संबंधानें यांच्या हातचीं कांहीं शंकासमाधानें असावींत, परंतु याचा पत्ता नीट लागणें कठिण.'काव्यरत्नावली'कारांनीं यांस एक काव्यपरीक्षक नेमलें होतें. त्यासंबंधानें ते पुस्तककार जें योग्य असेल तें लिहितीलच. इतके ठिकाणीं हे लेख लिहीत होते तेव्हां यांचा उद्योग, यांचा व्यासंग व यांचें परिशीलन हीं किती वर्णनीय होतीं याची अटकळ वाचकांनींच करावी. शिवाय हेंही पण लक्षांत ठेविले पाहिजे कीं यांचे हे लेख बातमीदारांच्या पत्रांच्या किंवा शिळोप्याच्या गप्पांच्या जातीचे नव्हते; इतकेंच नाहीं, परंतु ज्या वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून ते लेख प्रसिद्ध झाले, त्यांतील मुख्य संपादकाच्या चांगल्या चांगल्या लेखांना सुद्धां ते निस्तेज करून सोडीत व खालीं पहायास लावीत. हे त्यांचे सर्व लेख एकत्र करून छापविले असतां तो संग्रह अत्यंत मोलाचा, उपयोगाचा व अध्ययन करण्यालायक होईल. हें काम कोणीं त्यांच्या घरोब्याच्या मित्रानें पत्करिलें पाहिजे. विविधज्ञानविस्तारांत मोडक यांचे जे लेख आजवर आले त्यांची यादी * खालीं दिली आहे, तीवरून त्यांचे आवडते विषय कोणते होते व लेखविस्तार केवढा आहे

* पुराणग्रंथ; मंगल ग्रहाचे चंद्र; लघु ग्रह; बुध ग्रहावर जीवजंतु आहेत काय ?; नवीन ग्रह; लीलावती; काशी येथील संवत् १९३६ । ३७ । ३८ । ३९ । ४० व ४१ च्या तिथिपत्रांवर अभिप्राय; कालमापन; लघु आर्यसिद्धांत; कळंबी गांवीं आकाशांतून पडलेला दगड; क्षेत्रशंकुच्छेदावरील पुस्तकपरीक्षा; चिंतामणि रघुनाथाचार्य ज्योतिषी; नवीन शोध; पत्रांस उत्तरें; ग्रहणें; वराहमिहिराचा काळ; आर्यकालगणना; स्फुटवक्ता अभियोगी; फलज्योतिष; चंद्रिका ह्मणजे चांदणें; धूमकेतु; धूत; कळंबी गांवीं पडलेल्या दगडाचें पृथक्करण; आर्यभट्ट; रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे; कविचरित्र–श्रीहर्ष, बाण, भवभूति, माघ, सातवाहन, बिल्हण, जगन्नाथपंडितराय, राजशेखर, रुद्रट, क्षेमेंद्र, मंखक, गोवर्धनाचार्य, अलंकारशास्त्रकार, मम्मट; पंचांग; विविधग्रंथसंग्रहपुस्तकावरील अभिप्राय; ज्योतिषी कमलाकर भट्ट; मेघदूतावेष्टित पार्श्वाभ्युदय काव्य; एक नूतन उपलब्ध ६५० वर्षांपूर्वीचें काव्य; भडोच येथील गुर्जर राजांचें प्राचीन राज्य; व्यासकृत महाभारतांत परस्परविरोधी असे दोन लेख; रामजोशाच्या लावण्या; पत्रें व पोवाडे.

याचें सहज अनुमान करतां येईल. रामजोशांच्या लावण्या व बरेच पोवाडे जे विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाले आहेत, ते देखील यांच्याच कडून आले होते. आमचे मित्र या पुस्तकाला स्वतःच्या लेखांनीं व संग्रहीत केलेल्या जुन्या लेखांनीं साहाय्य करून स्वस्थ राहिले नाहींत; परंतु आपल्या इष्टमित्रांना उत्तेजन देऊन त्यांजकडून लेख लिहवून या पुस्तकांत प्रविष्ट करण्याकरितां ते पाठवीत असत. याला एकच उदाहरण पुरे आहे. 'भामिनीविलास' ग्रंथाचें जें पद्यबद्ध भाषांतर या पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे, तें जनार्दनपंतांच्या एका *शिष्यानें त्यांच्या उत्तेजनानेंच तयार केलें, व आमच्याकडे त्यांचे मार्फतच आलें. आतां या भाषांतरावरून तें करणारास कवित्वशक्ति चांगली आहे असें स्पष्ट कळून येतें. परंतु त्या भाषांतराव्यतिरिक्त आजवर त्या गृहस्थाची कविता कोठें दृष्टीस पडली नाहीं. याचें कारण आमच्या बुद्धीस तर असें वाटतें कीं या गुरुशिष्यांचें सांनिध्य सुटलें व जितकें या शिष्यास प्रोत्साहन पाहिजे होतें तितकें मिळणें कमी झालें. जनार्दनपंतांसारखे तेजस्वी पुरुष हे या विद्वन्मंडळांतील सूर्य होत व आमच्या या भाषांतरकार मित्रासारखे पुरुष हे धूमकेतु होत असें ह्मणावें लागतें. ज्याप्रमाणें सूर्यांची संख्या धूमकेतूंच्या मानानें फार कमी, तसेंच जनार्दपंतांसारखे उत्तेजक पुरुषही फार कमी. जेव्हां धूमकेतु सूर्याचे संनिकट येतात, तेव्हां त्यांस त्यापासून तेज प्राप्त होऊन ते झळकूं लागतात व आपण कोणी आहों असें नभोमंडलांस दाखवूं लागतात. परंतु ते जर कालगतीनें सूर्यापासून दूरवर्ती झाले तर ते तेजोहीन होऊन दिसतनासे होतात. ह्याच प्रकार जनार्दनपंतांसारख्या विद्वत्सूर्याचें सांनिध्य किंवा दूरत्व यांपासून झालेला दृष्टीस पडत आला. आतां तर या तेजःपुंज सूर्याचा चिरंतन अस्त झाला तेव्हां त्याच्या मंडलांतील किती धूमकेतु आतां निस्तेज व फिके होतील हें सांगणें फार कठिण आहे. विविधज्ञानविस्तार हा या संबंधानें नभोमंडलरूप आहे हें सांगणें नको. आतां या सूर्यास्तामुळें तेथें अंधकार पडण्याची भीति आहे. परंतु पूर्णचंद्राचा त्याला आश्रय असल्यामुळें तें जितकें एरवीं भयानक दिसलें असतें तितकें दिसणार नाहीं ही एक दुःखांत सुखाची गोष्ट आहे. असो. जनार्दनपंतांचे विविधज्ञानविस्तारावर जे उपकार आहेत ते लिहून पुरणार नाहींत इतके अतोनात आहेत. अंगीकृताचा

* कै० लक्ष्मण रामचंद्र वैद्य, एम्, ए,. एल. एल. बी.

परित्याग होतां होई तों करायाचा नाहीं हा जो त्यांचा बाणा तो त्यांनीं आमरण राखला. विविधज्ञानविस्ताराला त्यांनीं आपलेंसें ह्मटलें होतें त्याचा निर्वाह त्यांनीं अखेरपर्यंत, ह्मणजे देहावसानाच्या पूर्वी सहा दिवसपर्यंत, एकसारखा केला आणि खरोखर त्या सहा दिवसांत जर त्यांस शक्ति असती तर खात्री आहे कीं गेल्या *अंकांतील जोशीबोवांच्या शंकांना† उत्तर खास आलें असतें. आज त्यांच्या हातचा शेवटचा लेख‡ वाचकांना सादर करून, मोडकांच्या या अखेरच्या उपकृतीबद्दल कृतज्ञता दाखवून, त्यांच्या ह्या निरपेक्ष अध्यापनाविषयींचें आमचें ह्मणणें आटपतों.

मोडक हे मोठे विद्वान् होते ह्मणून सांगण्याची जरी जरूरी नाहीं, तरी बऱ्याच विद्वानांत जो मोठा दोष आढळतो तो त्यांच्यांत नव्हता हें सांगणें अवश्य आहे. विद्वान् लोकांत कमी ज्यास्ती मानानें जो मत्सर आढळतो त्याचा गंधही मोडकांत नव्हता, असें ज्यांना ह्मणून मोडकांची थोडी बहुत माहिती आहे त्यांस ठाऊक आहे. 'विद्वांसो मत्सरग्रस्ताः' असा शेरा भर्तृहरीच्या वेळापासून चाललेला आहे, व तो बहुतेक अंशीं तसाच चालला आहे व चालेल. परंतु जनार्दनपंतांनीं त्या दोषाला आपल्याजवळ कधीं येऊं दिलें नाहीं. ते धुतलेल्या तांदुळासारखे या दोषापासून अगदीं अलिप्त राहिले. पुष्कळांना परोत्कर्ष अगदीं सहन होत नाहीं व आपलाच जिकडे तिकडे टेंभा मिरवावा असें वाटत असतें व त्याकरतां त्यांचे सतत प्रयत्न चालले असतात. परंतु जनार्दनपंतांचा प्रकार याच्या अगदीं

---

* वि. ज्ञा. वि. पु० २२ अं. ४

† तें पत्रही आह्मांकडे मोडकांमार्फतच आलें होतें. या गोष्टीवरून ते मनाचे किती मोकळे होते व त्यांस दुराग्रह नव्हता याची चांगली साक्ष पटते. हर! हर! काय या मनुष्यदेहाची क्षणभंगुरता तरी, कीं त्या पत्राचें उत्तर देण्याची त्यांची तयारी असतांही त्यांस तसें करण्यास वेळ सांपडूं नये!

‡ हा लेख लिहून झाल्यावर मोडकांनीं विविधज्ञानविस्ताराकरितां मुद्दाम तयार करून ठेविलेले दुसरे दोन विषय त्यांच्या आप्तांकडून आमच्या एका हितचिंतक मित्रानें मोठ्या खटपटीनें मिळवून आणिले आहेत. शिवाय त्यानें मोडकांनीं केलेली मराठी कविताहीं संपादन केली आहे. हे त्या मित्राचे आम्हांवर उपकार आहेत. हे लेख व कविता लवकरच या पुस्तकांत प्रसिद्ध करण्यांत येतील.

उलट होता. त्यांचें धोरण आपली प्रतिष्ठा वाढवावी हें नव्हतें. 'शाहाणे करून सोडावें बहुत जनां' हें ज्या योगानें साधेल तें त्यांचें धोरण असे, ह्मणूनच त्यांनीं पुष्कळ होतकरू लोकांस हातीं धरून त्यांचे करवीं या त्यांच्या इष्टकार्यास जें साहाय्य झालें तें करवून घेतलें. 'काव्येतिहाससंग्रह' मासिकपुस्तक स्वतंत्र काढण्याचे पूर्वीं त्यांचा असा विचार होता कीं, विविधज्ञानविस्ताराचा निम्मा भाग काव्येतिहासाला द्यावा व निम्मा भाग त्याच्या इतर विषयार्थ खर्च करावा. परंतु तसें करण्यास विविधज्ञानविस्तारास सवड नव्हती, ह्मणून त्यांनीं तें स्वतंत्र पुस्तक काढिलें. त्यांचा विचार–कसा कां होईना–महाराष्ट्र भाषेंत काव्येतिहासाचा संग्रह व्हावा इतकाच होता. स्वत:चा टेंभा मिरवावा हें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. पुढें **काव्यमाला** निघायाला लागण्याबरोबर आपल्या पुस्तकांतील संस्कृत भाग अजी बंद करून दिला. जोंवर विष्णुशास्त्री चिपळुणकर संस्कृत भागाचे संपादक होते तोंवर त्यांनीं नुसत्या मराठी काव्याचें काम आपणाकडे ठेविलें होतें. परंतु तें करण्यास दुसरा कोणी योग्य पुरुष तयार असता तर त्यांनीं त्याची माळ आनंदानें त्याच्या गळ्यांत घातली असती. बरें, जेव्हां दोन्हीं कामें करण्याचें गळीं पडलें तेव्हांही त्यांनीं कुरकुर केली नाहीं. असो. हा जो विद्वान् लोकांत कमी आढळणारा निर्मत्सर गुण तो यांच्या अंगीं चांगला बाणला होता. त्याचें पूर्णपणें अनुकरण करावें असें प्रेमपूर्वक विद्वान् मंडळीस आमचें सुचविणें आहे.

जनार्दनपंत स्वत: कवि होते किंवा नाहीं हें आह्मांस माहित नाहीं. परंतु ते उत्कृष्ट रसिक होते ही गोष्ट निर्विवाद आहे. कवितेचा भोक्ता रसिक होण्यास मनुष्यानें स्वत: कवि असलेंच पाहिजे असें नाहीं. एका जुन्या कवीचें यासंबंधानें असें ह्मणणें आहे कीं "कवि: करोति काव्यानि रसं जानाति पंडित:"

जनार्दनपंत हे चांगले ज्योतिषी झाले होते, व हे व रा. रा. विसाजी रघुनाथ लेले, व रा.रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित या तिघांनीं सायनसरण्युद्धारार्थ जे यत्न केले आहेत त्यायोगानें सर्व लोकांवर त्यांचे स्मरणीय उपकार झाले आहेत. या सत्पक्षपाती त्रिकूटापैकीं काळानें एक कूट तर सर केलें. त्या योगानें एक प्रचंड आधारच खचला असें ह्मटलें तरी चालेल. परंतु लेल्यांसारखे धैर्यनग या कूटप्रपातामुळें खचलेसे दाखविणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

परंतु वेदान्त दुसऱ्यास सांगणें जितकें सोपें आहे, तसें आपल्या स्वत:ला सांगणें सोपें असतें व तसें वागणेंही जर सुकर असतें, तर काय बहार उडती ! उपदेश सुलभ यांत शंका नाहीं. रा. लेले यांस आह्मी उपदेश केला खरा, परंतु विविधज्ञान-विस्ताराची मोडकांच्या चिरंतन वियोगामुळें ‘ नसतां धुरंधर वृषभ बालवृष भरें करून आ वांके’ अशी जी स्थिति झाली व जें त्यास दु:ख झालें आहे त्याच्या परिहारार्थ आह्मांस कांहींच उपाय सुचत नाहीं असें झालें आहे. असो. असा बहुगुणमय पुरुष मृत्युमुखीं पडल्यानें आमचें ह्मणजे महाराष्ट्र लोकांचें व भाषेचें अपरिहार्य नुकसान झालें आहे. तें भरून येण्याचें आज तरी साधन दिसत नाहीं. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरंतन शान्तिसौख्य देवो !

# कै० जावजी दादाजी चौधरी.



जन्म–सन १८३८–३९.  मृत्यु–ता. ९ एप्रील सन १८९२.

**ज्ञातो मात्रा मातृपक्षैर्निकृष्टः । पित्रा लोके ज्ञायते मध्यमस्तु ॥**
**ख्यातिं प्राप्तः स्वैर्गुणैरेव धन्यः । पुत्रैर्वित्तः कोपि पुण्याधिकेषु ॥**

सदरील मदालसाचंपूकाराची उक्ति कोणास मानवत नाहीं? सर्व विचारी लोकांना स्वतःच्या प्रयत्नानें नांवालौकिकास चढणें अत्यंत इष्ट वाटतें; व जे तसे मोठेपणास, योग्यतेस व लोकादरास पात्र झाले आहेत, होत आहेत व होतील, ते सर्व त्यांस अत्यंत प्रियकोटींतील वाटतात हें सर्वतोपरी युक्त आहे. अर्थात् जे दुसऱ्याचे गुणांवरून प्रख्यातसि आलेले असतात त्यांची कदर तितक्याच मानानें

होते हें सर्वानुभूतच आहे. अगदीं परक्याचे गुणांवरून एकाद्याची खरी कदर तर होणें नाहींच; पण स्वकीय मंडळीच्या योगानें ज्याची प्रख्याती होते अशा लोकांच्या प्रख्यातीचे व योग्यतेचे दर्जे या जगांतील अनुभवानें समंजस लोक लावतात, व तशाच प्रकारें सदरील उद्धृत वाक्यांत कवीनें लावले आहेत.

आज ज्याप्रमाणें स्वतःच्या प्रयत्नानें मनुष्यास पुढें येण्यास सुयोग आहेत त्याप्रमाणें आमच्या इकडील पूर्वराजांचे काळीं नव्हते. आमचें इंग्रज सरकार स्वतः प्रयत्नवादी असल्यामुळें त्यांचे सर्व आचार विचार प्रयत्नवादित्वाचे धोरणाचे असतात. त्यांचा सर्व इतिहास अव्वलपासून तों आजवरपर्यंतचा, खुद्द त्यांचे देशांतील ह्मणा किंवा ज्या ज्या ठिकाणीं इंग्रज लोकांचा संबंध पोंचत आहे त्या त्या ठिकाणींचा ह्मणा, या प्रयत्नवादित्वाची पूर्ण साक्ष भरीत आहे. "सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख जाणावा" हें तत्त्व त्या लोकांस नुसतें आमच्याप्रमाणें मान्य आहे इतकेंच नव्हे पण तें त्यांच्या कृतींत देखील ठळक उमटलेलें दिसतें. 'बडे बापका बेटा' हा प्रकार त्यांच्या तिकडे फारच कमी-किंबहुना नाहींच असें ह्मटल्यास चालेल. त्यांची गृहस्थिति व त्यांचा दायभाग हींही स्वतःप्रयत्नाला अत्यंत पोषक आहेत. त्याचप्रमाणें 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' हें जें खरें, उन्नत व उदार तत्त्व हें केवळ भगवद्गीतेंत राहून पाठोपयोगी होण्याचें नसून त्या लोकांच्या प्रत्यहीं व्यवहरांत जागरूकतया दृष्टोत्पत्तीस येतें. तेव्हां अशा लोकांचा आमच्याशीं संबंध असणें ईश्वरास मंजूर असल्यामुळें तो संबंध आजकाल जुळून आला आहे. व त्या संबंधाचे मागून येणारी जी कांहीं बरी वाईट स्थिति यावयाची तीही आह्मांस प्राप्त झाली आहे. आतां मनुष्याला केवळ आपल्या अंगच्या किंवा संपादित गुणांमुळें जगापुढें येण्यास सांपडतें, हा सुयोग त्या बऱ्या स्थितींतील मुख्य अंग होय.

आमचे इंग्रज राज्यकर्ते आह्मांस लाभतपर्यंत हा सुयोग आमचे पूर्वीचे राज्यकर्त्यांचे कारकीर्दींत इकडील लोकांस फारच कमी होता, किंवा नव्हता असें ह्मणण्यासही फारसा प्रत्यवाय नाहीं. कदाचित् तसा पूर्वी सुयोग असल्यास तो इतिहासाभावामुळें आह्मांस जसा दिसावा तसा दिसत नसेल. कोणतेंही कारण असो, पण आज तरी तसा सुयोग पूर्वी होता असें ह्मणणें जरा विचाराचेंच आहे असें कबूल करावें लागतें. खऱ्या गुणविकासाला कालानुकूल्य अवश्य

आहे व तसें कालानुकूल्य पूर्वी नव्हतें. पूर्वी कांहीं कांहीं प्रसंगीं क्षात्रगुणविकासाला आमच्या या देशांत अवसर सांपडला आहे असें जो त्रोटकसा पूर्व इतिहास आज उपलब्ध आहे त्यावरून अनुमान करण्यास जागा आहे. बाकी इतर प्रकारच्या गुणविकासास जातिभेदादि दुरतिक्रम कारणांमुळें कालानुकूल्य नव्हतें असें निराभिमानतया कबूल करावें लागतें. तो प्रकार आतां आमच्या इकडे बराच कमी झाला आहे किंवा उरला नाहीं. त्या योगानें आतां ' गुणा: पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वय: ' हा प्रकार आमच्या इकडे विचार करील त्याला सर्वत्र दिसूं लागला आहे, आतां हे कोण ? राजशालक, हे कोण ? मामासाहेब, हे कोण ? थोरल्या ताईसाहेबांचे वडील, अशासारखीं नातीं जहागिरी मिळविण्यास व नांवालौकिकास चढण्यास अगदीं निरुपयोगी झालीं आहेत. पूर्वी ह्मणजे अशा मंडळीस खरा मान मिळत होता असा प्रकार मुळींच नाहीं. परन्तु ही मंडळी खऱ्या गुणी पुरुषांच्या गुणविकासाला प्रतिबंधक होत होती. त्यामुळें ' जीर्णमंगे सुभाषितम् ' अशी गत सर्व गुणांची होत असे. आतां हा प्रकार आमच्या हिंदूंच्या राज्यांतच होता असें ह्मणण्याचा आमचा उद्देश नसून मुसलमान राजांचे कारकीर्दींतही हाच प्रकार होता. ह्मणजे राजांस किंवा राजाधिकृतांस खऱ्या गुणांची चीज करतां येत नसे, किंवा त्यांस संधि मिळत नसे. व एकंदर राज्याधिकारपद्धतीच्या धोरणानें पाहतां या गुणिजनांस पुढें सरकण्यास रीघच नसे. तेव्हां पूर्वकाळीं गुणविकास होण्यास आनुकूल्य मिळत नसे. आमचेकडे गुणविकासप्रतिबंधक असें दुसरें एक जबरदस्त कारण ह्मटलें ह्मणजे आमचा –ह्मणजे हिंदु व मुसलमान यांचा–दायभाग प्रकार हा होय. या दायभागाच्या पद्धतीनें आह्मांमध्यें अत्यंत आलस्य व मांद्य हीं उत्पन्न केलीं. या आळसानें व मठ्ठपणानें आमचें किती नुकसान केलें आहे याची गणतीही करतां यावयाची नाहीं. जरी आह्मांस हे इंग्रज राज्यकर्ते मिळाले आहेत व जरी आह्मांस स्वत:च्या प्रयत्नाचा कित्ता ते सर्वप्रकारें नित्यश: घालून देत आहेत, तरी या दायभागपद्धतीमुळें आमचें आज अतोनात नुकसान होत आहे. याचा थोडक्यांत मासला पहायाचा असल्यास आमच्या युनिव्हर्सिट्यांचीं क्यालेंडरें घेऊन पहा कीं इतके ग्र्याजुएट व अंडरग्र्याजुएट लोकांपैकीं शेंकडा घरचे खाऊन पिऊन चांगले सुखी असे किती आहेत ? व माधुकरी, वारकरी, दुसऱ्यांचे आश्रयानें किंवा कर्ज घेऊन

शिकणारे असे किती आहेत हें कळेल. तर आमचा अनुभवसिद्ध असा ग्रह आहे कीं, पहिल्या जातीचे शेंकडा दहा पंधरा लोक मिळाल्यास पुष्कळ झाले. असो. पूर्वकालीं गुणविकासास प्रतिबंधक अशीं इतरही कारणें होतीं. त्यांपैकीं जातिभेदप्राबल्य हें एक जबर होतें. जर रामराज्यासारख्या अवर्णनीय व सर्वस्तुत कारकीर्दींत देखील शंबुकास तपश्चरणाला प्रतिबंध होत होता, तर धर्मवेड्या अवरंगझेबाच्या किंवा श्रोत्रिय बाजीरावाच्या कारकीर्दींत जातिभेदामुळें गुणविकासाला किती प्रतिबंध होत असावा याची सहज कल्पना करितां येईल. आज इंग्रजी राज्यांत ह्मणजे जातिभेद नाहीं असें नाहीं. पण तो वेगळ्या प्रकारचा आहे. तो गुणविकासास प्रतिबंधक नसून उत्तेजक आहे. त्यांच्यांतील जातिभेद गुणकर्मविभागावरून आहे व अशा प्रकारचा भेद हा सदैव राहायाचाच. हा निरुपद्रवी व गुणकारी भेद जातिभेद या नांवानें व्यवहार्य असावा किंवा कसें याचा विचार करण्याचें प्रस्तुत स्थल नाहीं व प्रसंगही नाहीं. अस्तु. अशा या कारणांमुळें आमचे इकडे गुणविकासास जसा मिळावा तसा वाव मिळाला नाहीं. तो वाव आज आह्मांस इंग्रज राज्यकर्त्यांच्या योगानें प्राप्त झाला आहे. स्वतःच्या गुणांमुळें मनुष्यास आज उदयास येण्यास प्रतिबंध नाहीं इतकेंच नव्हे पण आनुकूल्यही प्राप्त झालें आहे. मदालसाचंपूकारांनीं वर्णिलेली तिसरी व चौथी कोटी यापुढें सुलभ झाली आहे; मात्र स्वतः प्रयत्न करून आपल्या अंगचे गुण दाखविण्याची खटपट मनुष्यानें केली पाहिजे.

आमच्या सुदैवानें जर हें गुणविकासास कालानुकूल्य इंग्रजांच्या राज्यानें प्राप्त झालें नसतें, तर आज ज्या कांहीं व्यक्ति त्यांच्या केवळ गुणांमुळें उदयास आल्या आहेत व आमच्या सप्रेम आदरास पात्र झाल्या आहेत, त्या व्यक्ति झाल्या किंवा न झाल्या अशासारख्या झाल्या असत्या. आज आमच्या महाराष्ट्रभाषेचें पाणिनित्व जें एका ( लौकिक समजुतीप्रमाणें ) हीन–जातीयाला मिळालें आहे तें पूर्वींच्या कर्मठ व धर्मवेड्या राजकारकीर्दींत तशा जातींतील पुरुषाला मिळालें असतें का? कै० गणपत कृष्णाजी हे जातीचे भंडारी होत हें सुप्रसिद्ध आहे. त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं भागवत, रामायण, भारत इत्यादि प्रचंड संस्कृत ग्रंथ, व हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे प्राकृत ग्रंथ, फार शुद्ध व उत्तम रीतीनें जेव्हां छापून प्रसिद्ध केले, व तेही अगदीं अवेलीस, तेव्हां मुंबईच्या बाह्यप्रदेशीय लोकांस हे छापखान्याचे मालक ब्राह्मणच असले पाहिजेत

असें वाटे व ते त्यांस ‘ वे० शा० सं० रा० रा०’ अशा मायन्याचीं पत्रें लिहीत. त्या परस्थांस जर कोणी हे भंडारी आहेत असें सांगितलें तर त्यांस खरें वाटत नसे; कारण अशा जातींतल्या पुरुषाचे अंगीं असले ब्राह्मणी गुण असणें असंभाव्य आहे अशी त्यांची दृढ समजूत होती. जेव्हां याच छापखान्यांतून पंचांग प्रसिद्ध होऊं लागलें तेव्हां त्याचें कर्तृत्व गणपतचे प्रियमित्र कै० रा० रखमाजी देवजी मुळे यांजकडे असे. ते जातीनें व धंद्यानेंही शिंपी होते. ते चांगले संस्कृतज्ञ असून ज्योतिषशास्त्र त्यांना चांगलें येत असे. तेव्हां ते हें गणपत कृष्णाजीचें पंचांग तयार करीत. प्रथमतः जेव्हां हें पंचांग प्रसिद्ध होऊं लागलें, तेव्हां मुंबईतील ब्राह्मण मंडळी तें शिंप्यानें तयार केलेलें पंचांग ह्मणून त्याचा उपयोग करण्याचा कंटाळा करीत. परंतु स्थल पडलें मुंबई, व राज्य पडलें इंग्रजांचें; ह्मणून आमची जुन्या समजुतीची मंडळी गप्प बसली. नाहींतर हें पंचांग वर्तविणारे ज्योतिषी व त्यांचे पुरस्कर्ते छापखान्याचे मालक यांचे आमच्या कर्मठ राजांच्या कारकीर्दीत खचित हात कलम केले असते! सारांश, खऱ्या गुणाविकासाला आमचे इंग्रज राज्यकर्ते त्यांच्या आचारविचारांच्या योगानें अनुकूल असल्या कारणानें ‘ ख्यातिं प्राप्तः स्वैर्गुणैरेव धन्यः ’ असें ज्यांविषयीं ह्मणतां येईल असे पुरुष आज आमच्यामध्यें निपजूं लागले आहेत. आणि अशाच कोटींतील आमचे मित्र कै० **जावजी** हे होत. यांचें अल्पसें चरित्र देण्याचा आमचा विचार आहे. यांचा व या पुस्तकाचा (वि. ज्ञा. वि. चा)आज वीस वर्षांपेक्षां अधिक दिवसांचा संबंध आहे. विविधज्ञानविस्तारानें मागें आपल्या २१ वर्षांचा इतिहास दिला आहे त्यांत त्यानें स्वतःस जावजींची किती मदत होती हें कंठरवानें व प्रांजलपणें कबूल केलें आहे. ‘सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः’ हें सर्व उद्योगांचें मूळ बीज असल्यामुळें, व वि० ज्ञा० विस्ताराचें व या मूळ बीजाचें सटी सहामासीं दर्शन असल्यामुळें, या पुस्तकास कधींच गाशा गुंडाळावा लागला असता. दिवाळें वाजायाला फार तयारी लागत नाहीं. पतीची वेळ असते तेवढी निभावली ह्मणजे गाडा पुढें सुरळीत चालतो. वि० ज्ञा० विस्ताराची ही वेळ जावजींनीं पुष्कळ प्रसंगीं निभावून नेली व आमरणान्त या पुस्तकावर अकृत्रिम प्रेम ठेविलें. जावजींच्या या निभावून नेण्याबद्दल व अकृत्रिम प्रेमाबद्दल वि० ज्ञा० विस्ताराच्यानें उतराई तर होववत नाहींच. तथापि जनरूढीप्रमाणें त्यांचे विषयीं अल्पसा लेख लिहून आपली कृतज्ञताबुद्धि दर्शविण्याचा हा यत्न आहे.

आतां जावजींचें आह्मी अल्पसें चरित्र कां देणार व विस्तृत कां लिहीत नाहीं असा सहज कोणीही प्रश्न करील. त्यांतून त्यांचा व आमचा वीस वर्षांचा परिचय, घरोबा व ऋणानुबंध. तेव्हां आह्मी या आमच्या प्रियमित्राचें विस्तृत जीवनचरित्र लिहावें हें उचित होय. खरें आहे; परंतु विस्तृत चरित्र देण्यापुरती आमचेजवळ सामुग्री नाहीं. सामुग्री नसण्याचें मुख्य कारण आमचा हलगर्जीपणा. आमच्या लोकांची वृत्ति इतिहासप्रिय नाहीं. इतिहास लिहून ठेवण्याकडे किंवा संग्रह करण्याकडे आमचे लोकांची फारच कमी प्रवृत्ति आहे, किंबहुना नाहीं असें ह्मटल्यासही चालेल. आतां कोणी ह्मणतील कीं, जावजींचा नांवलौकिक आज दहावीस वर्षांत झाला, तेव्हां त्यांचेविषयीं काय माहिती मिळवायाची ? तर जावजी सोडून द्या, आणि परवां नुकते परलोकवासी झालेले **जंगली** महाराज घ्या. ते तर संस्मरणीय अशा कुळांत जन्मलेले किंवा संग्रहीत होते ? तसे जर ते नसते तर आमचे सरकारची त्यांजवर इतकी निगाह्बानी कां असती ? त्यांना५०० रुपये माहेवारी पेन्शन सरकार देत होतें तेव्हां ते तर उपटसुंभ नव्हते ना? पण त्यांचेविषयीं आह्मांस कितीशी माहिती आहे ? नाहीं ह्मणायाला सातारा येथील 'बोधसुधाकरा' नें या महाराजांसंबंधानें चांगली माहिती दिली होती. बहुतेक वृत्तपत्रांनीं त्यांच्या मृत्युवार्तेपलीकडे उल्लेखच केला नाहीं. एकदोन वृत्तपत्रकारांनीं या महाराजांचें जें इतिवृत्त दिलें आहे तें वाचलें असतां गटारयंत्रावरील तपकीर ओढीत बसलेल्या भटांस जितकी त्यांच्या व्यवसायाखेरीजची माहिती असते, तशाच प्रकारची माहिती या लेखकांस असावी असें वाटल्यावांचून राहत नाहीं. तर हें कशाचें दर्शक असावें ? इतिहासाविषयीं आमची जातिवंत प्रवृत्तिच नाहीं. तेव्हां या प्रवृत्त्यभावामुळें सामुग्री मिळण्याविषयीं जितकी खटपट व्हावयास पाहिजे होती तितकी झाली नाहीं. दुसरें कारण जावजींची स्वत:विषयीं संकोचवृत्ति. यद्यपि स्वत:चा भाट स्वत:पेक्षां दुसरा कोणी नाहीं (The arch-flatterer is one-self) असें एका प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याचें ह्मणणें आहे, तथापि जावजी हे या उक्तीला अपवाद होते. त्यांना स्वत:विषयीं बोलण्याचा संकोच व कंटाळा असे. साधारणत: जगाची प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे आत्मस्तुति करण्याची व करवून घेण्याची त्यास मोठी आवड असते. पण जावजींच्या संबंधानें प्रकार अगदीं निराळा होता. 'ज्ञानचक्षू'कारांनीं आज दोन अडीच वर्षांपासून प्रतिमासास थोर पुरुषांचा जीवनवृत्तांत देण्याचा अनुकरणीय व प्रशस्त क्रम धरिला आहे. तेव्हां त्यांस जावजीं

च्या जीवनवृत्तांताचीं टांचणें पाहिजे होतीं. तीं जावजींच्याखेरीज इतर फार थोड्यांना देतां आलीं असतीं. कारण त्यांचें वृत्त इतरांस माहित असण्याचा संभव नव्हता. अशा प्रकारची माहिती असण्यास संपत्ति, उच्च कुल, मोठा गोतवळा, विद्या, इत्यादि जीं अवश्य साधनें तीं आमचे प्रियमित्रासंबंधानें नव्हतीं असें पुढील वृत्तांतावरून लक्षांत येईल. तेव्हां माहिती मिळायाचें साधन खुद्द जावजी. त्यांना तर आत्मस्तुतीचा विटाळ होता. त्यांच्या जीवनवृत्तांतांत स्मरणीय असा अंश दिसत नव्हता. या योगानें त्यांच्या जवळच्या व निकट संबंधांतील लोकांस देखील जशी असावी तशी त्यांच्या विषयींची माहिती नाहीं. नाशिककर क्षेत्रस्थ ब्राह्मणाच्या चिकाटीनें जी काय माहिती बाहेर आली आहे तेवढीच लोकांस माहित आहे, व ती आतां ज्ञानचक्षूंत प्रसिद्धही झाली आहे. ह्या दोन मुख्य कारणांमुळें आमचे जवळची सामुग्री अगदींच अल्प आहे. शिवाय आमचे व जावजींचे एक संमाननीय मित्र जावजींचें विस्तृत चरित्र लिहीत आहेत असें खात्रीलायक आधारावरून कळतें. तेव्हां त्या विस्तृत चरित्रभागाकडे आमचे वाचकांस बोट दाखवून आह्मी आज हें प्रकरण थोडक्यांत आटपून घेतों.*

---

* हा लेख बहुतेक लिहून तयार झाल्यावर सदरीं निर्दिष्ट विस्तृत चरित्र छापून प्रसिद्ध झालें. तें चरित्र जावजींचे प्रिय मित्र, मंत्री, गुरु व आश्रित रा० सा० विनायक कोंडदेव ओक यांनीं लिहिलें आहे. जावजींचे वडील चिरंजीव रा० तुकारामजी यांनीं तें छापून प्रसिद्ध केलें, आहे व ज्यांचा ज्यांचा ह्मणून निर्णयसागराशीं व जावजींशीं प्रत्यक्ष किंवा परंपरया संबंध पोंचत होता अशा सर्वांस या चरित्राची एक एक प्रत पाठवून दिली आहे. तेव्हां आमचेकडेही त्याची एक प्रत आली आहे. तिचा आम्ही परमादरानें स्वीकार केला आहे हें कांहीं सांगणें नकोच.

प्रस्तुत पुस्तकाचीं अन्तर्बाह्य स्वरूपें जावजींच्या चरित्राचीं अनुक्रमें शाब्द व प्रत्यक्ष प्रमाणें आहेत. जावजी हे आमचे इकडील मुद्रणकलाचतुर्धर होते, ते उदार होते, ते साधे होते, त मोठे रसिक व मार्मिक होते, व त्यांनीं महाराष्ट्रांतील मुद्रणकलेच्या सर्व कामांत कमाल करून सोडली होती—ह्या सर्व गोष्टी प्रस्तुत पुस्तकाचें बाह्यस्वरूप पाहतांच प्रत्यक्ष मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभ्या राहतात. तुकारामजींनीं ह्या पुस्तकाचे द्वारें एकसमयावच्छेदेंकरून आपल्या वडिलांची मूर्ति, कृति, कौशल्य, कल्पकता, कर्तबगारी व कार्यकारिता इत्यादि गोष्टी प्रत्यक्षतया आम्हां सर्वां परिचितांस देऊन

**जावजी दादाजी** हे जातीचे मराठे होते. यांचें आडनांव चौधरी होतें. चौधरी हें कार्यवाचक नांव आहे. ज्याला इंग्रजींत *Guild* किंवा *Trade*

आपली पितृभक्ति, उचितज्ञता, मार्मिकता हीं व्यक्त केलीं आहेत. त्याचप्रमाणें आपल्या वडिलांनीं स्वतः संपादिलेलें मुद्रणकलाचतुर्धरत्व आपण अखंड व अस्खलित चालवूं असें तुकारामजींनीं या पुस्तकाच्या बाह्य स्वरूपानें जणूं सर्वांना आश्वासन दिलें आहे, असें हें पुस्तक पाहतांच मनांत येतें. 'लब्धस्य परिपालनम्' हें संपादण्यापेक्षां एका तऱ्हेनें ज्यास्ती कठिण आहे. 'क्लिश्नाति लब्धपरिपालनवृत्तिरेव ' अशा सारखीं अनुभवसिद्ध विधानें पुष्कळ आहेत. तेव्हां तें कठिण काम करण्याचें सामर्थ्य तुकाराम-जींचे अंगीं आहे असें या पुस्तकाच्या बाह्यस्वरूपावरून पाहून आम्हांस फार संतोष होतो. हें सामर्थ्य तुकारामजींस सदैव असो व दिवसेंदिवस तें वृद्धि पावो असें आह्मी अंतःकरणपूर्वक इच्छितों. ज्या ज्या लोकांना ह्मणून मुद्रणकलेची बारीक सारीक बरीच माहिती आहे व ज्यांस सौंदर्यविषयक दृष्टि आहे ते सर्व लोक प्रस्तुत पुस्तकाचें एकंदर बाह्यस्वरूप व त्याचीं उपांगें पाहून अत्यंत आनंदित झाले. व 'श्वानवद्गुर्गुरायते' ही जी समानकर्मीण व समानधर्मीय लोकांची वृत्ति असते ती ते विसरून गेले व तुकारामजींची व त्यांच्या साहाय्यकांची त्यांनीं तारीफ केली आहे. अस्तु.

आतां या पुस्तकाच्या अंतःस्वरूपाच्या संबंधानें अभिप्राय देण्यास आमची लेखणी कचरते. ठीकच आहे. कां नाहीं कचरणार ? लहान तोंडानें मोठा घांस तिनें घ्यावा कसा ? वि. ज्ञा. विस्ताराचा व रा. सा. विनायकरावजी ओक यांचा शिष्यगुरुसंबंध किंवा अंशतः पोष्यपोषकसंबंध असल्याकारणानें त्याची लेखणी रावसाहेबांसारख्या महाराष्ट्र भाषेंतील ग्रंथकारशिरोमणींचे कृतीबद्दल बरावाईट अभिप्राय देण्यास कचं-रावी हें अगदीं युक्त आहे. तशांतून ' स्वयंप्रकाशमानस्य कुतो नीराजनो विधिः' असा वास्तविक प्रकार असल्यामुळें या चरित्राचे अंतःस्वरूपाविषयीं वि. ज्ञा. विस्तारानें कांहीं लिहूं नये हें युक्त आहे. परंतु 'गुरुर्वा गुरुपत्रो वा' या न्यायानें किंवा रा. सा. नीं आह्मांस व सर्व जगास 'तुम्ही आपलें कर्तव्य करा, तें करण्यास चुकूं नका' 'मुखें सत्य, अंगें विनीत' असे व्हा, अशा तऱ्हेच्या वारंवार केलेल्या उपदेशांप्रमाणें वि. ज्ञा. विस्तारास किंवा प्रस्तुत लेखकास या शाब्दचरित्राविषयीं काय वाटतें तें कळविण्या-विषयीं तो धाडस करितो. या औद्धत्याबद्दल रावसाहेब क्षमा करतील.

सदर पुस्तक पाहण्यापूर्वीं हें जावजींचें चरित्र विस्तृत होईल व भरपूर होईल असें वाटत होतें. कारण रा. विनायकराव यांस जावजींची इतरांपेक्षां पुष्कळच माहिती

*Union* ह्मणतात तसा प्रकार आमच्या इकडेही कर्मकार (ह्मणजे कामकरी) लोकांचा आहे. आह्मी त्या प्रकाराला जात ह्मणतों. आमच्या जातीच्या

होती. रा. सा. स जावजी गुरु मानीत. त्यांच्या जवळ जावजी आपलें हितगुजही सांगितल्याशिवाय राहत नसत. ठीकच आहे. तोरण्याचा किल्ला सर करणाऱ्या शिवाजीला जसा कोंडदेवसुत दादोजी हाच योग्य गुरु होता, तसा ह्या मुद्रणकलादुर्गास सर करणाऱ्या जावजींस कोंडदेवसुतच योग्य होय असें कोण नाहीं ह्मणणार? तेव्हां जावजींविषयीं पूर्ण माहिती या चरित्रांत येईल असें वाटत होतें, व ह्मणूनच सदरीं आह्मी 'विस्तृत' असें या तेवेळीं भविष्यचरित्रास म्हटलें होतें. परंतु हें पुस्तक पाहतां तें विशेषण सार्थक नाहीं असें ह्मणावें लागतें. हें चरित्र फारच त्रोटक आहे हें पाहून आमची फार निराशा झाली.

आतां चरित्रें कशीं असावीं, त्यांत कोणकोणतीं उपांगें असावीं, वगैरे गोष्टी आमचे महाराष्ट्र ग्रंथकारांपैकीं जर कोणास पूर्णपणें अवगत असतील तर त्या प्रमुखत्वें रा. सा. ओकांसच असल्या पाहिजेत व आहेत. रा. सा. ओक यांनीं मोठ्या लोकांचीं स्वत: दहा पांच बरींच मोठीं चरित्रें लिहिलीं आहेत; शेंदोनशें त्रोटक चरित्रें लिहिलीं आहेत व निदान हजार पांचशें तरी त्यांनीं चरित्रग्रंथ वाचले असावे. तेव्हां अशा बहुश्रुत गृहस्थाचे हातून विशेषत: जावजींचें चरित्र ह्मणजे रसिक लोकांस अपूर्व पकान्न मिळेल अशी लोकांची अपेक्षा असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु ती लोकांची अपेक्षा अगदीं पुरली नाहीं. हें चरित्र असें त्रोटक व अपुरें ठेवण्यास रा. सा. ओकांस कांहीं सबळ कारणें असतील. पण लोकांना तीं कारणें सबळ वाटायाचीं नाहींत. तेव्हां आह्मां लोकांचा रा. सा. ओकांनीं फारच आशाभंग केला याबद्दल वाईट वाटतें. ज्ञानचक्षूंतील लेखांत किंवा काव्यसंग्रहाचे लेखांत जितकी कांहीं जावजींविषयीं व तत्संबंधीयांविषयीं माहिती आली आहे, तितकी देखील प्रस्तुत चरित्रांत समाविष्ट झालेली नाहीं. जावजीसारख्या सत्पुरुषास जिनें आपल्या उदरांत वागविलें व पुढें कित्येक वर्षेपर्यंत त्याला वाढविलें त्या माउलीचें नांव किंवा तिचा उच्चारही या पुस्तकांत नसावा, किंवा ज्या सतीबद्दल जावजींचें प्रेम अत्यंत निर्मल, सरल व अस्खलित होतें त्या सतीचें नांव व तिजबद्दल थोडीशी इतर माहिती—म्हणजे तिचीं अपत्यें व तिचा सुनालेकींशीं व्यवहार वगैरे—देखील नसावी ही कांहीं थोडी आश्चर्यावह गोष्ट नाहीं. अस्तु. बाकी अंत:स्वरूपाचा भाग उत्कृष्ट आहे.

प्रकारांत मूळचे गुणकर्मविभागाचा तर आधार आहेच. पण त्यांत अनुवंशीयत्व हेंही सामील केलें गेलें आहे. तेव्हां मोठमोठ्या ठिकाणीं ( विशेषत: राजकीय महत्त्वाचे ठिकाणीं ) या कर्मकार जातींत एक एक नायक असतो. त्याला 'चौधरी' ह्मणत असतात. सरकाराला किंवा एखाद्या विशिष्ट अधिकृताला अमुक एक जातीच्या कर्मकारांची जरूर पडली ह्मणजे त्या त्या जातीचे चौधऱ्यांस बोलावून आणून त्याला जें काम असेल तें सांगितलें ह्मणजे कार्यभाग बिनबोभाट उरकतो. हा चौधरी किताब हिंदुस्थानांत जाति किंवा धर्म याचा विचार न होतां कर्मकार टोळीच्या नायकास देण्याचा संप्रदाय आहे. या योगानें ही चौधरी पदवी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ( सर्व प्रकारचे कर्मकार वर्ग ), अतिशूद्र व यवन या सर्व प्रकारचे लोकांस राजाज्ञेनें किंवा ग्रामस्थांचे संमतीनें दिलेली आढळते. अस्तु. तेव्हां कांहीं एक कर्मकार वर्गाचें चौधरीपण जावजींच्या कुलांत असावें असा निष्कर्ष निघतो. आतां आमच्या इकडे इतिहासप्रियता लोकवृत्तींत फार कमी, किंबहुना नाहीं असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. यामुळें सर्व बाबतींत आमच्या इकडे अंधत्व उत्पन्न झालें आहे. सर्व गोष्टी तर्कावर घ्याव्या लागतात. निश्चयात्मक ह्मणून कांहींच सांगतां येत नाहीं. ही जी इतिहासाविषयींची उदासीनवृत्ति आमचेकडे दिसत आहे ती आजकालची नसून फार प्राचीन आहे; व प्राचीन तेवढें सर्व गोड अशा आमच्या दृढ समजुतीमुळें आमच्यांत अद्यापि तें औदासीन्य टाकण्याची प्रवृत्ति होत नाहीं! ही स्थिति आमच्या देशापुरती तरी सार्वत्रिक असल्यामुळें अमुक एक विशेष वर्गाकडे याचा दोष आहे असें आमचें ह्मणणें नाहीं. मोठमोठ्या राजघराण्यांचा जेथें पत्ता नाहीं तेथें जावजींच्या कोणा पूर्वजास चौधरी हें पद मिळालें, व कोणत्या कामाकरितां, व कोणत्या राजाचे कारकीर्दींत तें मिळालें, याचा पत्ता लागण्याची अगदीं आशा नको. फार तर काय पण जावजींचे पूर्वज मूळचे राहणारे कोठील

---

कांहीं कांहीं जावजींचीं ह्मणून मतें लिहिलीं आहेत तीं सर्वसंमत होण्याजोगीं नाहींत. परंतु त्याविषयीं विशेष चर्चा करण्याचे प्रयोजन नाहीं. कारण जावजी हे विद्वान नव्हते व विद्वत्तेबद्दल त्यांस घमंडही नव्हती. तेव्हां त्यांच्या मतांवर लोक भिस्त ठेवणार नाहींत व तीं आधारादाखल समजणारही नाहींत. एकंदरींत सदर पुस्तक सर्वप्रकारें आल्हादकारक, संग्राह्य व वाचनीय झालें आहे.

याचा सुद्धां पत्ता नाहीं. कोणी ह्मणतात यांचे पूर्वज मावळांत राहत, कोणी ह्मणतात उत्तरकोंकणांत राहत, कोणी ह्मणतात पुरंदर तालुक्यांत राहत, असा सर्वच घोंटाळा आहे. चौधरी या आडनावांवरून इतकी गोष्ट अनुमित करतां येते कीं, एका काळीं जावजींचें घराणें राजमान्य, राजाधिकृतमान्य किंवा ग्रामस्थमान्य तरी होतें. तें घराणें कालचक्राचे फेऱ्यामध्यें सांपडून त्यांतील एका वंशजास मुंबईंतील एका पेढीवर तगाददाराची नोकरी करावी लागली. ते वंशज जावजींचे वडील होत. यांस जावजीखेरीज अन्य अपत्यें झालीं असल्यास माहित नाहीं. असल्यास माहित व्हावें कसें ? जर कोणा गृहस्थाचे कुळगोताची, मूळ वसतीस्थानाची किंवा इतर माहिती विचारावयास जावें, तर बहुतेक असा प्रश्न दत्त ह्मणून उभा असतो कीं 'कां हो, तुह्माला यांचेकडे मुलगी द्यायाची घ्यायाची आहे ह्मणून इतका बारीक शोध करतां?' तेव्हां एखाद्या वर्ण्यव्यक्तीविषयीं लिहायाचें ह्मटल्यास त्याचे अनुषंगिक माहितीविषयीं चकारही काढूं नये अशी आमची स्थिति आहे; कारण संग्रहणीय अशी माहितीच मिळणें कठिण आहे. तेव्हां जावजींचे जन्मवृत्तापर्यंतची पूर्वींची माहिती यथातथाच आहे. जावजींचे आजे मुंबईस येऊन स्थायिक झाले. त्यांचें उंबरखाडीवर एक घर होतें. ते गोदींत नोकर होते. त्यांचे चिरंजीव दादाजी हे एका पेढीवाल्याकडे शिपाई होते. दादाजीचे चिरंजीव जावजी. यांचा जन्मकाळ त्यांच्या बाळपणच्या इतर वृत्ताप्रमाणेंच संदिग्ध आहे, व असें असणें अगदीं ठीक आहे. कारण जावजींचा जन्म अगदीं निर्धन कुलांत झाला होता, तेव्हां गरीबाला हे धर्मकर्मादिकांचे सोहाळे कुठून प्राप्त होणार ? होळकर साहेबांची पत्नी अंतर्वत्नी असली ह्मणजे होणाऱ्या अपत्याचें जन्म, जन्मपत्रिका, वर्षफल, कुंडलिका होत असतात. तसा प्रकार जावजींची मातु:श्री जेव्हां गरोदर झाली होती तेव्हां होण्याचा संभव नव्हता. ही बाई प्रसूत झाली असेल तेव्हां शेजाऱ्यापाजाऱ्यांना देखील हें जन्मवृत्त कळलें असेल कीं नाहीं याची आह्मांस शंकाच आहे. त्यांतून जावजी हे आपल्या आंगच्या गुणांनीं पुढें मुद्रणकारचतुर्धर ( चौधरी ) होतील, राजमान्य ( जस्टिस आफ धी पीस ) होतील, व हजारो माणसांचे पोशिंदे होतील असें जर पूर्वीं कळलें असतें तर यांचा जन्मकाळ व इतर बालवृत्त हीं सर्व कदाचित् कोणीं टिपून ठेविलीं असतीं. पण तसा प्रकार व्हावा कसा ? शिवाय जर ब्राह्मणकुलांत जावजींचा जन्म झाला असता तर कदाचित् त्यांचें जन्मटिप्पण

सांपडण्याचा संभव होता. परंतु जावजींचा जन्म ५०।५५ वर्षांपूर्वी मराठ ज्ञातींत झाला. त्यावेळीं या मराठे ज्ञातीला उन्नतावस्थेप्रत पोंचविण्याचा आजच्या सारखा स्तुत्य प्रयत्नही चालू नव्हता. तेव्हां जावजींचा जन्मकाल आजवर संदिग्ध असावा हें साहजिक आहे. आह्मीं येथवर जन्मकाल या शब्दाचा उपयोग केला आहे त्याचा व्यापक अर्थ घेतला पाहिजे; ह्मणजे जावजींचा जन्म कोणत्या सालीं झाला हें देखील निश्चयात्मक कोणास ठाऊक नाहीं.. ठोकदृष्टीनें पाहतां त्यांचा जन्म स० १८३८।३९सालीं झाला. ठाम तिथि, वार, नक्षत्र व मास यांचे माहितीची अपेक्षा कशास करावी ? आतां जोतिःशास्त्राचे बलावर कोणी पटवर्धन किंवा गोविंद चेट्टी ती माहिती देतील तर जावजींचे चिरंजीवांनीं मिळवून आपल्या वडिलांच्या विस्तृत चरित्रांत समाविष्ट केल्यास श्रद्धाळु लोकांची जिज्ञासा बरीच तृप्त होईल. बाकी जावजींविषयीं आजवर जे लेख आमचे पाहण्यांत आले आहेत त्यांत ही माहिती दिलेली नाहीं व आह्मांलाही ती शोध करितां मिळाली नाहीं. त्याचप्रमाणें त्यांचें बालपणचें वृत्तही कांहीं माहित नाहीं. ते त्या काळच्या इतर निर्धन कुळांतील मुलांप्रमाणेंच सैरा वैरा फिरणारे असावेत. शालादि संस्कार त्यांस झाले असल्यास फारच अल्पकालीन झाले असावे, कारण त्यांचें एकंदर आयुष्य जरी मुद्रणव्यापारांत गेलें तथापि त्यांस स्वतःची सही करण्यापुरती लेखनकला व साधारण वाचण्यापुरती वाचनकला इतकीच काय ती विद्या अवगत होती. त्यांचे वयाचे ७।८ वे वर्षी त्यांचे वडील वारले. मुंबई सारख्या ठिकाणी राहणें आणि त्यांतून घरचा कमावता मनुष्य नाहींसा झाला, ह्मणजे आधींच निर्धन अशा कुटुंबाची काय स्थिति होत असेल त्याची कल्पना देखील दुःसह होय. तेव्हां त्या स्थितीचें वर्णन किती तरी दुःखद होईल ! ह्मणून त्या गोष्टीचा उल्लेखच नको. पण अशा स्थितींत जावजींच्या मातुःश्रीनें धीर सोडला नाहीं. त्या माउलीनें फळें विकण्याचा रोजगार करून आपला व आपल्या मुलाचा उदरनिर्वाह चालविला. वयाचे दहावे वर्षी जावजी हे २ रुपये दरमाहावर अमेरिकन मिशन प्रेसमध्यें टैप घांसण्याचे कामीं नोकर झाले. या छापखान्यांत ते सुमारें १२ वर्षे निरनिराळ्या कामांवर होते, व वयाप्रमाणें व हुशारीप्रमाणें २ रुपयांपासून १२ रुपये दरमहापर्यंत त्यांचा पगार चढत गेला. पुढें तो छापखाना 'मुंबई टैम्स' मध्यें सामील झाला. तेथेंही हे कांहीं दिवस

कामावर होते. याच सुमारास ह्मणजे सन १८६२ सालीं इंदुप्रकाश छापखाना सुरू झाला. तेथें ते टैप ओतण्याचे कामावर दीड दोन वर्षें होते. तेथून नंतर ते ओरिएन्टल प्रेस नांवाचा मिशनरी लोकांचा कारखाना झाला होता त्यांत ३० रुपयांवर राहिले. तेथें कांहीं दिवस काढल्यावर त्यांचे मनांतून टैप पाडून विकण्याचा स्वतंत्र धंदा करावा असें आलें. परंतु स्वतंत्र धंद्यास भांडवल हवें. जावजींजवळ स्वःतची पुंजी कांहीं नव्हती; आणि ती असावी तरी कशी ? दहा पांच रुपये पगार आणि मुंबईचें राहणें यांचा मेळ बसून शिल्लक पडावी कशी व पुंजी व्हावी कशी ? तेव्हां जावजींजवळ पुंजी नसावी हें अगदीं ठीक आहे. पण जावजींनीं नोकरी सोडून स्वतंत्र एक लहानसा कारखाना काढला हीही गोष्ट निर्विवाद आहे. तेव्हां जावजींना कोणाची तरी मदत असली पाहिजे. आतां ती कोणाची होती ही गोष्ट मात्र वादग्रस्त आहे व तिचा निर्णय करण्याचें जोखीम आह्मी आपल्या अंगावर घेत नाहीं. इंदुप्रकाशकार ह्मणतात कीं, त्या छापखान्याचे त्यावेळचे मालक वे० शा० सं० रा० रा० केशव शास्त्री गाडगीळ व लक्ष्मण शास्त्री हळबे व रा० पांडुरंगजी बनारसे यांच्या मदतीनें जावजींनीं हा कारखाना उभारला; सुबोधपत्रिकाकार ह्मणतात कीं, बनारसे यांच्याच मदतीनें जावजी या कामास प्रवृत्त झाले; दीनबंधूकार यांचा बनारसे यांजवर कटाक्ष असून ते जावजींचे मामास सर्व श्रेय देतात; काव्यसंग्रहकार रा० रा० वा० दा० ओक यांनीं मोठ्या युक्तीनें या वादांतून पळ काढला आहे. व त्यांच्या लिहिण्यावरून ते आमच्यासारखेच यांतील खऱ्या प्रकाराविषयीं अनभिज्ञ असावे असें वाटतें. त्यांच्या मतें रा० रा० आरू व बनारसे या दोघांच्या मदतीनें जावजी पुढें सरसावले. व अखेर विनायकरावजी ओकांनीं जावजींचे उत्कृष्ट चरित्रांत या वादविषयक सर्व मंडळींना—मामा साहेबांससुद्धां—एकीकडे ठेवून खुमा शेटींना हा स्वतंत्र कारखाना काढण्याचें धैर्य जावजींस येण्याचें श्रेय दिलें आहे. तेव्हां ज्या मंडळीचा जावजींशीं निकट संबंध होता अशा मंडळींत जर इतका जबर मतभेद आहे तर आमच्या सारख्या दूरस्थांनीं याविषयीं काय लिहावें ? जितक्या मंडळीनें ह्मणून जावजींचे लहान मोठे चरित्रलेख लिहिले आहेत त्या सर्वांत 'दीनबंधुकारांना जावजींविषयीं साद्यंत' व बरीच विश्वसनीय माहिती असावी असें त्यांच्या लेखांवरून वाटतें. वास्तविक ह्मटलें ह्मणजे रा० तुकारामजींनीं रा० सा०

ओक यांचे नादीं न लागतां रा० सा० लोखंडे यांचेकडून जावजींचें चरित्र लिह-वावयाचें होतें; ह्मणजे निव्वळ सत्य बाहेर आलें असतें. अस्तु. झाली गोष्ट तिला इलाज नाहीं. पण अजून जरी रा० सा० लोखंडे मेहरबानी करतील तरी खरा प्रकार बाहेर येईल व लोकांवर महदुपकार होतील. पण जोंपर्यंत हें सत्यनिरूपण चांगलेंसें होत नाहीं तोंपर्यंत कोणा तरी सज्जनांचे साहाय्यानें जावजींना स्वतंत्र कारखाना उभारतां आला एवढेंच आह्मीं ह्मणतों. पण या विषयाची खरी माहि-ती मिळणें फारच महत्त्वाचें आहे. कारण जरी ही गोष्ट कित्येकांना अगदीं क्षुल्ल-कशी वाटेल तरी ती तशी नाहीं असें आमचें ह्मणणें आहे. या क्षुल्लकशा गोष्टीमुळें जावजींना श्रेष्ठिपद ( शेटजीपणा ) मिळालें व आज जे जावजी त्रिजगांत ( एशिया, युरोप व अमेरिका ) प्रसिद्धीस आले आहेत व सर्व समंजस विद्वान् लोकांचे स्तुतिविषय होऊन बसले आहेत ते याच लहानशा पण अति-महत्त्वाच्या गोष्टीमुळेंच, असें कोणीही कबूल करील. मोठमोठ्या मनुष्यांचे आयु-श्चक्रांत काय किंवा देशाच्या इतिहासचक्रांत काय, या दिसायाला क्षुद्र अशा गोष्टींनीं अतिमहत्त्वाचे व चिरंतन असे उलट किंवा सुलट असे वेढे देऊन ठेवले आहेत कीं, मोठमोठ्या या चक्रपरीक्षक मंडळीना देखील ते वेढे दुरूह्य व दुर्ज्ञेय झाले आहेत. ज्याप्रमाणें मोठमोठाले पूल हे लहानशा दिसणाऱ्या पण खऱ्या महत्त्वाच्या मत्स्याच्या जोरावर उभे असतात, त्याप्रमाणेंच मोठमोठ्यांचे आयुः-सेतु अगदीं लहानशा मत्स्याचे जोरावर अढळ उभे आहेत. तेव्हां अशा लहानशा दिसणाऱ्या गोष्टींची माहिती जगास असणें अगदीं जरूर आहे. जगां-तील ज्या प्रसिद्ध व चिरपरिणामी उलाढाली झाल्या आहेत त्या सर्वांचें मूळबी-ज पाहूं जातां तें अगदीं क्षुद्र गोष्टींतच आढळेल. आह्मी ह्मणतों या गोष्टीची साक्ष पटविण्यास इतिहास कंबर बांधून तयार आहे. तेव्हां जावजींना स्वतंत्र कारखाना काढण्यास ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून अनेक प्रकारांनीं साहाय्य केलें असेल त्या सर्व लोकांविषयीं माहिती जावजींचे चरित्रांत अवश्य आली पाहिजे. या एका किंवा अनेक सज्जनांची मदत जर जावजींना नसती तर जावजी अखेर-पर्यंत कीर्तिमंदिरांतील रंगभूमीवर आले नसते, व त्यांच्या अंगचे अनेक स्पृहणीय व अनुकरणीय गुण जागच्याजागीं जिरून गेले असते. कोणत्याही गुणविकासाला प्रसंगानुकूल्य पाहिजे. आतां हें प्रसंगानुकूल्य कसें व कोणाचे योगानें मिळालें त्याचा इतिहास गुणिपुरुषांच्या चरित्रांत अवश्य दाखल झाला

पाहिजे. या बाबतींत खरी माहिती कोणास असेल त्यानें ती जगापुढें मांडावी अशी आमची अगत्यपूर्वक सूचना आहे. दीनबंधुकारांस जावजीं-विषयीं ही व इतर माहिती पुष्कळ आहे असें त्यांच्या अनेक दर्पोक्तींवरून दिसतें. तर त्यांनीं हें लोकांचें या बाबतींतील आंध्य दूर करण्याचें मनावर घेत-ल्यास लोकांस पुष्कळ उपयोग होईल. अस्तु. जावजी स्वतंत्र धंदा करूं लागल्या-पासून चार वर्षेंपर्यंत त्यांनीं जुने छापखाने विकत घेण्याचा व नवे करून विक-ण्याचा क्रम चालविला होता. या उद्योगांत त्यांना यश येत गेलें, व याच उद्योगानें ते बरेच सांवरले. सन १८६८ सालीं त्यांनीं आपल्या छापखान्याला 'निर्णयसागर' हें नांव दिलें व तेव्हांपासून त्यांच्या कारखान्याला ठामपणा आला; तेव्हांपासूनच त्यांच्या उद्योगदिशेला स्थायिकत्व आलें व त्यांच्या अजरामर कीर्ती-ची जणूं काय कोणशिला स्थापिली गेली.

जावजींच्या ऊर्जितदशेची व तदनुरोधानें त्यांस मिळालेल्या कीर्तीच्या पायाची सुरुवात अठ्ठावीस वर्षांपूर्वीं झाली. चार वर्षें पायाचें काम चाललें होतें. तितक्या वेळांत चार बरसाती लोटल्या. तेव्हां पाया फार मजबूत झाला असा-वा हें सांगणें नकोच. जेवढ्या म्हणून मोठ्या भक्कम इमारती होतात तितक्यांचा पाया मजबूत व अढळ होण्याकरतां एकादा तरी पावसाळा त्या पायावरून जाऊं देण्याचा इंजिनियरिंग संप्रदाय आहे. तदनुरोधानें म्हणा किंवा कोणत्याही कार-णानें म्हणा, हा पाया चार वर्षांपर्यंत तसाच राहूं दिला होता. पुढें तरी त्या पायावर लवकर इमारत चढवावी असा जावजींचा विचार होता असें दिसत नाहीं. परंतु असा कांहीं एक अचानक योग आला कीं, त्या पायावर इमारत चढवि-ण्याचें जावजींस भाग पडलें. 'अथवा भवितव्यानाम् द्वाराणि भवंति सर्वत्र' ह्या कालिदासोक्तीचा अशा वेळीं प्रत्यय येतो. तो असा आला. रा० रा० विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा शिळाछापखाना मुंबईप्रांतांतील छापखान्यांच्या इति-हासांत अवश्य नमूद करण्याजोगा होऊन गेला, व तसा इतिहास कधीं कोणीं लिहिल्यास यांच्या छापखान्याचा त्यांत अवश्य उल्लेख होईल. गणपत कृष्णाजींचा छापखाना, हेंगिष्टे, खातू व अग्निहोत्री यांचे छापखाने, यांनीं महाराष्ट्र व संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवनास अतिशयच साहाय्य केलें हें कृतज्ञतापूर्वक व निरभिमा-नतया सर्व कबूल करतील यांत शंका नाहीं. गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत

टैपावर काम प्रथमतः निघूं लागलें. आमचे देशी छापखान्यांचे खरे व उत्कृष्ट जनक गणपत कृष्णाजी हे होत. त्यांचे छापखान्यांत शिळेवर व टैपावर अशीं दोन्हीं प्रकारचीं कामें फारच सुबक व दर्शनीय निघत. त्या छापखान्याचे मालकांनीं प्रतिसालीं पंचांग काढण्याचा क्रम आज सुमारें ४० वर्षें झालीं सुरू केला. प्रथमत: शिळाछापाचें पंचांग असे. पुढें त्यांनीं सन १८६७ चे ह्मणजे शके १७८९ सालचें पंचांग टैपावर काढलें. आमच्या इकडे टैपावरचें हें पहिलें पंचांग होय. रा० अग्निहोत्री यांस हें टैपाचें पंचांग पाहून आपलें पंचांगही टैपावर काढण्याची इच्छा झाली. तेव्हां त्या कार्याला लागणारें विशेष सामान तयार करण्याविषयीं सदर अग्निहोत्री यांनीं जावजींस सांगितलें. जावजींनीं सर्व सामुग्री सिद्ध केली. पण आपणास तें काम झेपेल असें अग्निहोत्री यांस वाटलें नाहीं व तें काम करण्याचें आनुकूल्यही त्यांस राहिलें नाहीं. फणसवाडींत अग्निहोत्र्यांचा वाडा ह्मणून जी मोठी इमारत आहे ती विठ्ठल सखाराम यांचीच. पण त्यांना पडता काळ लागला होता. तेव्हां ही सर्व सिद्धता निष्फळ होणार असा जेव्हां पक्का निर्णय झाला तेव्हां आपणच छापखाना घालून या सामुग्रीचा उपयोग करून घ्यावा असा जावजींनीं निर्णय केला, व ह्मणून त्या आपल्या कार्यालयाला व छापखान्याला ‘ निर्णयसागर ’ हें नांव दिलें, व सन १८६९ सालीं त्यांनीं शके १७९१ सालचें पंचांग टैपावर काढलें. तेव्हांपासून आजपर्यंत त्यांचा प्रतिवर्षी पंचांग काढण्याचा क्रम अव्याहत चालला आहे. येथपासून पूर्वोक्त पायावर इमारत चढविण्याच्या विचारास आरंभ झाला. तोंपर्यंत इमारत चढवावी किंवा नाहीं याबद्दल जावजींचे मनाचा निश्चय झाला नव्हता. परंतु सदरीं सांगितलेल्या योगानें जावजींच्या मनानें इमारत चढविण्याचें घेतलें. मग इमारतीस आरंभ झाला. ती इमारत आज २३।२४ वर्षें एक सारखी वाढत चालली आहे व मागच्या सालच्या कामापेक्षां पुढच्या सालचें काम अधिक मजबूत, अधिक भव्य, व अधिक आकर्षक असें होत चाललें आहे.

कोणतीही इमारत सुबक, रमणीय, मजबूत व निर्दोष होण्यास त्या इमारतीच्या यजमानाचे अंगीं एक प्रधान गुण लागत असतो. त्या इमारतीला लागणारा मालमसाला, सामान सुमान व कारागीर यांची यजमानाला चांगली पारख करतां आली पाहिजे. तर इमारत निर्विवाद चांगली होईल. इतर गुणही त्या

यजमानाच्या ठिकाणीं असणें जरूर आहे. पण प्रधान गुण जी **पारख** ती जर नसेल तर इतर गुण असूनही इमारत व्हावी तशी चांगली होत नाहीं. हा प्रधान गुण जावजींचे अंगीं चांगलाच होता आणि याच गुणामुळें जावजींस इतकें यश आलें असा आमचा पक्का ग्रह आहे. जावजी हे विद्वान् शब्दानें लोकरूढ जी कोटी आहे तींतलि नव्हते, किंवा ज्याचे योगानें गाढवाचा तेजी व पाजीचा गाजी बनतो असा त्यांच्याजवळ पैसाही नव्हता. पण पुष्कळशा विद्वानांस व धनाढ्यांस जें पद अलभ्य तें त्यांस मिळालें. त्यांचें कीर्तिमंदिर या लोकांच्यापेक्षां किती तरी पट उंच गेलें आहे. याचें कारण 'परीक्षा' नांवाचा गुण जावजींत चांगला होता. हा गुण शिकविण्याच्या शाळा नाहींत व गुरुही नाहींत. तो उपजत असावा लागतो. तो शिकवून येत नाहीं. एका औदीच्य कवीचें ह्मणणें आहे कीं:—

**'रागी बागी पारखी न्यायी और न्याव ।**
**इन् पञ्चन् को गुरु नही, उपजत अंगस्वभाव ॥'**

त्याप्रमाणें परीक्षा ( पारख ) गुण हा जातिवंतच असावा लागतो व तो जावजींच्या अंगीं रगड होता. यामुळें कीर्तिमंदिराला लागणारे सर्व पदार्थ—मालमसाला, सामानसुमान व कुशल कारागीर लोक—या यजमानाला अगदीं चोख व नांव ठेवण्यास जागा नाहीं असे मिळाले. इतर यजमानांच्या अंगीं हा प्रधान गुण नसल्यामुळें त्यांच्या इमारती तितक्या मानानें कच्च्या पडल्या आहेत. आतां जें कांहीं आह्मीं येथवर ह्मटलें आहे त्याची नीट समजूत पडावी ह्मणून दोन चार उदाहरणें देतों. संपूर्ण उदाहरणमालिका त्यांच्या विस्तृत चरित्रांत आली पाहिजे होती, परंतु रा० सा० ओकांनीं बहुधा शालीनतेमुळें त्या भागाला अजी टाळा दिला आहे. हा प्रकार बरा झाला नाहीं. आतां आमच्या सारख्या तटस्थानें हें प्रकरण सविस्तर यावें तर आह्मां जवळ तितकें स्थळ नाहीं, व प्रसंगीं स्थळ जरी असतें तरी समग्र यथावत् जशी माहिती आह्मांस असावी तशी नाहीं. तेव्हां थोडकींचशीं उदाहरणें देऊन आमच्या मुख्य विधानाचें समर्थन करतों. रा० राणूजी रावजी आरू व रामचंद्र अमृत मोरे हे या कीर्तिमंदिराचे अनुक्रमें मालमसाला व सामानसुमान होत. हे दोघे गृहस्थ ह्मणजे जावजींचे उजवे हात होत. जावजींचे टैपांची जी आज यथायोग्य ख्याती आहे, व छापण्याचे कामाचा

सुबकपणा, नीटनेटकेपणा, सफाई, नियमितपणा, चांगुलपणा, वगैरेबद्दलची जी इतकी तारीफ आहे, त्या श्रेयाचे हे दोघे गृहस्थ पुष्कळसे भागीदार आहेत. जावजींना जर खरी पारख नसती तर हीं रत्नें त्यांना लाधलीं नसतीं असें आह्मांस वाटतें. आतां कारागीरमंडळीचीही पारख जावजींस कांहीं अजब होती. आपली कीर्तिमंदिराची इमारत बांधण्याकरितां जावजींनीं असे असे निवडक, वेचक व हुशार कारागीर शोधून काढिले होते कीं, जरी ती इमारत मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर त्या कारागिरांनीं बांधिली तरी ती व तिच्या वरील नक्षी सुद्धां फिलाडेल्फिया, बोस्टन, न्यूयार्क इत्यादि दूर पल्लयावरील लोकांना साफ दिसत होती व आहे. ते कारागीर तर धन्यच आहेत, परंतु त्यांची खरी पारख करून ज्यानें आपल्या संग्रहीं त्यांस ठेविलें तो किती तरी धन्य ह्मणावा ! कै० महादेव मोरेश्वर कुंटे, रा० ब० शकंर पाडुरंग पंडित, कै० महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद हे या अत्युच्च शिखरभागांवरील कारागीर होत. यांनीं अनुक्रमें षड्दर्शन चिंतनिका, वेदार्थयत्न व काव्यमाला नांवांचे अत्यंत रमणीय, अत्युच्च व अति कठिण असे तीन बुरूज बांधून ठेविले आहेत. यद्यपि हे बुरूज अर्धेकच्चेच राहिले आहेत, तथापि झाले आहेत तितक्या पुरते इतके कांहीं भक्कम व सुरेख झाले आहेत कीं त्यांकडे पाहणारे सर्व लोक या कारागीरांच्या कारागिरीबद्दल थक्क होऊन गेले आहेत. हे बुरूज थोड्या बहुत काळानें पुरे बांधून होतील अशी आह्मांस बळकट उमेद आहे, व हें वडिलांच्या कीर्तिमंदिराच्या बुरूजांचें अवजड खरें पण अत्यंत लोकोपकारक कृत्य रा० तुकारामजी तडीस नेतील अशीही पण आह्मांस उमेद आहे. तुकारामजींकडे नुसतें वडिलांच्या मार्गानें जावयाचें आहे. कारागिरांची पारख करण्याचें अत्यंत बिकट व जोखिमीचें काम करण्याचें ओझें त्यांच्यावर नाहीं. अस्तु. आतां या कीर्तिमंदिराचे अत्युच्च बुरुजांचें वर्णन पाहून कित्येकांना मद्रास इलाख्यांतील प्रसिद्ध गोपुरांचें स्मरण होईल. पण या कीर्तिमंदिराचे रचनेंत व त्या गोपुरांचे रचनेंत फार मोठा फरक आहे. तीं गोपुरें फार उंच असतात व मजले दाखविण्याकरितां खिडक्या असतात. त्यांचा बाह्य देखावा मात्र भक्कम असतो. आंतल्या बाजूंनीं मजले नसतात किंवा दर्शनीय भाग फारसा नसतो. तसा प्रकार या जावजींच्या कीर्तिमंदिराचा नाहीं. ह्यांतील बाह्य व आन्तर हीं स्वरूपें एकसारखीं दर्शनीय, उपयुक्त व भक्कम आहेत. अगदीं तळमजल्यापासून तों पूर्वोक्त अत्युच्च

बुरुजांपर्यंत सर्व प्रकार अत्यंत उचित, समर्पक व कारागिरांना भूषणावह असा आहे. या निरनिराळ्या मजल्यांकरितां ज्या कारागिरांचा जावजींनीं संग्रह केला आहे तो इतका कांहीं उत्कृष्ट व योग्य झाला आहे कीं, जावजींच्या पारखगुणाची जितकी स्तुति करावी तितकी थोडी आहे असें वाटावयास लागतें. रा० सा० विनायकरावजी ओक या सुप्रसिद्ध बालबोध कारागिराकडे तळमजल्याचें काम जावजींनीं सोपविलें होतें. अगदीं ठेंगण्या अल्पवयस्क मुलांपासून तों आजन्मविद्यार्थि जरठ बालांपर्यंत सर्वांकरितां या कारागिरानें असें कांहीं उत्कृष्ट काम करून ठेविलें आहे कीं राजापासून तों रकापर्यंत यांची कृति सर्वांना रम्य, आकर्षक व आसेचनक अशी झाली आहे. तळमजल्याच्या भिंती रंगविण्याकरितां एक चित्रकार जावजींनीं संग्रहीं ठेवला होता. रा० श्रीरंग रामचंद्र यांनीं चित्रित केलेल्या भिंती पाहून कोणी बरें माना डोलविल्या नाहींत ? अस्तु. पुढें या मजल्याच्या पुढल्या मजल्याकडे पहावें तर तेथले नियुक्त कारागीर तर पहिल्या कारागिरापेक्षां कांकणभर अधिकच कुशल दिसतात. वास्तविक प्रकार असा आहे कीं, जावजींनीं निवडलेले सर्वच कारागीर शेलके आहेत. सर्व पांढरे शुभ्र देदीप्यमान हिरे आहेत. मात्र कोंदणामुळें जसा हिऱ्यामध्यें गैरवाकब डोळ्यांच्या मनुष्यास फरक दिसतो तसा या कारागिरांमध्यें फरक त्यांच्या त्यांच्या कडे दिलेल्या कार्यावरून दिसतो. बाकी एकाला काढावा व एकाला ठेवावा तर मोठमोठ्या मर्मज्ञांस देखील खरी ओळख पटणार नाहीं, अशी खरी स्थिति आहे. हा दुसरा मजला काव्यसंग्रह नांवाचा आहे. यावर प्रथम कै० जनार्दनपंत मोडक कारागीर होते. परंतु लवकरच त्यांस परमेश्वरानें आपल्याजवळ नेलें. तेव्हां हा मजला तयार करण्याकरितां रा० रा० वामनराव ओक या नांवाचे कारागिराची जावजींनीं योजना केली आहे. ह्या कारागिराचें काम असें कांहीं वठत आहे कीं, त्यांच्या तोडीच्या इतर कारागिरांसही निर्मत्सर होऊन माना डोलवाव्या लागतात. या मजल्यावर आणखीही पुष्कळ कुशळ कारागिर काम करीत आहेत. कारण येथपर्यंतच पुष्कळांची पोंच आहे व पुष्कळसा प्रेक्षकगण तेथूनच परततो. याचे पुढचे मजल्यावर काम करण्याकरितां प्रो० राजारामशास्त्री भागवत, रा० सा० नारायण बाळकृष्ण गोडबोले व रा० सा० रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे कुशल कारागीर प्रमुखतः दृष्टीस पडतात. या मजल्याचें काम पाहयाला जाणारे प्रेक्षक अर्थात् कमी आहेत; कारण जसें

उंच जात जावें तसतशी साधारण लोकांची दृष्टि फिरते व प्रसंगीं घेरीही येते. जर संख्यादृष्टीनें पाहिलें तर हा मजला थोडे लोक पाहतात व या कारागिरांचे कुशलकर्माचा रसास्वाद घेतात. तथापि सहृदय, मर्मज्ञ व होतकरू अशी मंडळी येथें जाईल व जाते अशी अपेक्षा असल्या कारणानें तेथील कारागिरांनीं आपलें बुद्धिसर्वस्व या ठिकाणीं दाखविलें आहे. याचप्रमाणें वाढत्या प्रमाणावर वरील भाग तयार झाले आहेत व होत आहेत. इतर पुष्कळ कुशल कारागिरांचा नामनिर्देश करणें राहिलें आहे, पण स्थलाभाव आड येतो. पण इतकें झालें तरी एका अष्टावधानी कारागिराचा जावजींनीं संग्रह केला आहे ती गोष्ट येथें सांगितली नाहीं तर हा आमचा लेख खरोखर अपुरा दिसेल. इतकेंच नव्हे, पण आह्मी अनभिज्ञ व अंधकोटींत गणले जाऊं. तेव्हां आमच्या स्वतःकरितां ह्मणून तरी, स्थलाभाव असतांहीं, या कारागिराचें अल्पसें वर्णन केलेंच पाहिजे. आह्मीं या कारागिरांचें नांव मुद्दाम शेवटीं ठेविलें. याचें कारण ह्या कारागिराचा हात कीर्तिमंदिराचे अगदीं तळमजल्यापासून तों अत्युच्च बुरुजापर्यंत सर्वत्र दिसतो. तेव्हां याची योजना कोणत्या मजल्यावर करावी हें कळेना ह्मणून यांना शेवटापर्यंत ठेवावें लागलें. या कारागिराकडे प्रत्येक मजल्यांतील कांहींना कांहीं कुशलतेचें काम असून शिवाय एकंदर कीर्तिमंदिराला सुधाधवल करण्याचें फारच कष्टतर काम यांजकडे सोपविलेलें आहे. या कारागिराचें नांव वे० शा० सं० रा० रा० काशीनाथ पांडुरंग परब हें होय. यांचें नांव 'काव्यमाला' नांवाचा अत्युच्च बुरूज जोंपर्यंत कायम राहील—तो अक्षयीं राहील अशी उमेद आहे—तोंपर्यंत तें तेथें फडकत राहील, यांत शंका नाहीं. अस्तु. या कीर्तिमंदिराचें संपूर्ण वर्णन करण्यास आह्मी समर्थ नाहीं. तथापि हें अवजड काम जावजींस पारखशक्ति होती ह्मणून निर्विघ्न व निर्वेध पार पडलें असें आह्मी पुनः एकवार ह्मणतों.

दुसरा एक जावजींच्या अगीं अनुकरणीय व स्पृहणीय गुण होता. तोही नैसर्गिक जातीचाच असावा लागतो. पण तो कांहीं अंशानें पाहून व शिकून येण्याजोगा आहे. तथापि तो जातिवंत असला तर जसा चमकतो तसा पढविलेला किंवा ठेंचा खाऊन आलेला चमकत नाहीं. पहिला गुण ह्मणजे मनुष्यपरीक्षेचा. हा तर शिकून येत नाहीं असा आमचा पक्का ग्रह असल्यामुळें त्याला आह्मीं प्रथम स्थान दिलें आहे. त्या गुणाबरोबरच हा दुसराही गुण असणें आवश्यक आहे. या दोघांची जोडी जर संगीन नसेल तर यावें तितकें यश येणें नाहीं. जावजींचे

अंगीं हे दोनही गुण पण अतिशय होते. यामुळें तर यांची इतकी ख्याति व भरभराट झाली. हा गुण एका शब्दानें सांगतां येण्याजोगा नाहीं. कारागीर लोक —मग ते काष्टमंदिराचे, लोष्टमंदिराचे, पाषाणमंदिराचे, धातुमंदिराचे, रत्नमंदिराचे, विद्यामंदिराचे, कीर्तिमंदिराचे किंवा कोणत्याही प्रकारचे मंदिराचे असोत– ते लहरी असायाचे. असा आपल्या इकडे तरी ओतप्रोत अनुभव आहे. त्यांची लहर, तब्बेत संभाळणें ह्मणजे नाकीं नऊ येतात. या कारागिरांशीं कधीं प्रसंग न यावा अशी केव्हां केव्हां इच्छा होण्याचे प्रसंग व्यवहारांत कितीकदां तरी येतात. परंतु व्यवहारांत तशी इच्छा धरून चालत नाहीं. तेव्हां या कारागिरांची मनधरणी केल्यावांचून तर सत ना गत. पण त्यांना खुष व राजी राखून त्यांना आपलेसे करून टाकणें ही हातोटी सगळ्यांना साधत नाहीं. ज्यांना साधते ते मात्र यशस्वी होतात. या कारागिरांचे लहरीचा अनुभव ज्यांना थोडा बहुत तरी नसेल असे फार थोडे लोक सांपडतील. जर अगदीं हलके सलके कारागीर लोक–उदाहरणार्थ शिंपी, चांभार, वगैरे–सुद्धां दहा पांच वायदे केल्याशिवाय किंवा पांच दहा खेपा घालविल्याशिवाय एकादें लहानसें काम करून द्यायाचे नाहींत तर मोठमोठे नामांकित, अवजड व कुशलतेचीं कामें करणारे कारागिरांनीं वर्षोचीं वर्षे लहरीच्या सबबीवर झुलकावणी दिली तर नवल काय ? श्री० कुरुंदवाडकरांनीं प्रसिद्ध गुणी व आधुनिक विश्वकर्मा **भिवा सुतार** यास रामपंचायतन, मारुती व गणपति यांच्या हस्तिदंती मूर्ति करण्याकरितां कुरुंदवाडास दीड वर्ष नेऊन ठेविलें होतें व सदर संस्थानिक हे गुणैकपक्षपाती असल्यामुळें त्यांनीं यथाशक्ति–संस्थानिकांच्या शक्तीचें मान लक्षांत ठेविलें पाहिजे–भिवाजींची दीड वर्ष खुषामत केली. परंतु सदर कारागिराची लहरच लागेना. पुढें जेव्हां लहर आली तेव्हां दोन महिन्यांत तितक्या मूर्ति करून दिल्या. त्या मूर्ति इतक्या कांहीं सुंदर, सुबक, मनोरम, व नेत्राह्लादक झाल्या आहेत कीं पाहणारा घटकाभर आनंदभरांत मग्न होऊन जातो व त्याला असें वाटतें कीं भिवाला प्राणप्रतिष्ठेची जर कला साधली असती तर सौंदर्यादि सर्व भाव त्यानें मूर्तिमंत आह्मां सर्वांपुढें उभे केले असते. अस्तु. तेव्हां कारागिरांची मनरधणी करून त्यांना आपलेंसें करणें किती कठिण आहे ! त्यांतून एकाद्या कारागिराची मनधरणी करायाची असती तर गोष्ट निराळी. जावजींच्या या कीर्तिमंदिरांत खपणारे कारागीर निदान आजवर हजार पांचशें तरी होऊन गेले असतील. पण जावजींना

असें कांहीं वशीकरण साधलें होतें कीं यांची त्यांची दृष्टादृष्ट झाली कीं त्या कारागिरांची लहर ताळ्यावर येई. या कीर्तिमंदिरांतील लहान मोठें कोठलेंही कौशल्याचें काम घेऊन त्याकडे नीट पहावें ह्मणजे आमचे ह्मणण्याची प्रतीति येईल. जावजींची हातोटी अशी कांहीं होती कीं, या कारागिरांची लहर एकीकडे जाऊन त्यांस काम करण्याची कांहीं अपूर्व हुरूप येत असे आणि याचमुळें जावजींचीं कामें अपेक्षित इयत्तेच्या वर उतरत असत. आतां वशीकरणाची हातोटी जावजींस साधली होती असें ह्मटल्यावर त्या हातोटीचे घटक गुण जावजींचे अंगीं जागरूक होते हें कांहीं मुद्दाम सांगणें नको. या घटकगुणांपैकीं प्रधानत्वेंकरून पांच गुण जावजींचे अंगीं विशेषच होते. उदार व असंकुचित वृत्ति, आपल्याशीं संबद्ध अशा लोकांवर पूर्ण विश्वास, दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करायाची नाहीं हा बाणा, अंगीकृताचा परित्याग करायाचा नाहीं असा निश्चय, व आपल्या लोकांवर अकृत्रिम प्रेम, हें घटकगुणपंचक जावजींचे अंगीं जातिवंत खिळलेले होते असें दिसतें. ओढून ताणून आणलेलें चंद्रबळ किती वेळ टिकणार? गायकवाड सरकारची बालबोधाकरितां दिलेले देणगीची गोष्ट सुप्रसिद्धच आहे. 'काव्यमाला' हें पुस्तक व्यापारीदृष्टीनें फायद्याचा सवदा नाहीं हें खरें. पण तेवढ्याकरतां तें पुस्तक बंद करावयाचें नाहीं असा त्यांचा निग्रह होता. संपादक ज्या दिवशीं आपल्या जवळचा संग्रह आटपला असें ह्मणतील ते दिवशीं **काव्य माला** बंद करण्याचा विचार करूं असें ते ह्मणत. आणखी जावजींच्या या गुणांच्या बद्दलच्या गोष्टी अनेक प्रसिद्ध आहेत व त्यांपैकीं बऱ्याचशा रा० सा० ओकांच्या चरित्रांत दाखल झाल्या आहेत.

जावजी हे गुणी लोकांचे मोठे भोक्ते व चाहते असे होते. ते स्वतः गुणी असल्यामुळें त्यांना गुणांची कदर असावी हें अगदीं नीट आहे. त्यांना त्यांच्या कारागिरांनीं अमुक एक सामुग्री पाहिजे ह्मणून सांगितलें कीं त्यांनीं तिची सिद्धता करून दिलीच. पैशाकडे किंवा श्रमांकडे त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं. याचें कारण आपल्या कारागिरांवर पूर्ण विश्वास. हे कारागीर आपणास गैर असें कांहीं सांगायाचे नाहींत असें ते ह्मणत व त्याप्रमाणें वागत. येथें ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, या कारागीर मंडळीनेंही पण जावजींशीं कधीं बेइमानी, कुचरपणा किंवा विश्वासघात केला नाहीं. अशी नामांकित, इमानी, परार्थपरायण कारागीर मंडळी जावजींस मिळाली ह्मणून त्यांच्या कीर्तीचा एवढा डोलारा उभा

राहिला. हे दोन गुण जर जावजींचे अंगीं नसते किंवा असूनही फारच थोड्या प्रमाणानें असते तर त्यांची आजच्या इतकी कीर्ति झाली नसती. मुंबईतील आमचे देशी छापखानेवाले पुष्कळ आहेत, व जावजींच्या आधींचेही बरेच असतील. पण जावजींच्या इतका त्यांचा लौकिक नाहीं याचें बीज या दोन गुणांचा अभाव किंवा अल्पप्रमाणक सद्भाव हें असावें असें आह्मांस वाटतें.

जावजी हे स्वत: शिकले सवरलेले नव्हते, ह्मणजे त्यांस विद्वान् कोटींत समाविष्ट करतां येण्याजोगी त्यांची योग्यता नव्हती, हें सुप्रसिद्ध आहे. ते कधींही आपण विद्वान् आहोंत असें समजत नसत. ते जरी इतक्या मोठ्या योग्यतेस चढले होते तरी पण त्यांना गर्वलेशही नव्हता. ते आपली स्वत:ची योग्यता पूर्ण जाणून होते व त्याप्रमाणें त्यांचें सदा वर्तन असे. नाहीं तर अर्ध्या हळकुंडानें पिंवळी होणारी मंडळी पुष्कळ दृष्टीस पडते. त्यांतील ते अगदीं नव्हते असें अनेकवेळां प्रत्ययास आलें आहे. जेव्हां बडोदे सरकाराकडून बालबोधाची तारीफ झाली व मुंबई सरकारानें जावजी शेटचा ‘ जस्टिस आफ दि पीस ’ ही पदवी देऊन मान केला, तेव्हां त्या दोहों प्रसंगींचे त्यांचे उद्गार त्यांचे निगर्वीपणाची व ते स्वत:स चांगले ओळखीत या गोष्टीची चांगली साक्ष देत आहेत. याहून अन्य उदाहरणें नकोत.

आतां जावजींचीं सामाजिक, धार्मिक व नैतिक विषयांविषयीं अमुक तऱ्हेचीं मतें होतीं व त्यांचे विचार अमुक दिशेचे होते असें त्यांच्या चरित्रकारांनीं ह्मटलें आहे. आमच्या दृष्टीनें हा केवळ अर्थवाद आहे. जावजींचीं स्वतंत्र मतें किंवा विचार असतील किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. त्यांचे विचार व मतें हीं त्यांच्या विश्वास्यांचीं मतें व विचार होत असा आमचा अनुभविक ग्रह आहे. एकदा अमुक बाबतींत अमुक विश्वासपात्र आहे अशी जावजींच्या परीक्षेस उतरून खात्री झाली कीं, मग त्याच्यावर त्या कामीं त्यांचा पूर्ण विश्वास असे. त्या कामीं त्याच्या धोरणानें ते वागत. तेव्हां त्यांच्या विचारांचा व मतांचा रंग विश्वास्यांच्या मतांच्या व विचारांच्या रंगाप्रमाणें असे. यांचे विश्वास्य बहुतेक ब्राह्मण होते, ह्मणून त्यांच्या मतांचा, विचारांचा व आचारांचा थाट ब्राह्मणी थाटाचा होता. जावजी हे जातीचे मराठे व सत्यशोधक समाज हा मराठ्यांत उत्पन्न झालेला. त्या समाजाचे अग्रणी व धुरीण हे जावजींचे मित्र होते. पण ते जावजींचे परीक्षेंत उतरले असावे असा रंग दिसत नाहीं; कारण यांच्या मतांची

दिशा जी ब्राह्मणी वळणाची होती ती बदलली नव्हती. अस्तु. तेव्हां जावजींच्या ह्मणून प्रसिद्ध झालेल्या मतांत किंवा विचारांत कोणास कांहीं दूषणीय दिसत असेल तर त्याबद्दल जावजींस दोष न देतां त्यांच्या विश्वास्यांस दोष द्यावा. परंतु ज्यांत कमी जास्ती दोषभाग आहे असे जावजींचे विचार फारच थोडे सांपडतील. शिवाय मनुष्य हा प्रमादपात्र असल्यामुळें या विश्वास्यांचीं मतें चुकलीं असतील. परंतु त्या योगानें विश्वास्यांचे नियतीचा कोणीही संशय घेणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. जावजींचीं ह्मणून प्रसिद्ध झालेलीं बहुतेक मतें उदात्त, उदार, पोक्त व व्यवहार्य अशीं आहेत.

जावजी शेटचा व्यवहार फारच चोख, निर्मळ व सात्त्विक तऱ्हेचा होता. तो तसा होता याचें बीज त्यांना पैशाची अनावर हाव नव्हती. ज्यांच्या मानकुडीवर पैशाची पिशाचिका बसली आहे, त्यांना मान, अपमान, अब्रू, पत, सूक्त, असूक्त वगैरे कशाचीही पर्वा नसते. या पैशाचे पायीं किती मनुष्यें अमानुष होऊन गेलीं आहेत. पण जावजी हे या पिशाचिकेच्या तडाक्यांत सांपडले नव्हते. त्यांना जितका न्याय्य व सिध्या मार्गानें पैसा मिळेल तितका पाहिजे होता. पण अनाचारानें मिळालेली एक कवडी देखील त्यांस नको होती. आपल्याशीं व्यवहार करणाऱ्या लोकांची सोय पहाणें हा तर जावजींचा अप्रतिम गुण होता. त्यांच्या अंगीं मारवाडीपणा नव्हता. या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव या वि० ज्ञा० विस्तारला अनेक वेळां आला आहे व या गोष्टीचा उल्लेख जावजींचे हयातींतही त्यानें आत्मवृत्तकथनादिप्रसंगीं पूर्वीं अनेक वेळां केला आहे. जर जावजींचे अंगीं मारवाडीपणा असता तर आज जीं कांहीं पुस्तकें लोकांस सुलभ झालीं आहेत तीं त्यांच्या दृष्टीस पडतीं कीं नाहीं याची आह्मांस बळकट शंका आहे. नामनिर्देश करून इतर उदाहरणें देणें प्रशस्त नाहीं, असें समजून हा भाग संपवितों.

जावजींचा स्वभाव मोठा मनमिळाऊ व दयार्द्र होता. त्यांना आपली पूर्वस्थिति अष्टौप्रहर आठवत असे असें त्यांच्या वर्तनावरून दिसतें. गरीबांची कळकळ जावजींच्या आचरणांत पावलोपावलीं दृष्टीस पडते. तुकारामबोवांनीं जीं साधूचीं लक्षणें अनेक प्रसंगीं सांगितलीं आहेत तीं सर्व जावजींचे आचरणांत स्पष्ट दिसत होतीं. आमचे दृष्टीनें तर जावजी उत्कृष्ट साधुकोटींत गणले जाण्यास योग्य होते.

**'जे कां रंजले गांजले । त्यांसी ह्मणे जो आपुले ।**
**तोची साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ '**
**'अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ ।**
**त्याचे गळां माळ असो नसो ॥**
**परद्रव्या अंध निंदेसी जो मुका ।**
**तोचि संत देखा तुका ह्मणे ॥ '**

हीं व या सारखीं प्रापंचिक व लौकिक साधूंचीं इतर लक्षणें जीं तुकोबासारख्यांनीं वर्णन केलीं आहेत तीं जावजींस पूर्णपणें लागू होतीं, असें ज्या कोणास त्या पुण्य पुरुषाचा कांहीं काळ समागम झाला आहे त्याला खचित वाटल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांचा सर्व आयुष्यक्रम ह्या साधुत्वलक्षणांनीं ओतप्रोत भरला होता. जीं कांहीं थोडींशीं उदाहरणें रा० सा० ओकर्नी दिलीं आहेत त्यांवरून जावजींच्या पूर्ण साधुत्वाची साक्ष पटत नाहीं काय ? असे व्यावहारिक, प्रापंचिक व लौकिक साधु आमच्या मध्यें जितके अधिक उत्पन्न होतील तितके हवे आहेत. जेव्हां करवीरचे संबंधानें केसरीकारांवर मुकद्दमा येथील प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट साहेबांपुढें चालला होता तेव्हां त्यांच्याकरितां जावजी जामीन राहिले होते ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. दीनबंधुकाराचे जातीचे जावजी असून या अपरिचित ब्राह्मणछाव्यांस यथाशक्ति साहाय्य करतात ही गोष्ट ' जे कां रंजले गांजले । त्यासी ह्मणे जो आपुले ' या लक्षणाचा कृतितः अनुवाद करीत नाहीं काय ? बालबोधांतील चरित्रांत नुसतें गुणप्रकाशन असतें व दोषोद्घाटन नसतें, व तसें होण्याचें कारण जावजी होत, असें रा० सा० ओक ह्मणतात. बरें ही तरी गोष्ट कशाची दर्शक असावी ? ' निंदेसी जो मुका ' या लक्षणाची जावजींचे कृतींवर किती छाप होती हें या गोष्टिवरून स्पष्ट होत नाहीं काय ? जावजींचे एकंदर आचार, विचार व उच्चार यांची जर कोणी छान करील तर आह्मांस वाटतें कीं, त्या छान करणाऱ्या पुरुषाला जावजी ह्मणजे एक अवतारी पुण्यपुरुष, व योगभ्रष्ट ह्मणून पुनः अवतीर्ण झालेला महासाधु असे असावे असें निःसंदेह वाटेल.

देशाला ऊर्जितावस्था येण्यास कर्ते पुरुष पाहिजेत. कर्त्या पुरुषांचीच जिकडे तिकडे वाण आहे. कार्यें करायाचीं पुष्कळ आहेत, पण तीं करणारे पुरुषांचीच फार तूट आहे. आमचे सुदैवानें जावजी हे एक चांगले कर्ते पुरुष होते. जावजींना

जर विद्या असती तर ते नेतेही झाले असते. तसा योग आला असता तर कर्तृत्व व नेतृत्व यांची एकच ठिकाणीं उत्कृष्ट सांगड झाली असती. तथापि जावजींना नेते पुरुष फारच उत्कृष्ट मिळाले. त्यांनींच जावजींस बऱ्याचशा अंशानें इतक्या उच्चत्वास चढविलें असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. पण, जावजींचे अंगीं जर कर्तृत्वगुण नसता तर या नेत्या लोकांचे हातून काय उपयोग झाला असता ? 'कीं नामस्पर्शमणि स्पर्शे परि काय करिल खापर मी,' असें जें पंतांनीं मोठ्या मार्मिकतेनें ह्मटलें आहे तोच प्रकार जर जावजी कर्ते नसते तर या नेत्यांच्या खटपटीचा झाला नसता काय ? तेव्हां आह्मी या कर्त्या व नेत्या अशा उभयविध पुरुषांची मनोभावें तारीफ करतों.

अंधपंगुन्यायानें या कर्त्या व नेत्या पुरुषांचा संयोग आह्मां सर्वांस मोठा लाभदायी झाला आहे. या जावजींच्या कर्तृत्वशक्तीचीं उदाहरणें अन्यगुणसंबंधानें बरींचशीं सांगण्यांत आलीं आहेत. विलायतेंत जशा ग्रन्थकारांकडून पुस्तकें घेऊन प्रसिद्ध करणाऱ्या कंपन्या आहेत तसला प्रकार आमचेकडे जावजींनीं प्रथमत: सुरू केला असा आमचा समज आहे. जावजींच्या कर्तेपणाचें दुसरें उदाहरण–व यांतील यशाचे भागीदार फार कोणी नसावेत–ह्मटलें ह्मणजे मुद्रणकलेंत व प्राच्य भाषाक्षरघटनेंत जी अपूर्व हृदयाह्लादक व अत्यंत अभीष्ट अशी सुधारणा केली आहे ती होय.

जावजींची लौकिक व्यवहारांत व कुटुंबव्यवहारांत वृत्ति अगदीं निगर्वी व साधी होती. लक्ष्मीच्या योगानें ते उन्मत्त झाले असते तर त्यांत फारसा दोष ठेवण्यास जागा नव्हती. ज्याला मोठयांतला मोठा पगार जितका मिळत होता त्याच गृहस्थाची त्या पगाराचे शेंदीडशेंपट दरमहा पगार वांटण्याची स्थिति येऊन त्यानें लक्ष्मीच्या मदाचे सपाट्यांत न सापडतां पूर्वी सारखेंच साधें रहावें हें कशाचें दर्शक आहे बरें? लक्ष्मीच्या मदाचा तडाखा किती जबरदस्त आहे याचें वर्णन एका संस्कृत कवीनें असें केलें आहे कीं, इतर प्रकारचे मद कांहीं कालावधिपुरतेच असतात व ते उन्मादकद्रव्याचें सेवन करणाऱ्यापुरतेच असतात. पण लक्ष्मीच्या मदाची गोष्ट अगदीं निराळी आहे. जो या द्रव्याचें सेवन करतो तो तर उन्मत्त होतोच पण त्याचे दूरदूरचे संसर्गीही पण अगदीं उल्लू बनून जातात. हा मद पिढ्यान्‌पिढ्या चालतो. हा कैफ इतका कांहीं चमत्कारिक आहे कीं जन्म-

दरिद्री पण भाग्यवशात् लक्ष्मीवंताच्या आश्रयास असलेल्या व जितका जितका खालच्या पायरीचा मनुष्य असेल अशाला तर तो अगदींच बेहोष करून सोडतो. जावजी हे लक्ष्मीवंताचे आश्रयास होते व पुढें स्वतःही पुष्कळ धनवंत झाले. परंतु त्यांच्यावर या मदाची काडीभरही छाप पडली नाहीं. ते आमरणान्त जशाचे तसे साधेच राहिले. अनुकरणीय गुणांनीं मंडित होते म्हणूनच ते इतक्या योग्यतेस व लौकिकास चढले. आणखी कांहीं कालपर्यंत जावजींनीं वांचलें पाहिजे होतें. त्यांच्या मनांतून जितकीं कृत्यें करावयाचीं होतीं तितकीं जर त्यांचा आयुर्दाय असता तर त्यांनीं खचित केलीं असतीं. प्रौढबोध, इतिहाससंग्रह वगैरे महत्कृत्यांचा त्यांचे हयातींत आरंभ झाला असता तरी बरेंच कार्य झालें असतें. पण आतां त्याचा काय उपयोग?

जावजी तर गेलेच. त्यांच्या अंगीं अनुकरणीय व उपयुक्त असे पुष्कळ गुण होते. त्या गुणांचा अनुकार करून सर्वांनीं प्रतिजावजी होण्याचा यत्न करावा म्हणजे जावजींनीं जसें आपल्या देशाचे एका बाबतींतील पांग फेडण्याचें श्रेय मिळविलें त्याप्रमाणें त्यांसही श्रेय मिळेल.

अखेरीस जावजींचे आत्म्यास अखंड परमेश्वर शांति व सौख्य देवो अशी मनःपूर्वक प्रार्थना करून त्या मित्राचे स्मरणास हा लेख अर्पण करितों.

# विविधज्ञानविस्तार.

मराठीमध्यें आज जीं मासिक पुस्तकें अस्तित्वांत आहेत त्यांत विविधज्ञानविस्तार हें वयानें आणि योग्यतेनें प्रथम पद पावलें आहे. १९०८ सालापासून यास ३९ वें वर्ष सुरू झालें. प्रस्तुत कालीं महाराष्ट्रांत विद्वान् आणि बहुश्रुत म्हणून नांवाजलेल्या लेखकांचे यांत लेख येत असतात. अशांपैकीं कांहींचीं नांवें:—रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम. ए., शिवराम सिताराम वागळे, बी. ए. एल्. एल्. बी., चिंतामण विनायक वैद्य, एम. ए., एल्. एल्. बी., मंगेश शिवाजी तेलंग, बी. ए., एल्. एल्. बी., विनायक कोंडदेव ओक, बाळकृष्ण नारायण देव, वासुदेव गोविंद आपटे, बी. ए., श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्. एल्. बी., महादेव व्यंकटेश लेले, बी. ए., एल्. सी. ई., नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए., एल्. एल्. बी., डा० अनंत नारायण सांबारे, एल्. एम्. एस्., गणेश रघुनाथ अभ्यंकर, बी. ए., एल्. एल्. बी.

हें मासिक पुस्तक मूळ जेव्हां अस्तित्वांत आलें तेव्हां याची पृष्ठसंख्या १६ असून वर्गणी ३ रुपये होती. पुढें क्रमानें पृष्ठांची संख्या २०, २४, आणि ३२ होऊन आतां तर ४० पृष्ठें वाचकांस दर महिन्यास मिळण्याची सोई झाली आहे. शिवाय हल्लीं ८ पृष्ठें ज्यास्त देण्याऐवजीं वर्ष अखेर स्वतंत्र पुस्तक अगर पुस्तकें देण्याची व्यवस्था केली आहे. तथापि वर्गणीच्या रकमेंत कांहीं फेरफार केलेला नाहीं इतकेंच नाहीं, पण आतां बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपाल खर्चही माफ केला आहे. उत्तम प्रतीचें पुष्कळ ग्रंथावलोकन, एक वर्षभर, अवघ्या तीन रुपयांत मिळतें.

पुस्तक खालील पत्त्यावर मागवावें:—

म्यानेजर, —विविधज्ञानविस्तार,
फणसवाडींत अग्निहोत्र्यांच्या वाड्यासमोर, मुंबई.